


श्रीक्षेत्र नीरा-नरसिंहपूर

गो. ह. दंडवते

श्रीनृसिंहकराग्रेण कल्पांतनखरोज्ज्वलं
त्रिकोणमस्त्रमेदद्धि राजतेपरमर्द्धिभिः

श्रीक्षेत्र
नीरा–नरसिंहपूर

लेखक

गोविंद हरि दंडवते

साहित्याचार्य

श्रीशंकराजी नारायण पारितोषिक विजेता.

मूल्य पांच रुपये

श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान नीरा–नरसिंहपूर
विकास व उत्कर्ष मंडळ.
मंडळ प्रकाशन क्रमांक–१

प्रकाशक –
प्रा. न. गो तथा नानासाहेब सुरू
कार्याध्यक्ष,
श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान नीरा–नरसिंहपूर
विकास व उत्कर्ष मंडळ.
मधुरंजन, जंगली महाराज पथ,
पुणे–४.

मुद्रक –
प्र. श्री. तथा बाळासाहेब काकडे
अरुणोदय प्रिंटिंग प्रेस,
४–५, नवी पेठ, सोलापूर–१

मुखपृष्ठ व चित्रे –
अरुणोदय प्रिंटिंग प्रेस,
सोलापूर–१.

आवृत्ती पहिली.
शके १८९४
सन १९७२

२००० प्रति
डेमी २८ पौन्डी कागद.

अ र्प ण

'लक्ष्मीनृसिंहः पूर्वेषामस्माकं कुलदैवतम्'–

हे जाणणाऱ्या आणि मानणाऱ्या

भूत–भविष्य–वर्तमानकालीन

नृसिंहभक्तांच्या भक्तीस.



लेखक

कवित्वाचा येथे वाहीला मीपणा

लक्ष्मीनारायणा तुझे पायीं.



हरिः ॐ तत्सत्

नीरातटे कृतनिकेतनमंबुदाभं प्रत्यङ्मुखं द्विभुजराजितमब्जनेत्रम् ।
योगासनस्थममलं सदयावलोकं जानुद्वयाहितकरं नृहरिं नमामि ॥

(द्वे विरूपे-सूक्तभाष्यम् ।)

प्रकाशकाचे हद्गत

' मधुरंजन '
जंगली महाराज पथ
डेक्कन जिमखाना, पुणे.

श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान नीरा-नरसिंहपूर उत्कर्ष व विकास मंडळ ही संस्था स्थापन झाली या घटनेस लवकरच तीन वर्षे पूर्ण होतील.

श्री नृसिंह आणि श्रीक्षेत्र नीरा-नरसिंहपूर यांची सेवा करण्याच्या उद्देशाने हे मंडळ स्थापन झाले.

नवीन पिढीतील नृसिंहभक्तांनी या मंडळात सहभागी होऊन विविध कामे योग्य दिशेने सुरुं केली ही अत्यंत संतोषदायी घटना आहे.

मंडळाच्या उद्देशांपैकी नृसिंहपुरी वेदपाठशाळा सुरुं केली गेली. श्रीनृसिंह देवालयाचा जीर्णोद्धार प्रारंभित केला गेला. ही दोन कामे मार्गी लागली.

श्रीनृसिंहविषयक वाङ्मय प्रसिद्ध करणे हाही मंडळाचा एक उद्देश आहे. चि. गोविंद हरि दंडवते यांचे प्रस्तुत ' श्रीक्षेत्र नीरा–नरसिंहपूर ' हे पुस्तक या मंडळाने प्रसिद्ध करून आणखी एका उद्देश–पथाची मार्गक्रमणा केलेली आहे.

नवीन पिढीतील भक्तांनी मंडळाच्या विविध उपक्रमात सहभागी होऊन निष्ठेने कार्य करीत राहिल्यास श्रीनृसिंहाच्या कृपेने यश मिळ–ण्यास विलंब लागणार नाहीं.

या क्षेत्राचे नष्टचर्य संपवून ते पुन्हा ऐश्वर्याप्रत नेण्याची क्षमता नवीन पिढीत आहे याची खात्री पटण्यासारखे अन्य समाधान आमच्या पिढीतील माझ्यासारख्या व्यक्तीला दुसरे कोणते नाही.

नवीन पिढीने ही अपेक्षा पूर्ण करावी.

श्रीनृसिंह सर्वसामर्थ्यसंपन्न आहेतच.

अधिकी एकादशी
शके १८९४

न. गो. सुरु

प्रास्ताविक

श्रीनृसिंह हे रणशूरांचे दैवत. वनकेसरीचे मुख असलेले हे दैवत ही कल्पनाच अतिशय रोमहर्षक आणि भव्य आहे. उत्तम मूर्तिकार असला तर तो पाषाणांतून नृसिंहमूर्ति घडवितांना नजरा खिळवून टाकील, असे रौद्रनाट्य उभे करूं शकतो. चान्द्याजवळ भद्रावती (भान्दक) या प्राचीन नगरीमध्ये एक नृसिंहमूर्ति आहे. पुरूषभर उंचीची. आक्रसलेल्या भृकुटी. नेत्रांवाटे जणू खदिरांगार बाहेर पडताहेत. त्या भीममुखाकडे पहावत नाही, इतके ते उग्र आहे. मांडीवर आहे हिरण्यकशिपु. त्याचे पोट फाडून नृसिंहाने आंतडी बाहेर उपसली आहेत. त्यांतील प्रत्येक वळसा नृसिंहाच्या अंगुल्यावर लटकलेला स्वच्छ दिसतो आहे. अशा त्या अत्युग्र मूर्तीनेहि शेजारी उभ्या असलेल्या प्रल्हादाकडे अशा कांहीं स्नेहाकुल आविर्भावाने निरखले आहे कीं सांगता पुरवत नाही.

अशीच एक पाषाणाची अतिशय घोटीव, देखणी मूर्ति पैठण येथे सांपडली आहे. नांदेडला किल्ल्यामध्येही नृसिंहाचे अतिप्राचीन मंदीर आहे. युद्धप्रवण महाराष्ट्रीकांनीं महादेव, स्कंद [खंडोबा] वीर [बिरोबा] या सेनापतीबरोबरच नृसिंहाची पूजा करावी, हे अत्यंत स्वाभाविक आहे. (महादेव ही प्रलयंकर देवता).

महाराष्ट्रभर यत्रतत्र पसरलेल्या या नृसिंहमंदिरामध्ये नीरा-नरसिंहपूर हे स्थान खूपच प्रसिद्ध आहे. कितीएक महाराष्ट्रीयांचे ते कुलदैवत आहे. असंख्य रणवीरांनी, पण्डितांनी, धनवंतांनी आणि सदभक्तांनीं आपआपली श्रद्धा या ना त्या निमित्यें या क्षेत्रीं आराध्यदेवतेपुढें प्रस्तुत केली आहे. अशा या बहुप्रसिद्ध क्षेत्राची सांगोपांग माहिती पुरविणारे उत्तम पुस्तक पुस्तकांच्या पेठेमध्यें उपलब्ध नव्हते ते आतां वाचकांहाती येत आहे.

या पुस्तकाचे लेखक श्री. गोविंद हरि दंडवते हे साहित्याचार्य आहेत. त्यांची भाषा ऋजु, श्रीमंत आणि भावानुकूल वळणे सहजपणे

घेणारी आहे. ते स्वत: या देवतेचे उपासक आहेत. त्यांनी या क्षेत्रामध्यें सकुटुंब शारीरतपहि केलेले आहे. या स्थळाचे उपेक्षित रूप पाहून त्यांचे मन जळते आहे. याचा उत्कर्ष व्हावा, अशी तळमळ त्यांच्या मनी लागून राहिलेली आहे. ते साक्षेपी आहेत. इतिहासकालीन माहितीची जमवाजमव त्यांनी यत्नपूर्वक केलेली आहे. पुण्याच्या भा. इ. सं. मंडळामध्ये त्यांचा एतद्विषयक निबंध वाचला गेला आणि तो म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांनी आपल्या ग्रंथामध्ये संक्षेपरूपें समाविष्ट केला हे श्री. दंडवत्यांच्या साक्षेपाचे गमक आहे.

अशा या परिश्रमी, दक्ष, लेखकाने आपल्या कुलदेवतेविषयीच्या श्रद्धेने ओतप्रोत होऊन लिहिलेले हे स्थलवर्णन समृद्ध आणि सुंदर व्हावे, हे स्वाभाविकच आहे.

महाराष्ट्रामध्यें अशी कित्येक मनोहर तीर्थस्थानें आहेत. त्यांतली कित्येक इतिहासाशी संबद्धही आहेत. उदाहरणार्थ, सप्तकोटीश्वर या गोमांतकातील दैवताचा मागोवा घेता ते जरासन्धाचे कुलदैवत, आणि जरासंधवधाचेवेळी स्वत: श्रीकृष्णांनी सप्तकोटीश्वरी येऊन त्याची आराधना करून त्यास प्रसन्न करून घेतले होते, असा उल्लेख आढळतो. पुढें श्रीछत्रपती शिवरायांनी त्या देवालयाचा जीर्णोद्धार केल्याचा लेख त्या मंदिराच्या शीर्षभागी झळकतो आहे. मात्र प्रसिद्धीच्या अभावामुळें ते मंदिर उपेक्षितच असल्यासारखेच आहे.

एखादा 'दण्डवते' अशा या प्रत्येक तीर्थक्षेत्रास लाभून ते प्रकाशांत यावे, अशी इच्छा शेवटी प्रदर्शित करतो.

८-२-१९७२
तळेगांव दाभाडे
(पुणे)

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

निवेदन

परमेश्वराच्या नामरूपगुणांच्या वर्णनासारखे अन्य श्रेय लेखणीस नाही. लेखणीच्या कर्तृत्वाचे सार्थक पूर्णत्वाने या स्थानीच होते. वेद–कालापासून ते आजकालच्या मोडातोडाच्या कालापर्यंतहि लेखणी या विषयावर जितकी झिजली असेल तितकी अन्यत्र क्वचितच. ईशश्रद्धा आजच्या काळातहि मंदावली नाही. देव, धर्म, राष्ट्र यांना झूट मानणारे भारतातील तथाकथित साम्यवादी निवडणुकीत विजयी होतांच तिरू–पतीस जाऊन श्रीची महापूजा करतात. प्रसंगी तेथील प्रथेनुसार मुंडन-हि करवून घेतात याचा अर्थ कोणता ? इतकेच काय पण रशियात देखील बायबलाची कित्येक लाखांची आवृत्ति हातोहात संपते याचा अर्थ तरी दुसरा कोणता ? अमेरिकेतील कथा तर आणखी विलक्षण आहे. विज्ञान व सुखोपभोगांच्या शिखरावर असलेल्या या राष्ट्रातील तरूण पिढी ' हरे राम हरे कृष्ण ' हा नामघोष करीत रस्त्यातून दिंडी काढून हिंडते. इतकेच नव्हे तर आजच्या संघर्षसंकुल जगातून मानव-जातीला वाचविण्यासाठी श्रीनृसिंह व श्रीमहाकाली यांची उपासना करते.

माझें उपास्य दैवत व कुलस्वामी श्रीनृसिंह व त्याचे स्थान श्री क्षेत्र नीरा–नरसिंहपूर यांवर सप्रमाण माहितीवर आधारित असे क्षेत्र-वर्णनपर पुस्तक लिहावे असा मनोदय फारा वर्षापासूनचा होता. त्या–प्रमाणे यत्न व विचार चिंतन चालू होतेच. त्याप्रमाणे उपलब्ध माहि–तीच्या आधारे मी हे पुस्तक लिहिले आहे. यापेक्षांहि अधिक माहिती प्रयत्नान्ती उपलब्ध होईल यांत संदेह नाही. आधाराशिवाय कांहीहि लिहिलेले नाही. क्षेत्राचा इतिहास व तेथील विविध माहिती देण्याचा हेतु या लेखनात आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे या संस्थेच्या पाक्षिक सभेत नीरा–नरसिंहपूर हा माझा माहितीपर निबंध दि. १४–७–१९६५ रोजी वाचला गेला. महामहोपाध्याय सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी आपल्या प्राचीन भारतीय स्थलकोशात या निबंधाचा संक्षेप समाविष्ट केला, हे या निबंधाचे यश होय. यानंतर नीरा–नरसिंहपूर या विषया–वर श्रीनृसिंहजयंतीनिमित्य माझे दोन लेख प्रसिद्ध झाले. पहिला पुणे येथील तरुण भारत या दैनिकाच्या दि. ४–५–१९६६ च्या अंकात व दुसरा नाशिक येथून प्रसिद्ध होणाऱ्या भालचंद्र मासिकाच्या मे १९६९ च्या अंकांत. प्रस्तुत पुस्तक हे या विषयावरील माझे पांचवे लेखन आहे. बरीच नवोपलब्ध माहिती यांत समाविष्ट केलेली आहे.

श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान नीरा-नरसिंहपूर विकास व उत्कर्षमंडळ या संस्थेच्या विद्यमाने हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. या मंडळाचे चिटणीस व माझे परमस्नेही श्री. प्रभाकर सुरु यानी मजवर हा जो लोभ दाख–विला त्यास हे पुस्तक पात्र ठरावे.

जीवनातील मांगल्याचे उद्गाते व मराठीतील एक शैलीकार साहित्यिक सन्माननीय गोपाल नीलकंठ दांडेकर यांनी प्रस्तुत पुस्तकाचे हस्तलिखित अवलोकून मजला आशिर्वाद दिला यांत धन्यता वाटते.

प्राचार्य नरहर गोविंद तथा नानासाहेब सुरु पुणे, यांनी श्रीक्षेत्री-

च्या अनेक कार्यांत वडिलकीने लक्ष घातलेले आहे. या पुस्तकाचे कामहि त्यानी आपले मानले आहे.

सोलापूर येथील अरूणोदय प्रिंटींग प्रेसचे मालक प्रभाकर श्रीनिवास तथा बाळासाहेब काकडे हे या पुस्तकाचे मुद्रक आहेत. मुद्रणकार्य त्यांनी सर्वांगसुंदर केले हे त्यांच्या व्यवसायकौशल्याबरो–बरच नृसिहश्रद्धेचे प्रत्यंतर आहे.

वरील पितृतुल्य नानासाहेब आणि बाळासाहेब हे उभयतां मूळचे रहाणारे नरसिंहपूरचेच. नीरा–नरसिंहपूर हे ग्राम व नृसिंह हे नाम याविषयी स्थिर श्रद्धा मनात बाळगणाऱ्या व जनात व्यक्तविणाऱ्या वडील पिढीतल्या या उभयतांच्या सांगाती या पुस्तकाच्या निमित्ते काम करता आले याविषयी मला पुढीलाला मनस्वी आनंद वाटतो.

कांहीं उपयुक्त सूचना केल्याविषयी गु. पांडुरंग रघुनाथ व्यास, तेर तसेच या पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करून दिल्याविषयी मि. त्र्यंबक नरहर झाडे, तडवळे यांचा ऋणपूर्वक उल्लेख करणे अगत्याचे वाटते.

श्री. खंडेराव रामराव तथा बापूसाहेब विंचूरकर पुणे, यांनी या लेखनासाठी मला कांही महत्वाची साधनसामुग्री उपलब्ध करून दिली. त्याविषयीं त्यांचा ऋणनिर्देश करणे हे मी माझे कर्तव्य मानतो.

छायाचित्रकार श्री. पी. आर. शिंदे पुणे तसेच छायाचित्राचे ठसे आणि मुखपृष्ट बनविणारे मुंबईचे कलाकार श्री. श्रीरंग सदाशिव नणदीकर या उभयतांच्या कलाकृतींनी या पुस्तकाचे स्वरूपसौंदर्य निश्चितच वाढलेले आहे. माझ्या शब्दांना कांही ठिकाणी जे सांगता आलेले नाही ते या उभयतांच्या छाया-प्रकाशाने सांगितलेले आहे.

नीरा–नरसिंहपूर येथील विद्वान् ब्राह्मणांच्या परंपरेतील शेवटचा दुवा वे. मू. शामराज वांकर यांच्या निधनाने तुटला. वैदिक परंपरेचा एक तेजस्वी अध्याय येथे संपला. क्षेत्र व तेथील परंपरा याविषयीचा आत्यंतिक अभिमान त्यांचे ठायी वसत होता. या पुस्तकाचे मूर्त स्वरूप

पहाण्यास ते आज आपणात नाहीत हे दुःख विसरणे अवघड आहे. तथापि त्यांतहि समाधानाची गोष्ट अशी की, या पुस्तकाचे हस्तलिखित मी त्यांना वाचून दाखविले होते. पुस्तक परिपूर्ण असल्याचा त्यांचा अभिप्रायहि त्यांनी व्यक्तविला होता. या पुस्तकांत असणारी बरीच माहिती मला त्यांचेकडूनच मिळालेली आहे.

या पुस्तकाच्या संदर्भात सांगावयाचे ते हे आणि इतकेच की, यांत भक्ति व श्रम याखेरीज माझे स्वतःचे असे काहीच नाही. भक्त प्रल्हादापासून ते अच्युतकाका वांकरापर्यंत जे ज्ञात व अज्ञात नृसिह–भक्त होऊन गेले, त्यांनी जे कर्तृत्व सिद्ध केले त्या नृसिंहभक्तांच्या इतिहासाचे हे गुणगान आहे. तस्मात् त्यापासून मी एखादी अपेक्षा कां करावी ? या पुस्तकाच्या विक्रीपासून मिळणारे धन श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान नीरा–नरसिंहपूर विकास व उत्कर्ष मंडळ या संस्थेस मिळावे.

श्रीनृसिंहाचा मी एक पूजाधिकारी आहे. श्रीनृसिंह क्षेत्रवर्णनपर हे माझे पांचवे लेखन आहे. श्रीनृसिंहाची मी ही केलेली पंचोपचारे पूजाच होय. ही नेटकी बांधली गेलेली आहे असे नृसिंहभक्तांना वाटले तर ते या भक्तीचे आणि श्रमाचे साफल्य झाले असे मी समजेन.

विनीत
गोविंद हरि दंडवते

श्रीनृसिंह जयंति
शके १८९४
कसबे तडवळे (सोलापूर.)

या पुस्तकासाठी तसेच मंडळाच्या अंगीकृत कार्यासाठी संपर्कस्थान. —

श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान
नीरा – नरसिंहपूर

उत्कर्ष मंडळ
मधुरंजन, जंगली महाराज पथ,
पुणे – ४

श्रीक्षेत्र

नीरा - नरसिंहपूर

(१)

यत्र श्रीमान्नरहरिः कैवल्याद्यखिलार्थद |
भक्तानुग्रहवानास्ते स्वरूपोऽरूपवानपि ||

मृत्युंजय सावरकरविरचित श्रीनृसिंहसूक्त

" विजयनगरच्या सिंहासनाचे कुलदैवतच नृसिंह हे होते. विजयनगरच्या ज्या ज्या राजांनी आपले कुलदैवत, आपला आदर्श, आपले उपास्य अनेक देवातून व दैवतातून नृसिंह हाच निवडला त्यांची प्रतिभा आणि समयज्ञता ही निःसंशय वाखाणण्यासारखी होती.

कारण त्या काळातील हिंदूंचा बुद्धकालापासूनच अतिरेकी अहिंसेच्या खुळापायी सौम्य, नेभळट व सोसाळू होत आलेला समाज आणि त्याच्यावर तुटून पडलेला मुसलमानांचा धर्मांध, क्रूर नि नृशंस समाज यांच्या संघर्षात प्रसंगोचित प्रत्याघातक कूट राजनीति आणि शत्रूस थरकांपविणारा पराक्रम यांना हिंदूंच्या अंगी स्फुरविणारे जागृत दैवत जर आम्हां हिंदूंच्या पुराणांतरी कोणते एखादे आढळणारे असेल तर ते श्रीनृसिंहाचेच होय.

व्रजन्ति ते मूढधियः पराभवम्
भवन्ति मायाविषु ये न मायिनः /
साध्वाचारो साधुना प्रत्युपेयः
मायाचारो मायया बधितव्यः ||

नृसिंहाची कथाच सांगते की, प्रल्हादाच्या सद्गुण विकृतीने नव्हे तर तो क्रूर राक्षस कूटनीतीनेच मारला गेला. हिरण्यकश्यपूला ब्रह्मदेवाने 'तुला दिवसा किंवा रात्री, ना आंत ना बाहेर, आकाशांत वा पृथ्वीवर, शस्त्राने वा अस्त्राने, पशू वा मनुष्य कोणीही मारू शकणार नाही' इत्यादि जे वर दिले त्या सर्वांवर जशाच्या तशा पुढील अनुक्रमें विस्मयकारक तोडा काढून हिरण्यकशिपूला संध्याकाळी, उंबऱ्यावर ओढून, मांडीवर उताणा पाडून स्वतःच्या करकच नखाग्रांनी त्याचे पोट फाडून ना पूर्ण नर ना पूर्ण पशू असे नृसिंहस्वरूप घेऊन त्या देवांच्या शत्रूस ठार केले. त्या दुष्ट दैत्याच्या अंगातून उडणाऱ्या रक्ताच्या कारंजाने ज्याच्या साऱ्या देहास रक्तस्नान घडले आहे, ज्याच्या भयंकर सिंहगर्जनांनी सारा ब्रह्मांडकटाह अगदी गडगडून गेला आहे, आणि ज्याच्या क्रोधाविष्ट, उभारलेल्या नि उगारलेल्या आयाळाचे सटाने अक्राळविक्राळ दिसणाऱ्या सिंहस्वरूपास पाहून देवहि भयाने थरथर कांपत आणि 'शांत हो ! शांत हो !' म्हणून प्रार्थना करू लागले आहेत अशी ती नृसिंहाची अक्राळविक्राळ मूर्तीच ह्या संघर्षसंकुल राक्षसी जगांत ज्या राष्ट्राला जगावयाचे असेल त्याने आपले उपास्यदैवत मानून आणि राष्ट्रीय पराक्रमाचा आदर्श म्हणून आपल्या राष्ट्रमंदिरांत पूजिली पाहिजे.

या कथेत अजूनही एक अत्युदार मर्म अनुस्यूत आहे. ते हे की, वरील सिंहासारखा निर्दय नि अनिवार्य पराक्रम करणाऱ्या ह्या नृसिंहावताराचे मूर्त स्वरूप जरी असले अक्राळविक्राळ असले तरी त्याचे अंतःकरण हे नराचे आहे मानवतेचे आहे. त्याचा तो क्रूर पराक्रमही मानवतेच्या विकासाला अत्यंत आवश्यक असाच आहे. अनिवार्य म्हणूनच आहे. कारण देव, दैत्य व दानवांचाही थरकाप उडविणारे, त्या अन्यायी लोकप्रपीडक नि देवद्रोही हिरण्यकशिपूचे पोट फाडून त्याला ठार करणारे अत्युग्र कृत्यहि देवपूजक म्हणून दैवी, न्यायी अशा प्रल्हादासारख्या सज्जनाच्या रक्षणासाठीच अपरिहार्य म्हणूनच काय ते आचरले गेले होते. मानवी सद्गुणांच्या विकासासाठीच मानवांना जी दुबळेपणाच्या शापाने पंगु बनविते अशा अहिंसेचा प्रसंगी क्रूर हिंसेनेही बळी घेतला

पाहिजे, तेच मानवी विकासार्थ अशा प्रसंगी सत्कर्म, सद्धर्म असते. जगांतील मनुष्यजातीच्या त्या काळच्या अपूर्व विकासाच्या पातळीवर राक्षसी हिंसेने आणि स्वार्थी महत्वाकांक्षेने पछाडलेल्या राष्ट्राराष्ट्राच्या शत्रूधुमाळीच्या परिस्थितींत हिंदू राष्ट्रालाही आपले अस्तित्वच नव्हे तर अजिक्यत्वहि स्थापित करण्यासाठी नृसिंहासारखेंच उपास्यदैवत असले पाहिजे होते."

(समग्र सावरकर वाङ्मय खंड ४, प्रथमावृत्ति १९६५ पृ. ८६८, ६९, ७०, भारताच्या इतिहासांतील सहा सोनेरी पाने, पान पाचवे)

श्रीविष्णूचा चतुर्थावतार, श्रीनृसिंह

श्रीनृसिंह व राष्ट्र यांचा संबंध स्वा. सावरकरांनी सिद्ध केल्या-प्रमाणे असा अतूट आहे. श्रीनृसिंहाची स्थाने आपल्या राष्ट्रांत अनेक आहेत. महाराष्ट्रांतही आहेत. प्रत्येक स्थानाचे माहात्म्य व अवतार-संदर्भ वेगवेगळा आहे.

श्रीनृसिंहाचा अवतार झाला तो मुलस्थान क्षेत्री. हें क्षेत्र मुलतान या नांवाने आज पाकिस्तानांत आहे. हिरण्यकश्यपूची राजधानी तीच होती. त्याचा वधहि तेथेच झाला. दुष्ट दैत्याचा वध व प्रल्हादासारख्या सज्जनाचे रक्षण करावयाचे म्हणून तर भगवान महाविष्णूनी श्रीनृसिंह-रूपे चतुर्थावतार घेतला.

श्रीक्षेत्र नीरा-नरसिंहपूर, स्थान आणि माहात्म्य

हिरण्यकशिपूचा वध करण्यापूर्वीचीं ही एका नृसिंहक्षेत्राची कथा आहे. हे स्थान नीरानृसिंहक्षेत्र या नांवाने प्रसिद्ध असून पुणे जिल्ह्यात आहे. पुणे जिल्ह्याचे आग्नेय दिशेचे हे शेवटचे अग्र. क्षेत्राच्या एका बाजूने नीरा नदी, दुसऱ्या बाजूने भीमा नदी व तिसऱ्या बाजूस या उभयतांचा संगम. तीन बाजूंनी पाणी व एका बाजूस जमीन असे हे रमणीय स्थान.

येथील श्रीनृसिंह हा महाराष्ट्र, म्हैसूर आणि मध्यप्रदेश यांतील अनेक नृसिंहभक्तांचा कुलस्वामी आहे. या सर्व भक्तांचे श्रीनृसिंह हे अधिष्ठान आहे. ते या क्षेत्रास मानतात. इतकेच काय पण हा ज्यांचा कुलस्वामी नाही अशाहि अनेकांना क्षेत्राचे महात्म्य व रमणीयता जाणवली व ती त्यांनीं मान्य केली. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, विख्यात नेते नरहर विष्णु गाडगीळ, ह. भ. प. सोनोपंत दांडेकर, औंध संस्थानाधिपति भवानराव पंतप्रतिनिधि यांनी अर्वाचीन काळांत या क्षेत्रास स्तुतिसुमने वाहिली.

ऋग्वेदात वर्णिलेले नीरा-नरसिंहपूर

ऋग्वेदांतील प्रथमाष्टकी, सप्तमाध्यायी, दुसऱ्या वर्गांत 'व्दे विरूपे चरतः' शब्दारंभित अकरा ऋचांचे सूक्त आहे. हे सूक्त श्रीनृसिंहाच्या मंत्रराजपदांशी संबंधित असून हे नीरानरसिंहपूर व तेथील श्रीनृसिंहमूर्तीस अनुलक्षून आहे, असे त्या सूक्ताचें भाष्यकार वै. कृष्णाचार्य दंडवते यांनी सप्रमाण सिद्ध केलेले आहे. त्यात भाष्यकार म्हणतात –

सूक्तं यत् व्देविरूपे इति विमलतरास्वृक्षुचैकादशर्च
तस्याप्यानुष्टुभो यो विलसति नृहरेर्मंत्रराजः सुवर्चाः ।
सोऽयं स्वस्मिन् यमेकादशभिरिह पदैरर्थमाविष्करोति
तं कृष्णाख्यो हि नीरानृहरिपरमिमं बालबोधं करोति ॥

हरेः प्रेरणया शक्त्या कृपया च तथेच्छया
श्रुतिण्याख्याप्रवृत्तिर्मे न स्वबुद्धिविलासतः ।
सूक्तस्यास्य ऋषिः कुत्सः छंदस्त्रिष्टुप् तथैव च
श्रीमन्नीरानृसिंहोऽसौ देवताऽत्र समीरिता ॥

मूळातूनच अवलोकावे, अभ्यासावे असे हे भाष्य आहे.

श्रीविष्णूचा ब्रह्मदेवावर अनुग्रह

कल्पान्त झाला होता. क्षीरसागरी श्रीमहाविष्णु पहुडले होते.

जगदुत्पत्ति करावी अशी इच्छा श्रीविष्णूंच्या मानसी उत्पन्न झाली. तिचे मूळ तात्काळ त्यांच्या नाभिस्थानांतून कमलरूपे निर्माण झाले. त्या कमलांतून ब्रह्मदेवांचा जन्म झाला. आपल्या जन्माचे मूळ शोधावे अशी इच्छा ब्रह्मदेवाघ्या मनी निर्माण झाली. पण ते त्यांना सांपडेना. म्हणून त्यांनी तप केले. ते फळास आले. श्री विष्णूंनी ब्रह्मदेवांस दर्शन दिले. त्यांनी ब्रह्मदेवांना गुह्यज्ञान सांगून त्यांचेवर अनुग्रह केला. तो याच नीरानृसिंह क्षेत्री. ब्रह्मदेवांनी श्रीविष्णूंची स्तुति केली. तिने प्रसन्न होऊन श्रीविष्णु 'वरं ब्रूहि' म्हणतांच ब्रह्मदेव म्हणाले, "लोककल्याणार्थ आपण महीतलावर निरंतर वास्तव्य करावें." श्रीविष्णूनी आश्वासिले.

नीराभीमांबु-कल्लोले विहरामि सुरेश्वर

श्रीविष्णूंच्या या वास्तव्याला अधिष्ठान हवेच होते. ते स्वतः ब्रह्मदेवांनीं निर्माण केले. त्यांनी श्रीविष्णूंची नृसिंहस्वरूपी मूर्ति केली व त्या मूर्तीत नित्य वास्तव्य करण्याविषयी श्रीविष्णूस प्रार्थिले. 'तथास्तु' म्हणून श्रीविष्णू अंतर्धान पावले.

श्रीशामराज मूर्ति

नरसिंहपुरी श्रीनृसिंहाच्या दोन प्रमुख मूर्ति आहेत. पैकी शाम-राज नामे प्रसिद्ध असलेली मूर्ति ब्रह्मदेवकृत असून ती प्रल्हादकृत मूर्तीच्या डावे बाजूस उत्तराभिमुख अशी स्थापित आहे. ही मूर्ति पाषाणाची असून हिचे प्रल्हादकृत मूर्तीशी बरेच साम्य आहे. प्रल्हादकृत मूर्तीपेक्षां हिचा रेखीवपणा कमी असला तरी माहात्म्य कमी नाही. कारण पुढे विठ्ठल शिवदेवांनी श्रीमंदीर बांधल्यानंतर जो शिलालेख कोरविला तो याच मूर्तीच्या सिंहासनावर. श्रीनृसिंहाची हीच मूर्ति सर्वांत प्राचीन होय.

सकळ विश्व आंदोळले । धर्म गेला

जगावेगळी तपश्चर्या, तीतून अफाट सामर्थ्याची प्राप्ति व तदनंतर

त्या सामर्थ्याचा उपयोग मात्र दुष्टाव्यासाठी, विध्वंसनासाठी ही तर दैत्यकुळाची ब्रीदे.

असाच तो त्रिपुरासूर.

त्यानें प्रत्यक्ष विधात्यालाच प्रसन्न करून घेतले. तो प्रसन्नावला मात्र. तोंच त्रिपुरासुराने अंतरिक्षात तीन पुरे निर्माण केली. पुढची कथा उघड आहे. ऋषिमुनींचा छळ, यज्ञयागांचा विध्वंस, गोब्राह्मणांचा निःपात, सज्जनांचे निर्दालन, आणि देवांचे नष्टचर्य.

पृथ्वीप्रलयाच्या प्रारंभास आणखी काय हवे होते ? त्रस्त देव भगवान शंकरांना शरण गेले. त्यांनी 'त्राहि माम्' म्हणून शंकर प्रार्थिला, त्रिपुरांतक व्हावे म्हणून विनवणी केली.

काम अशक्य नव्हते पण अवघड मात्र होते.

भोळ्या शंकराने भोळी युद्धसिद्धता केली. या भोळ्या युद्धाची सांगता त्रिपुरासुराच्या अंताने व्हावयाची होती.

ही भोळी युद्धसिद्धता अशी.

सह्य पर्वताचा रथ, अश्वस्थानी चार वेद, सारथि वरदाता ब्रह्मा, बाण भगवान श्रीविष्णु. या बाणाची शक्ति तिप्पट झाली. कारण त्याच्या अग्रस्थानी अग्नि, पृच्छस्थानी वायु, आणि या संहाराची उत्कटता भयानक व्हावी एतदर्थ त्यांवर पाशुपतास्त्राचा मंत्रप्रयोग शंकरांनी केला.

शंकराच्या धनुष्याची प्रत्यंचा टणकारली. बाण सुटला मात्र ....

आणि या एकाच बाणात त्रिपुरासूर तीन पुरांसह पडला. हें भीषण नाट्य घडले ते कार्तिकी पौर्णिमेदिवशी. शारदीय चांदण्याच्या पार्श्वभूमीवर.

त्रिपुरासूर संपला पण देवांचे नष्टचर्य अजून संपले नव्हते. कारण शंकरांचा क्रोध संपेना. त्यांच्या अंगाचा अमर्याद दाह सुरू झाला.

परिणामी त्यांचे रूद्रस्वरूप प्रगटले. विश्वास ते असह्य झाले. शंकरांच्या मस्तकी गंगा, भाळी चंद्र, गळयांत फणिवर ही सर्व होतीच. तरीहि दाह थांबेना व क्रोध आवरेना.

या क्रोधाने निर्माण झालेली धर्मधारा जलरूपे वाहू लागली. हीच भीमा. ती रथाचलावर प्रगटली म्हणून तिला भीमरथी म्हणतात.

भीमेची जन्मकथा इथे संपली. पण शंकरांचा क्रोध संपेना. दाह थांबेना. त्रिपुरासुराचा वध होऊनहि देव मात्र भयमुक्त झाले नाहीत. ' त्राहि माम् ' हा त्यांचा जप चालूंच राहिला. आतां देव शरण गेले ते श्रीविष्णूंना.

श्रीविष्णू देवांना म्हणाले

अस्ति तत्र सरित्पुण्या भीमा भीमांगसंभवा ।
नीराकारं वपुः कृत्वा विधास्ये तत्र संगमम् ॥

श्रीविष्णूंनी नीरेचे रूप धारण केले तेहि सह्याद्रींच्याच एका उपांगात' भोरजवळ. विष्णुरूप नीरा वाहू लागली. शिवस्वरूपी भीमा वहातच होती. दोन्हीही जलप्रपात वाहू लागले.

श्रीक्षेत्र नरसिंहपुरी देवांनी विमानांतून पुष्पवृष्टि केली. कारण इथे नीरा भीमेला मिळाली. त्यांचा संगम झाला. हरिहराची भेट झाली. शंकरांचा क्रोध शांतला. दाह संपला.

इयं भीमा महादेवो नीरा साक्षाद्रमापतिः

देव उद्गारले.

ब्रह्मदेव, विष्णु व महेश अशा तिघांचाही प्रादुर्भाव या क्षेत्री अशा रीतीनें झाला. नीरा व भीमा यांचा संगम या स्थानास क्षेत्रत्व देण्यास कारणीभूत झाला.

नीरेस आपल्यात सामावून घेऊन भीमा उभय तिराना पुनीत करीत करीत पुढे निघाली. पंढरपूर, गाणगापूर ही तीर्थक्षेत्रे तिच्याच कांठावर वसली. पुढे ती कृष्णेस मिळाली.

इंद्राची मूलस्थानावर स्वारी

भगवान महाविष्णूंनी वराह हा तिसरा अवतार धारण करून हिरण्याक्षाचा वध केला. बंधुवधाने संतप्त होऊन हिरण्यकशिपूने अत्युग्र तपश्चर्या करून ब्रह्मदेवाकडून अनेक वर मिळविले, मग मात्र तो पिसाळला. उन्मत्त हिरण्यकशिपूने देवाशी उघड उघड वैर मांडले. देवांचा राजा जो इंद्र तो देखील हिरण्यकशिपूच्या या करणीने हबकला. हिरण्यकशिपूचा निर्वंश करावा हा हेतु मनी धरून इंद्राने एक कृति केली. हिरण्यकशिपू राजधानीत नाही हे पाहून इंद्राने राजधानीवर स्वारी केली व हिरण्यकशिपूची गर्भवती सतिपत्नि कयाधू, तिचे हरण केले या कयाधुसह इंद्र स्वलोकी जात असतांनाच महर्षि नारदांनी इंद्राची भेट घेऊन त्याला सांगितले, "देवेंद्रा ! या सतीस यत्किंचितहि पीडा करू नकोस. हिच्या गर्भस्थ महान् भगवद्भक्त असून त्याच्या रक्षणार्थ श्रीमहाविष्णू अवतार घेतील". नारदांची ही आज्ञा इंद्राने शिरसावंद्य मानली व कयाधूस नारदांच्या आश्रमांतच ठेवून त्याने प्रयाण केले.

भक्त प्रल्हादाची तपश्चर्या

महर्षि नारदांचा आश्रम नरसिंहपुरीच भीमेच्या काठी कोटीतीर्थावर होता. सति कयाधु तिथेच प्रसूत झाली. महान् भगवद्भक्त प्रल्हाद जन्मास आला.

नारदांच्या आश्रमांतील प्रल्हाद म्हणजे जणुं सुगंधित सुवर्ण. नारदांनी त्याला नीरा भीमा संगमी 'ॐनमो नारायणाय' हा मंत्रोपदेश देऊन गुह्यज्ञान सांगितले.

प्रल्हाद हा नवविधा भक्तीचा आद्य उद्गाता होय.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

हे भक्तिसूत्र त्यानेच रचिले व स्वतः तृतीय भक्तीचा परमोत्कर्ष होऊन

राहिला. आद्यभक्त नारदापासून ते अर्वाचीन दासगणू महाराजापर्यंत सर्वांनीच ज्याला मानाचे मुजरे केले त्या प्रल्हादाचे स्थान ध्रुव झाले.

असा हा प्रल्हाद नित्य नीराभीमासंगमी जाऊन तेथे तप करी. त्याने तेथील वालुकेची नृसिहमूर्ति करून तिची मनोभावे अर्चना करावी. एके दिनी तप फळास आले आणि

सोमश्रवण योगे तु प्रल्हादस्य हरिः स्वयम्
दर्शयामास सत्‌रूपम् ।

श्रीनृसिहानी प्रल्हादास ' वरं ब्रूहि ' म्हणताच तो बालभक्त म्हणाला,

स्वामिन्ननेन रूपेण विशास्यां प्रतिमां भुवि
ये भजन्ति समर्चन्ति मानवाः प्रणमन्ति ये ।
तेषामभीष्टकामानां पूरको भव सर्वदा ॥

श्रीनृसिहानी प्रल्हादास अंकी घेतले. त्याचे वदन कुरवाळले. गद्‌-गद्‌ स्वरात श्रीनृसिह संतोषाने वदले.

" तथास्तु प्रतिमायां ते स्थास्याम्यत्र निरंतरम् ।
पालयिष्यामि सुजनान्‌ दर्शनादेव सद्वरैः " ॥

प्रल्हादकृत श्रीनृसिहमूर्ति

नरसिहपुरी देवालयांत तीच नृसिहमूर्ति सिंहासनावर सांप्रत विराजमान आहे. ही मूर्ति पश्चिमाभिमुख आहे. ही वालुकेची मूर्ति वीरासनस्थ–उजवा पाय गुडघ्यात मुडपून उभा, डाव्या पायाची मांडी घातलेली, सव्य हस्त उजव्या गुढघ्यावर, वाम हस्त कमरेवर–आहे. रूंद छाती, बारीक कमर, मुख सिहसदृश रूंद व उग्र, बसकट नाक, रूंद जिवणावळ, भव्य डोळे अशी उग्र चर्या आहे. मुख, छाती, कमर ही केवळ सिंहसदृश तर हातपाय मानवी वाटतात.

या मूर्तीतून कोणते भाव प्रतीत होतात हे सांगण्यास केवळ श्रुत्यादिच समर्थ आहेत.

सिंहो न भीमो मनसो जवीयान

अभक्तानां सिहो न । सिंह इव भीमः भीषणः । भक्तानां तु सिंहोऽपि न भीमः न भीषणः ।

उग्रोऽप्यनुग्र एवायं स्वभक्तानां नृकेसरी ।
केसरीव स्वपोतानामन्येषामुग्रविग्रहः ॥

दक्षिण प्रयाग नीरा-नरसिंहपूर

उत्तर भारतांतील प्रयागक्षेत्री गंगायमुनांचा संगम तर येथे नीरा-भीमांचा संगम, तेथे सरस्वती गुप्तरूपे तर येथे श्रीलक्ष्मी मंदीराच्या शिखरातून स्त्रवणारी गुप्त गंगा. म्हणूनच की काय पद्मपुराण म्हणते–

प्रयागमीति विख्यातं प्रयागात् कोटिपुण्यदम् ।

संगमनिकटी भीमा किंचित् दक्षिणवाहिनी तर नीरा किंचित् उत्तरवाहिनी होऊन एकमेकांत सामावल्या.

नीरा भीमा संगम

निरा-भीमा संगमस्नानाचे महत्पुण्य पुराणांतरी सांगितले आहे. संगमात स्नान केले कीं, सर्व तीर्थांच्या स्नानांचे पुण्य लाभते. इतकेच काय पण

नीरा भीमरथी योगे स्नातस्यांगेषु बिंदवः
तावंत्यब्दसहस्त्राणि वसतिः स्मर्यते दिवि ।
इयं भीमा महादेवो नीरा साक्षाद्रमापतिः
उभयोः संगमो यत्र तत्रैवात्वंतिकी गतिः ।
सर्वेयं तीर्थरूपाभूः सर्वदेवमयो हरिः
सर्वांगमरसा भीमा नीरा सर्वफलौघिनी ।
अत्र तीर्थानि सर्वाणि मंत्रा अत्र प्रतिष्ठिताः
देवता नृहरिर्यत्र किमन्यदवशिष्यते ।

खेरीज, संगमाची नैसर्गिक रमणीयताहि मनाला आगळाच आनंद देऊन जाते. सोळखांब्यावर अश्वत्थनारायणाकडे पाठ करून हें दृश्य पहावे. डाव्या बाजूने संथ वहाणारा भीमेचा धूसर व प्रगल्भ प्रवाह व तिचे रुंद पात्र, उजव्या बाजूने खळखळाट करीत वहाणारे नीरेचे स्फटिक निर्मल जल, भीमेच्या पात्रांतील चकाकणारी पांढरी शुभ्र वाळू तर नीरेच्या पात्रातील काळेपणाने चमकणारी वाळू, नीरेच्या कांठावरील उंच डोंगरकडा व त्यावरील टुमदार खेडे, त्याचें नांवहि संगमच. नीरेभीमेचा संगमप्रवाह वळणावळणानें दूरवर गेलेला, त्याच्या दोन्ही बाजूस वृक्षराई, संगमनिकटी असलेली विनायक, जानकेश्वर, अश्वत्थनारायणाची छोटीमोठी मंदिरे, मंदिरामागचा अश्वत्थ व वटवृक्ष, त्यांच्या पानांची सळसळ, वटवृक्षावर स्वतःस उलटे टांगून घेतलेल्या वाघुळांचे थवे, प्रवाहाचा नाद व पानांचा आवाज या खेरीज निरव शांतता असे हे स्थान मनाची एकाग्रता घडवून आणते.

एरव्ही खळखळाट करीत वहाणारी नीरा भीमेला भेटतांच आपला अवखळपणा सोडून देते. पावसाळ्यांत पूर आल्यानंतर एकमेकांवर आदळणाऱ्या या दोन्ही जलप्रवाहाचे रौद्र स्वरूप हिवाळ्यात लडिवाळ बहिणींच्या प्रेमाची आठवण करून देते तर उन्हाळ्यात या दोघींचे कृश सौंदर्य पावसाळयांतील कलहाचा पश्चात्ताप झाल्याचे दर्शविते. पावसाळ्यांत कृष्णपक्षातील रात्री मुसळधार पडत्या पावसात चमकलेल्या विद्युत् प्रकाशांत दिसणारे दोन्ही नद्यांचे रौद्र सौंदर्य, हिवाळ्यात पहाटेच्या कडक थंडीत धूसर धुक्यातून दिसणारे अवगुंठित सौंदर्य, तर उन्हाळ्यात पौर्णिमेच्या रात्री दिसणारे प्रशांत आणि मार्जित सौंदर्य ही व अशी सौंदर्यरूपे पहाण्यास रसिक मात्र हवा.

नीरा नदीवरील तीर्थे

नीराभीमा संगमावरून नीरेच्या प्रवाहाच्या उलट दिशेने वर जातांना नीरा नदीवर जी तीर्थे लागतात ती व त्यांचे महात्म्य अनुक्रमें असे आहे.

लक्ष्मीतीर्थ – हे देवालयाच्या पश्चिम दरवाजाचे डावे बाजूस

आहे. येथील घाटास लक्ष्मीघाट असे म्हणतात. घाटावर श्रीलक्ष्मीचे देवालय आहे. या स्थानी लक्ष्मीने तपश्चर्या केल्याने तिचा चंचलत्वाचा दोष निघून गेला. शुक्रवारी या तीर्थाचे स्नान व तेथील श्रीलक्ष्मीचे पूजन यांचा महिमा विशेष आहे.

हा लक्ष्मीघाट वामनराव देवराव देशमुख यांनी बांधविला व नारायण बळवंत जोशी यांचे नेतृत्वाखाली हें बांधकाम पार पडले.

पद्मतीर्थ – लक्ष्मीतीर्थाच्या वरच्या बाजूस हे तीर्थ आहे. चंचलत्व-दोषपरिहारार्थ लक्ष्मीने तप केले, तेव्हां श्रीनृसिंह प्रसन्न झाले. भगवद्दर्शनाच्या प्रेमानंदाने लक्ष्मीच्या हातांतील पद्म या स्थानी गळून पडले. तसेच कुबेराला धनप्राप्ति याच स्थानी झाली.

शंखतीर्थ – श्रीनृसिंहाचे शंख नावाचे आयुध या ठिकाणी वास्तव्य करते. कुबेराला शंख नामक निधि येथेच प्रात्प झाला.

गदातीर्थ – श्रीनृसिंह गदाधररूपानें या ठिकाणी वास्तव्य करतात.

पिशाचमोचनतीर्थ – पितर पिशाचयोनीतून मुक्त होण्यासाठी या तीर्थावर स्नानविधी करण्याविषयी सांगितले आहे. नारायण–नागवलीतील एक विधि या ठिकाणी केला जातो.

गरूडतीर्थ – या स्थानी गरूडानें तप केल्यानें त्याला अजिक्य सामर्थ्याची प्राप्ति झाली. नंतर त्याने प्रत्यक्ष विष्णूशीच युद्ध केले. त्याच्या युद्धकौशल्यानें प्रसन्न झालेल्या श्रीविष्णूंनी त्याचा वाहन म्हणून स्वीकार केला.

श्रीनृसिंहतीर्थ – हिरण्यकशिपूचा वध केल्यानंतर श्रीनृसिंहानी या स्थानी वास्तव्य केले. हे स्थान अत्यंत एकांत रम्य असून तेथे नीरेवर घाट बांधलेला आहे. त्यास नृसिंहघाट असे म्हणतात. घाटावर डोंगर कपारीतील मंदीरांत श्रीनृसिंहाची तांदळास्वरूपी मूर्ति आहे. बाजूस यात्रेकरूसाठी ओवऱ्या बांधलेल्या असून त्यापैकी एका ओवरीत

श्रीमारुतीची मूर्ति आहे. हे बांधकाम श्रावण शु॥ ५ शके १७७७ रोजी पूर्ण होऊन त्यास १२१ रुपये खर्च आला. नजिकच अश्वत्थवृक्ष आहे. येथील एकान्त तर इतका अद्भुत की, निरेच्या जलप्रवाहाच्या आवाजाशिवाय अन्य कोणताहि आवाज येथे ऐकू येत नाही. जगांत कांही कोलाहल आहे हे येथे पटणारहि नाही. येथे तपश्चर्या केल्याने चतुर्विध पुरूषार्थाची प्राप्ति होते.

इंद्रतीर्थ – वृत्रासुराच्या हत्त्येने इंद्राला जे पाप लागले त्या दोषापासून येथे स्नान केल्याने इंद्र दोषमुक्त झाला.

हंसतीर्थ – भगवान नृसिंहानी हंसरूप धारण करून या स्थानी ब्रह्मदेवाला ज्ञानोपदेश केला.

तारातीर्थ – या स्थानी महासति तारेनें तपश्चर्या केली व प्रभु रामचंद्राच्या अनुग्रहाने तिला दिव्यज्ञानप्राप्ति झाली.

दुर्वासतीर्थ – या स्थानी तप केल्यानें दुर्वास ऋषीला सिद्धी प्राप्त झाली.

कपिलतीर्थ – कपिल मुनींनी ऋषीमंडळीस सांख्यशास्त्राचा उपदेश या स्थानी केला.

या शिवाय मरिचि, ऋतु, सोम, वरुण, आश्विनी, अत्रि, अंगिरस दक्ष, धनद, निर्ऋति, पुलह, पुलस्त्य, वसिष्ठ, देवल, बृहस्पति, कुबेर, वायु, यम, अग्नि, वसु, भारव्दाज अशी प्रधान तीर्थे नीरेवर असून उपतीर्थे दर पांच हाताचे अंतरावर आहेत.

भीमा नदीवरील तीर्थें

भीमा नदीवरील तीर्थांचा अनुक्रम भीमेच्या प्रवाहाच्या दिशेने असा समजावा.

दुर्गातीर्थ – येथें दुर्गेचे स्थान आहे. नदीच्या प्रवाहाच्या डावे बाजूस एका डोंगरकपारीत छोटेसे देऊळ बांधलेले असून तेथे दुर्गेचा

तांदला आहे. हिलाच ईवराई असे म्हणतात. ही देवी मूळची कोकणांतील असून तेथून ती येथे आल्याची अख्यायिका आहे. डोंगरावर आणखी एक देऊळ असून तेथें शंकराचे स्थान आहे. यालाच विमलेश्वर असेहि म्हणतात. दुर्गातीर्थाच्या आसमंतात कालरूप, भीमानृसिंह, महानादेश्वर, कुरुक्षेत्र, स्थाणुमहेश्वर ही तीर्थे आहेत.

कोटीतीर्थ – महर्षी नारदांचा आश्रम या स्थानी होता. त्यांचा वास या स्थानी सर्वकाळ आहे. तेहतीस कोटी देवता व सर्व तीर्थे येथें वास करून श्रीनृसिंहाची उपासना करतात. शंकराची प्रसिद्ध ४३ स्थाने व तेथील तितक्याच स्थानदेवता कोटीतीर्थात वास करतात.

गोतीर्थ – कामधेनूने या स्थानी श्रीनृसिंहास स्वतोयाने अभिषेक केला. नजिकच चिंतामणीचे स्थान असून कल्पवृक्षसम अश्वत्थहि आहे.

भानुतीर्थ – भगवान श्रीसूर्यनारायणाची ही तपोभूमि. त्याला या स्थानीच ज्ञानप्राप्ति झाली. सूर्यग्रहण, संक्रमण पर्वकाळ, रविवार व रथसप्तमी या दिवशी येथील स्नानाचे महत्व विशेष आहे.

चक्रतीर्थ – भक्त प्रल्हादाच्या रक्षणार्थ भगवंतानी चक्र पाठविले त्याचा उदय या स्थानी झाला. चक्रावतार धारण करून श्रीनृसिंह येथें वास्तव्य करतात.

नंदकतीर्थ – या स्थानी श्रीनृसिंहानीं आपल्या नंदकनामे खड्गाची स्थापना केली.

पाशतीर्थ, लांगलतीर्थ, मौसलतीर्थ – श्रीनृसिंहाच्या या विविध खड्गांच्या वास्तव्यानीं पुनीत झालेली ही तीर्थे आहेत. याखेरीज महापद्म व महाशंख ही तीर्थे संगमासन्निध आहेत.

देवेभ्यं उत्तमं हविः

उत्तर भारतांतील सिंधु नदीच्या तिरावर आर्य विसावले होते त्यांना ही तेजस्विनी सिंधु फारफार आवडली. या सुरसरितेच्या तीरावर

त्यांना कित्येक वेदसूक्ते स्फुरली. कित्येक द्रष्टे याच सिंधूच्या तिरावर परिणतप्रज्ञ झाले.

आर्य अजून पुढे निघाले. पंचनदांच्या तीरावरून ' जेतारम पराजितं ' अशी ईर्ष्या मनी बाळगून दक्षिणेकडे सरकू लागले.

अनुल्लंघनीय वाटणारा विंध्य ओलांडणारा अगस्ति हा पहिला आर्य होय. अनेक आर्यकुले त्याला अनुसरली.

वाटेत त्यांना कित्येक पुण्यदा सरिता भेटल्या. त्यांचा प्रवास चालूंच राहिला.

एका भल्या पहाटे मंद चंद्रप्रकाशास साक्षी ठेवून ते अजून पुढे निघाले.

त्या रम्या प्रातःकाळी त्यानी पाहिले तो त्यांच्या डाव्या बाजूने भीमा व उजव्या बाजूने वहाणारी नीरा त्यांना दिसली. समोर त्या उभयतांचा संगम.

त्यांना अत्यंत आनंद झाला.

हे आर्यऋषि इथेंच थांबले. कित्येक वर्षें, त्यांना पुढे जावेसे वाटेचना. ऐशी यज्ञभूमि पुनः मिळेल याची खात्री वाटेना. संगमप्रिय आर्य येथेच स्थिरावले.

त्यांनी येथे यज्ञ सुरू केले. अवभृथस्नानास ते नीराभीमासंगमी जात. यज्ञांतील हविर्भाग भक्षून देवता संतुष्ट होत. एखादे आर्यकुल पुढे सरकताच दुसरे येथे येऊन पोहोचे. अशी किती नांवे सांगावीत ? वसिष्ठ, विश्वामित्र, वामदेव, भरद्वाज, ऋभु, ऋतु अगस्ति, कण्व, उत्तकदेवल, भार्गव, असित, अत्रि, पुलस्ति, दुर्वास, कपिल, असे कित्येक ऋषि यांनी येथे यज्ञ केले. अनेक यज्ञ, तितक्याच देवता. तितक्याच प्रकारची हविषे.

यज्ञकुंडे तयार झाली. स्थंडिलांची रचना होऊन देवतांची स्थापना

झाली. आर्यांनी जी हवने केली, सूक्ते म्हटली त्यांचे प्रतिध्वनी तर प्रतिदिनी श्रीक्षेत्री देवालयांत आजहि ऐकूं येतात.

यज्ञ कुंडातील ज्वालाशिखा सव्य बाजू दर्शवित. हविषाने प्रसन्नावलेल्या यज्ञधूम्रानें आसंमत सुगंधित होई.

आर्यांचे यज्ञ येथे चालू असत. निरेच्या प्रवाहाशी स्पर्धा करीत ऋषींच्या वाणीतून वेदसूक्ते वहात.

" गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम् " गृत्समदांनी म्हणावे.

" अमित्र हा वृत्रहा दस्युहा च विश्वा वसून्या भरा त्वं नः "
" हत्वाय शत्रून् वि भजस्व वेद ओजो मिमानो वि मृधो नुदस्व "
" सहस्व मन्यो अभिमातिमस्मे रूजन् मृणन् प्रमृणन् प्रेहि शत्रून् "
" संसृष्टं धनमुभयं समाकृतमस्मभ्यं दत्तां वरूणश्च मन्युः
भियं दधाना हृदयेषु शत्रवः पराजितासो अप नि लयन्ताम् "

मन्युस्तापसासारखे तेजस्वी व विजिगिषु आर्य दुसरे काय गाणार ?

" आविष्टयो वर्धते चारुरासु जिह्मानामूर्ध्वः स्वयशा उपस्थे
उभे त्वष्टुर्बिभ्यतुजयिमानात् प्रतीची सिंहं प्रति जोषयेते "
कुत्सांनी अग्निरूपी नृसिंह प्रार्थिला.
" माध्वीर्गावो भवन्तु नः "
गौतमांनी गोधनांची महति जाणली होती.
" नमस्ते रूद्र मन्यव उतो त इषवे नमः बाहुभ्यामुत ते नमः "
" नमः सेनाभ्यः सेनानिभ्यश्च वो नमो नमो रथिभ्यो अरथेभ्यश्च वो नमो "

अघोर ऋषींनी भगवान शंकराची स्तुति करावी.
" तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात् "

विश्वामित्रांनी तेजाची महति गायिली.

" वषट् ते विष्णवास आ कृणोमि तन्मे जुषस्व शिपिविष्ट हव्यम्
वर्धन्तु त्वा सुष्टुतयो गिरो मे यूयं पात स्वस्तिभिः सदा नः "

मेधातिथीनी श्रीविष्णू प्रार्थिला.

" उपैतु मां देवसखः कीर्तिश्च मणिना सह
प्रादुर्भूतोऽस्मि राष्ट्रेऽस्मिन् कीर्तिमृद्धिं ददातु मे "
" क्षुत्पिपासामला ज्येष्ठामलक्ष्मीं नाशयाम्यहम्
अभूतिमसमृद्धिं च सर्वां निर्णुद मे गृहात् "
" पद्मानने पद्मऊरु पद्माक्षि पद्मसंभवे
तन्मे भजसि पद्माक्षि येन सौख्यं लभाम्यहम् "

श्रीपुत्रांनी या सूक्ताने श्रीमहालक्ष्मीची प्रार्थना करून तिला वरदान मागावे.

शेवटी सर्वजण एका स्वरात म्हणत –

" ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः व्यशेम देवहितं यदायुः "

यज्ञ संपताच आर्यांनी पसायदान मागावे–

" आ ब्रह्मन् ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायतामा
राष्ट्रे राजन्यः शूर इषव्योऽतिव्याधी
महारथो जायतां । दोग्धी धेनुर्वोढानड्वानाशुः
सप्तिः पुरन्धिर्योषा जिष्णूरथेष्ठाः सभेयो युवास्य ।
यजमानस्य वीरो जायतां निकामे-निकामे नः
पर्जन्यो वर्षतु फलवत्यो न ओषधयः पच्यन्तां
योगक्षेमो नः कल्पताम् "
" नित्यं लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु "
" सर्वे जनाः सुखिनो भवन्तु "
" धर्मराजा विजयी भवतु "

यज्ञातील हविर्भाग भक्षून देवता संतोषाते पावत. त्यांनी मनोमन आशीर्वाद दिला, " तथास्तु "

ही सूक्ते, त्यांचे स्वर, त्यांचे त्रिष्टुभ्, अनुष्टुभ, जगती, बृहती उष्णिक्, गायत्री हे छंद नीरेभीमेने मनापासून ऐकिली. त्यांना ती मुखोद्गत झाली. हे वेदमंत्र त्यांनी पार चतुःसागरापर्यंत नेले. ऋषींची तेजे त्यांनी आपल्या जलात सामावून घेतली. नद्यांना हे यज्ञ फार फार आवडले.

यज्ञ संपल्यानंतर यूपानजिक आर्यांच्या सभा होत. वादविवाद रंगत. पूर्वपक्ष उत्तरपक्ष होऊन चर्चा रंगे. निष्कर्ष निघत. निर्णय मिळे.

अशाच एका प्रसंगी भीमेवरील कोटीतीर्थ हे सर्वश्रेष्ठ तीर्थ आहे असा निर्णय महर्षि नारदांनी दिला.

हे क्षेत्र यज्ञभूमि म्हणून प्रसिद्धी पावले ते असे.

निरामय नीरानृसिंह क्षेत्र

त्या काळाचे येथील वातावरण हे पूर्णांशाने निरामय व नैसर्गिक असे होते. तपोभूमि म्हणूनहि हे क्षेत्र प्रसिद्ध होते. प्रशांतवाहिनी नीरा आणि भीमा व त्यांचा सुरेख संगम, संगमनिकटी मंदिरांत श्रीनृसिंहमूर्ति, भोंवती सर्वत्र अरण्य, त्यांतून वनगायींचा निवास, त्यांच्या दुग्धपानावर संतोष पावून तपाचरण करणारे तापसी, क्षेत्रवंदनास येणारे तपी, यति प्रवासी आणि भक्त अशी ही रमणीय अवस्था. याच काळात महाभारताचे कर्ते महर्षि व्यास या स्थानी क्षेत्रवंदनार्थ येऊन गेले.

आद्य शंकराचार्य, आद्य मध्वाचार्य

आद्य शंकराचार्यांच्या काली एकदां श्रीनृसिंहमूर्तीची चलार्चा झाली तेव्हा श्रीमूर्तीची स्थापना आचार्यांच्या हस्तें झाली. त्यांनी रचिलेली श्रीनृसिंहस्तोत्रे प्रसिद्ध आहेत. आद्य मध्वाचार्यांच्या उपास्यां–

पैकी श्रीनृसिंह हे एक. नंतरच्या काळांत संपूर्ण नरसिंहपूर गांव वैष्णव–संप्रदायी बनला. सर्व मध्वाचार्य या क्षेत्री येत. अजूनहि येतात.

अली अदिलशहा आणि उमापति पंडित

यावनी सत्तेच्या काळांतील ही कथा. नेवासे येथील कोणी देशपांडे कुलोत्पन्न उमापति पंडित नामे तापसी या क्षेत्री तीव्र तपाचरण करीत होता. विजापूरचा बादशहा अली आदिलशहा आपल्या फौजेसह स्वारी-वर निघाला असतांना त्याचा तळ नरसिंहपूरनजिक भीमेच्या पैलतिरी पडला. त्याने नरसिंहपुराकडे पाहिले. तीन बाजूस पाणी व एका बाजूस जमीन. स्थान बहुत दुर्गम, येथे किल्ला बांधावा. राजा बोले, दळ हले. भराभर हुकूम सुटले. पाथरवट गवंडी श्रमू लागले. गडीवाया खपूं लागल्या. किल्याचे बांधकाम सुरु झाले.

हें पाहून उभापति पंडित मनी कष्टी झाला. तो उमजला की या तीर्थक्षेत्राचे नष्टचर्य आले. त्याने सर्वेश मनोमनी प्रार्थिला. वदला, ‘ तुझे तूं पहा. ’

एके अपरात्री बादशहाच्या छावणीत एकच गोंधळ झाला. मध्य-रात्री एकाएकी बादशहाचे पोट उठले. ते दुखणे साधे नव्हते. भयानक पोटशूळ. वैद्य हकीम धांवले. बादशहा हबकला. रोगास उतार पडेना. पोटशूळाच्या वेदना उत्तरोत्तर वाढूच लागल्या.

प्रातःकाळी कोणीतरी वजिरास सांगितले, ‘ येथे हिंदूचे जागृत देवस्थान आहे. किल्ला येथे बांधू नये. बांधकामाचा बेत रहित करावा. वजिराने ही वार्ता बादशहाच्या कानी घातली. बादशहास ती पटली, औषध म्हणून श्रीचा तीर्थ प्रसाद घेण्याचे त्याने मान्य केले. हा तीर्थ–प्रसाद देण्याचे काम उमापति पंडिताने केले.

आणि चमत्कार घडला. पोटशूळाच्या प्राणांतिक वेदना संपल्या. किल्याचे बांधकाम कायमचे थांबले इतकेच नव्हे तर या क्षेत्रमर्यादेतील

चौदा चाहूर शेतजमीन बादशहाने उमापति पंडिताला अग्रहार इनाम करून दिली. तशी सनदहि दिली. नंतर ही जमीन श्रीचें सेवाधिकारी पूजाधिकारी, जोशी व धर्माधिकारी या तीन घराण्यांत विभागली गेली.

समर्थ रामदासांचा क्षेत्रनिवास

आपल्या तीर्थाटनात समर्थ रामदास स्वामी या क्षेत्री आले होते. कृष्णा–मांडवीच्या तीरांवर गर्जलेली समर्थ वाणी नीरा–भीमातटाकीहि गर्जली.

‘ महाभक्त प्रल्हाद हा कष्टविला
म्हणोनि तयाकांरणे सिंह झाला. ’
‘ महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकुळी
जपे रामनामावळी नित्य काळी
पिता पापमुखी तया देखवेना
जनी दैत्य तो राममुखी म्हणेना

दुष्टांचे निर्दालन करणारे हे दैवत समर्थांना भारी प्रिय होते. श्रीनृसिंहाची एक आरती त्यांनी रचिली आहे. तीत ते म्हणतात –

चरचर उदर फाडी विभांडी
तरतर अंत्रमाळा ओढोनी काढी
भरभर आवेश पोटी क्रोध भडाडी
ब्रम्हप्रलय जैसा पावक धडाडी

हिरण्यकशिपूच्या बधाचे असे वर्णन केलेले रामदास, त्यांनी येथे क्षेत्रनिवास केला. अशा रम्य स्थानी आपले उपास्यहि असावे अशी इच्छा समर्थाचे मनी धांवली. आपल्या नित्यपूजेतील श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांच्या मूर्ति त्यांनी येथील जपे यांच्या घरी दिल्या. त्यांची नित्यपूजा व वार्षिक रामनवमीचा उत्सव होण्याविषयी त्यांना आवर्जून सांगितले.

संत तुकारामांनी केलेली क्षेत्रस्तुति

पंढरी ही तुकोबांची काशी. कल्पनेचा हा धागा पकडून तुकोबांची अभंगवाणी स्रवू लागली.

उमारमा एकसरी । वाराणसी ते पंढरी
दोघे सारिखे सारिखे । विश्वनाथ विठ्ठल सखे
तेथे असे भागीरथी । येथे जाणा भीमरथी
वाराणसी त्रिशूळावरी । सुदर्शनावरी पंढरी
मनकर्णिका मनोहर । चंद्रभागा सरोवर
वाराणसी भैरवकाळ । पुंडलिक क्षेत्रपाळ
धुंडिराज दंडपाणि । उभा गरुड कर जोडुनि
गया तेचि गोपाळपूर । प्रयाग नीरा नरसिंहपूर
तेथे असती गयावळ । येथे गायी आणि गोपाळ
शमीपत्र पिंड देती । येथे काला निजसुखप्राप्ति
संतसज्जनी केला काला । तुका प्रसाद लाधला

काशीच्या नित्य वाऱ्या करणारे तुकाराम या प्रयागास विसरतील हें शक्यच नव्हते. तुकारामाची शिष्या बहिणाबाई घर सोडून पंढरीस निघाली तेव्हां तिने या क्षेत्री येऊन श्रीदर्शन घेतले होते.

स्वस्ति श्रीकार्यलाभाय

या निरामय व संपूर्णतया नैसर्गिक अवस्थेतील तपोभूमीचे रूपान्तर नगरात होण्याचा प्रारंभ आता होत होता.

नीरा व भीमा या उभयतांचा संगम ज्या स्थानी झाला त्या स्थानी अंडाकृति असा प्रचंड घाट शके १५२७ विश्वावसुनाम संवत्सरे यासाली माघ शु॥ ११ या दिवशी बांधून पूर्ण झाला.

हे बांधकाम कोणी त्रिमळापाळ धाधजी मुधोजी यांनी करविले. या बांधकामावर देखरेख करण्याचे काम कोणी यमाजी निघदेव यांनी

केले. हे बांधकाम सतत तीन वर्षें चालू होते.

नीरेभीमेच्या वेगवान् जलप्रपातांशी झुंज घेत घेत केलेले हे बांधकाम नरसिंहपुरांतील आद्य बांधकाम असून तो क्षेत्ररचनेचा प्रारंभ होय. सर्वात जुने व सर्वात पक्के असे हे बांधकाम असून धाधजी मुधोजीच्या अभंग कर्तृत्वाचे हे प्रत्यंतर होय. श्रीकार्याचा लाभ व्हावा हा एकमेव उदात्त हेतु दृष्टिसमोर ठेवून या बांधकामाने त्यांनी क्षेत्ररचनेस प्रारंभ केला. या बांधकामाच्या समाप्तीच्या निमित्ते धाधजी मुधोजी यांनी जो शिलालेख संगमघाटावर कोरविला त्याचा प्रारंभच त्यांनी 'स्वस्ति श्रीकार्यलाभाय' असा केला आहे.

पुढे शके १७८७ साली रघुनाथराव विंचूरकरांनी देवालयाचा एकंदरीने जीर्णोद्धार करविला व त्यासंबंधीचा शिलालेख कोरविला त्या अखेरीस त्यांनी, 'येणेकरून सर्वोत्तम श्रीलक्ष्मीनृसिंह सुप्रसन्न होवोत' अशीच शुभापेक्षा व्यक्त केली.

या अपेक्षेचा जणू पायाच श्रीकार्याचा लाभ व्हावा या भव्योदात्त संकल्पाने धाधजी मुधोजी यांनी घातला.

संगमघाटाची कांही वैशिष्ट्ये

या अंडाकृति घाटातील शिल्पसौंदर्ये लक्षणीय आहेत. घाटाच्या पायऱ्यात बसविलेल्या मोठ्या दगडांतून हत्तीचे पुतळे घडविलेले आहेत.

संगमात स्नान करून संगमघाट चढत असतांनाच, आपली सोंड वर करून भक्तांना अभिवादन करतांना स्वागतकार हत्ती आढळतात. काही हत्ती संगमाकडे सूक्ष्म दृष्टि लावून स्थिर अवस्थेत दिसतात. अशीच काही दगडी माकडेहि पायऱ्यातून आढळतात. एका माकडावर आरूढ झालेला हत्ती हे कशाचे प्रतीक आहे हा चिंतनीय विषय आहे. वाघ, सिंह ही स्वयमेव मृगेंद्रतेची प्रतीकेहि या घाटात आहेत, हत्ती व सिंह यांची जोडीहि लक्ष वेधून घेते. शिवाय मगरीचे पांच पुतळे आहेत.

दोन जलप्रपातातील जलचर व नजिकच्या अरण्यांतील वन्य पशू यांचे पुतळे या घाटावर असणे हे या क्षेत्राचे तत्कालीन स्वरूपाचे सम्यक् दर्शन घडविते. यांत विसंगत दिसतो तो मात्र घाटाच्या नीरेकडील बाजूचा एक मानवी पुतळा. संभोगोत्सुक स्त्रीचा हा नग्न पुतळा रत्यासनातील असून तो इथे घडवून कां बसविला गेला ते समजत नाही.

सोळखांबीचे बांधकाम

धाधजी मूधोजी यांनी संगमघाट बांधविला. या घाटावर सोळा दगडी खांबानी युक्त असे दगडी देवालय या धाधजीचे कनिष्ट तिघे बंधू होते त्यांनी बांधविले. त्यांवर त्यांनी शिलालेख कोरविला आहे. तो असा,

**शके १५९० किळकनाम संवत्छरे ज्ये
ष्ठ वदि त्रयोदसी गुरुवार दीवसी मु
धोजी त्रीमल भुरंग यांचे पुत्र गोविं
दराव गोपाजी व शामजी यानी सोळ
खांबा केला व कुरंगाजी को
नेरी या कामावरी होता.**

नरसिंहपुरांतील हे सर्वांत जुनें व तितकेच पक्के असे हे देवालय आहे.

अशाप्रकारे क्षेत्ररचनेचा प्रारंभ करून संगमघाट व सोळखांबा ही बांधकामे पूर्णत्वास नेणारे हे चौघे बंधु मुधोजीपुत्र धाधजी, गोविंदराव, गोपाजी व शामजी खरोखरीच धन्य होत. मात्र यांची सविस्तर माहित्ती उपलब्ध नाही.

या देवालयाच्या मध्यभागी अश्वत्थरूपी नृसिंह, गणपति, मारूती व शिवलिंग अशा देवता आहेत. या देवालयाच्या पाठभिंतीलगत एक जुनाट वटवृक्ष असून त्यास अक्षय्यवट असे म्हणतात. या वटवृक्षाच्या पाराचा जीर्णोद्धार रघुनाथराव विंचूरकर यांनी केला.

देवालयाच्या पुढच्या बाजूस एक दीपमाळ व जानकेश्वर नामक शिवमंदीर आहे. रघुनाथराव विंचूरकरांची सतिपत्नि जानकीबाई यांच्या निधनानंतर ते शिवमंदीर त्यांचे स्मरणार्थ रघुनाथरावांनी शके १८०३ साली बांधविले.

सोळखांबीच्या किंचित् खालचे अंगास भीमेच्या तटाकी अनादि गणपतीचे स्थान असून मंदीरात गणपति व शिवलिंग या देवता स्थापित आहेत.

शिवाजी महाराजांनी सनद पुनरुज्जीवित केली

अली आदिलशहाने स्थानिक वृत्तीवंतांना दिलेला अग्रहार इनाम व त्याची सनद ही शिवाजी महाराजांनी कायम चालविली. स्वराज्यात या क्षेत्राचे माहात्म्य मानले गेले. त्यावेळी या प्रांतांचा कारभार रामचंद्रपंत अमात्य पहात असत. शिवछत्रपतीच्या आदेशावरून त्यांनी साक्षेपपूर्वक सनदेचे पुनरूज्जीवन केले.

राज्याभिषेक शके ३५

दुसरे शिवाजी महाराज–राजारामाचे पुत्र–एका ग्रहण पर्वकाळाचे निमित्ते या क्षेत्री संगमावर स्नान करण्यासाठी आले होते. स्नानदानादि विधि पूर्ण करून त्यानी श्रीचे दर्शन घेतले. आपल्या आजोबांनी दिलेली सनद पाहून यांनी पुनः त्या सनदेचे पुनरूज्जीवन केले. तो दिवस म्हणजे राज्याभिषेक शके ३५ सर्वधारीनाम संवत्सरे कार्तिक बहुल व्दितिया हा होय.

श्री

स्वस्ती श्री राज्याभीषेक शके ३५ सर्व धारी नाम संवत्सरे कार्तीक बहुळ व्दितीया सोमवासरे क्षेत्रीय कुलावतंस श्रीराजा शीव छत्रपती याणी वेदमूर्ती समस्त वृत्ती वंत ब्राह्मण वास्तव्य क्षेत्र नीरा नरसींव्ह पूर परगणे ईंदापूर यासी दील्हे वृत्तीपत्र ऐसेजे तुम्हामधोन यादव बहिरव दंडवते यानी मुकामी स्वामी संनीध येऊन वीनंती केली जे क्षेत्र म॥ पूर्वंपार अली आदीलशहाचे काकीर्ती पासून क्षेम म॥ च्या स्थाईक वृत्तीवंत ब्राह्मणास अग्रहार ईनाम सर्वमान्य लाभला आहे. थोरले कैलासवासी राजा श्री स्वामीचे वेलेस याप्रो॥ चालत आला ऐशास स्वामी धर्म परायण आहेत पूर्वंपार वर्तमान मनास आणून ब्राह्मणांची वृत्ति चालून पारिपत्य केले पाहीजे म्हणून वीदीत केले त्यावरून पूर्वोत्तर वृत्तांत मनात आणीता क्षेत्र नीरा नरसींहपूर हा गाव पूर्वापार ईनाम सर्वमान्य चालीला आहे त्याप्रो॥ थोरले कैलासवासी स्वामीनी ही चालवीला व कैलासवासी स्वामी चेनीस असता राजश्री रामचंद्रपंतअमात्य राज्यभार चालवीत

निंबाळकरांचा त्रिविध संबंध

फलटणच्या निंबाळकर घराण्याचा या क्षेत्राशी तीन वेगवेगळया रीतीने संबंध आला.

कोणी एक निंबाळकर श्रीनृसिंहाचा परमभक्त होता. त्याची समाधी श्रीक्षेत्री आहे.

हनुमंत निंबाळकर यांनी एकदां या क्षेत्रावर हल्ला करून संपूर्ण गांव जाळिला होता.

बजाजी निंबाळकराने कांही कारणास्तव इस्लाम धर्माचा स्वीकार केला होता. तथापि पुनः त्यानें हिंदू धर्मात प्रवेश केला. त्याच्या या शुद्धिकरणाचा विधि याच क्षेत्री झाला. त्याच्या एका बिबीच्या थडग्याचे अवशेष श्रीक्षेत्री आहेत.

श्रीमूर्ति तरटीच्या झाडाखाली

शंभू छत्रपतींच्या अमानुष वधानंतर मराठेशाही नष्ट करण्या-साठी औरंगजेब दक्षिणेत तळ ठोकून बसला होता. एके समयी त्याचा मुक्काम नरसिंहपुरापासून पांच कोसावरील अकलूज या गांवी होता. परधर्मद्वेष्टा औरंगजेब काय करील याचा नेम नसल्याने, तसेंच तो काळ अत्यंत अस्थिरतेचा असल्याने श्रीनृसिंहाच्या दोन्ही मूर्ति तरटीच्या झाडाखाली तळघरांत ठेविल्या होत्या. धोक्याचा काल संपल्यानंतर त्या पुनः वर आणल्या.

श्रीमूर्ति नळदुर्ग या गांवी

पेशवेकालांतहि श्रीमूर्ति यवनांच्या भीतीनें हलविण्याचा प्रसंग आला. यावेळी श्रीमूर्ति धाराशिव भागात नळदुर्ग या गांवी तेथील देशमुखांच्या घरी नेऊन ठेविली होती. श्रीनृसिंह हा या देशमुखांचा

कुलस्वामीच असल्याने त्यांनी मूर्तीचे संरक्षण अत्यंत तत्परतेने केले. धोका संपल्यानंतर मूर्ति पुनः नरसिंहपुरी आणली. श्रीमूर्ति धोतराने पाठीशी बांधून ती नेण्या–आणण्याचे काम श्रीक्षेत्रातीलच एका ब्राह्मणाने केले.

श्रीनृसिंहमूर्तीचा निवास देशमुखांच्या गृही झाल्याने व तो त्यांचा कुलस्वामीच असल्याने या देशमुखांना ही घटना अपार भाग्याची वाटली. यानंतर त्यांनी या घटनेच्या स्मरणार्थ स्वतःचे गांव निलेगांव येथें नृसिंहाचे मंदीर बांधून तेथे नृसिंहाच्या सुवर्णमूर्तीची स्थापना केली. या देवस्थानाच्या योगक्षेमार्थ त्यांनी कांही उत्पन्नहि लावून दिले. अशा–रीतीने नरसिंहपूरचे स्थान निलेगांवी आले.

अन्नपूर्णापते हरिनारायण

वरील घोषणा करणारे हरिनारायणबुवा नांवाचे एक प्रसिद्ध संत पेशवेकालात होऊन गेले. ते मूळचे ढोकी येथील देशपांडे होते. वैराग्य-प्राप्ती होतांच त्यांनी नरसिंहपूर येथे नीराभीमासंगमी उग्र तपश्चर्या करून प्रत्यक्ष नारदांकडून अनुग्रह मिळविला. ब्रम्हदेवबुवाविरचित सारारामायणांत ही घटना सविस्तर वर्णिलेली आहे.

देवी अहिल्याबाई होळकर

इंदूरची राणी अहिल्याबाई होळकर आपल्या तीर्थाटनात या क्षेत्रीं क्षेत्रनिवासार्थ आली होती. येथें तिने तीन दिवस वास्तव्य करून बहुत दानधर्म केला. ब्राम्हणभोजने घातली. पात्री एक रुपया याप्रमाणे तिने बाराशे रुपये दक्षिणा दिली असा उल्लेख सांपडतो.

विठ्ठल शिवदेवाविषयींची एक आख्यायिका

कसबे सासवड येथील दाणी उपनामक शिवदेवपुत्र विठ्ठल नाम्ना मोठा स्वाभिमानी. घरच्या परिस्थितीस कंटाळला होता. एके दिवशी मातेवर संतापून त्याने घर सोडले. त्याचा कुलस्वामी जेजुरीचा खंडोबा

त्याचे दर्शन घेऊन त्याने जेजुरी सोडली. व पुढे निघाला. नरसिंहपुरी आला. संगमाकांठचे श्रीचे स्थान पाहून संतोषित झाला. तेथेच राहून त्याने श्रीची तपसेवा आरंभिली. प्रतिकूल परिस्थितीतील खडतर तप पुरे झाले. दृष्टान्त झाला कीं, ' आतां येथून निघावे. भाग्योदय होईल ' विठ्ठल नरसिंहपुराहून निघाला. सातारा भागांत आला.

दुपारची वेळ. नदीवर स्नान करुन नेसूचे धोतर वाळूवर वाळत घालून विठ्ठल प्रवाहात संध्यावंदनादि कर्मे करीत बसला. सहज पहातो तों एक गोसावी वाळूतून चालला होता. विठ्ठल चमकला. त्याने खडसावले, ' ए गोसावड्या ! खबरदार त्या वस्त्राला शिवशील तर. ते मी सोवळ्यात घातले आहे ' 'बाबा! मी ब्राम्हणाचे सोवळे कशास शिवूं? ' एवढेच बोलून तो गोसावी शांतपणे पुढे निघून गेला.

शिलेदाराचा सरदार झाला

हा गोसावी म्हणजे छत्रपति शाहू महाराज होते. टाकोटाक राजवाड्यांतून विठ्ठलास बोलावणे गेले. विठ्ठल दरबारी गेला. छत्रपतींना मुजरा करून ताठपणें उभा राहिला. चेहऱ्यावर निर्भयता होती. गुण–ग्राहक शाहूछत्रपतीनी त्यास शिलेदारी दिली. तरणाबांड तट्टू मिळाला. खाण्यापिण्याची ददात मिटली- पाठीशी छत्रपतींचा आश्रय होता. एक अलौकिक घटना घडत होती. विठ्ठलाचे अंगभूत सर्व सद्‌गुण विकसत होते. स्वारांच्या एका पथकाचा विठ्ठल नेता झाला. बाल्य संपले होते. तारुण्यांत त्याने पदार्पण केले होते.

आणखी एक प्रसंग घडला. छत्रपति एके दिनी शिकारीस निघाले. निबिड अरण्यांत शिकारीचें स्थान होते. संगे आपल्या निवडक सहकाऱ्यासह विठ्ठल होता. छत्रपतीनी पाहिले.

भयानक सुळ्यांचा एक रानडुक्कर समोरून येत होता. लालभडक डोळे, वज्रप्राय शरीर, बेगुमान वेग.

शाहू महाराजांनी घोड्यावरून भाला फेकला. भाल्याचा नेम चुकवून डुकराने सरळसरळ महाराजांवर चाल केली.

समय अवघड होता. महाराजांचे नेत्र झाकले गेले. डोळे उघडून महाराज पहातात तों विठ्ठल रानडुकराशीं झुंज घेत होता. महाराजांच्या भाल्याचा नेम चुकतांच विठ्ठलानें घोड्यावरून उडी घेऊन त्या वराहाशी व्दंव्द सुरू केले होते दोन प्रखर शक्ति एकमेकांवर वज्रप्रहार करीत होत्या. अनिमिष नेत्राने आणि अवाक् होऊन महाराजांसह इतरजनहि ते अभूतपूर्व व्दंव्द पहात होते.

आणि एकाएकी डुकराने माघार घेतली व पहातां पहातां तो अरण्यांत पळून गेला.

पळत्या डुकराकडे विठ्ठल पहातो तो त्यास तेथे नृसिंहरूप स्थित दिसले.

आख्यायिका म्हणते की, श्रीनृसिंहाने वहाहरूपे येऊन विठ्ठलाची कसोटी पाहिली.

इतिहास सांगतो कीं विठ्ठलाच्या भाल्याने डुक्कर पराभूत झाला.

शाहू छत्रपतींच्या नेत्रांतून आनंदाश्रु ओघळत होते. विठ्ठलास दृढालिंगन देऊन ते वदले, " वा विठ्ठला ! आज तुजमुळें आम्ही वाचलो. "

विठ्ठल सरदार झाला. पंतप्रधान पेशव्यांच्या लेखी त्याची शान वाढली. मान वाढला. विठ्ठलाचा सरदार विठ्ठल शिवदेव झाला.

अमृतानंदांची अमृतवाणी

अमृतस्वामी मर्ढेकर हे विठ्ठल शिवदेवांचे मोक्षगुरु. स्वामी तीर्थाटनात हिंडत असतांना एके दिनी नरसिंहपुरी आले. त्यांनी पाहिले ते दोन नद्यांच्या कचाट्यांत सांपडलेले जीर्ण श्रीमंदीर. मनास व्यथा

झाली. हीच वेदना मनी घेऊन ते सरळ विठ्ठल शिवदेवांकडे आले. एव्हाना विठ्ठल शिवदेव ही एक मातबर शक्ति बनली होती. त्यांच्या धारदार समशेरीवर लक्ष्मी प्रसन्नावली होती. क्षेमकुशल विचारून होतांच अमृतानंद वदले, " विठ्ठला ! वत्सा. श्रीक्षेत्री जाऊन आलो. श्रीच्या मंदीराची दुरवस्था मानसी व्यथा निर्माण करते. श्रीनृसिंह हे तर तुझे उपास्य. तस्मात् त्या मंदीराचा जीर्णोद्धार कर. मंदीर पुनः उभे कर. "

विठ्ठल शिवदेव मनी चमकले. त्यांनी हा बहुत खर्चाचा विषय असल्याचे सांगितले. तथापि गुरुंनी आशिर्वाद दिला. " श्रीराम हे कार्य तुझ्याच हातून तडीस नेणार आहे. "

चैत्र शु॥ १ शके १६७८

" गुर्वाज्ञा जशी मान्य " म्हणून विठ्ठल शिवदेवांनी श्रीमंदीराच्या बांधकामास प्रारंभ केला. दोन्ही नद्यांच्या पात्रात खोलवर पाया खणून तो प्रचंड शिळांनी आणि शिशानें भरला. पाया खणण्याचे व भरण्याचे हे काम सातत्याने सात वर्षे चालू होते. त्यास अडीच लक्ष रुपये खर्च आला. पायावर यंत्राकार चबुतरा बांधून त्यावर श्रीचा गाभारा व नजिकचे गर्भागार बांधले. मंदीरावर शिखर बांधले. यानंतर उभय श्रीमूर्ती सिंहासनावर स्थापून श्रीची महापूजा केली. यानिमित्ते ब्रह्मदेव-कृतमूर्तीच्या सिंहासनावर शिलालेख कोरविला. तो असा–

श्रीक्षेत्र नीरानरसिंहपूर घाट गाभारा देवालय चरणारविंद विटल शी वदेव दाणी कसबे सासवड प्रा। पुणे शके१६७८धातानाम संवत्सरे चैत्रशु॥१

हे बांधकाम एकूण वीस वर्षे चालू असून त्यांस सात लक्ष रुपये खर्च आला. शके १६६१ सिद्धार्थीनाम संवत्सरात उत्तरेकडील ओवऱ्याचे काम पुरे करून हे काम करणारा कोणी मल्हार गोपाळ यांनी देवालयाच्या उत्तर दरवाजाजवळील तिसरे खांबावर अक्षरे खोदविली आहेत.

संभवते की, शके १६५१ साली कामास मुहूर्त होऊन शके १६५८ साली पायाभरणीचे कार्य पूर्ण झाले व लगेचच देवालयाच्या बांधकामास प्रारंभ झाला.

हरि नानाजी जोशी खलदकर

श्रीपुढे जी चांदीची आडवी दांडी बसविलेली आहे. तीखालील चौथऱ्यावर श्रीच्या पादुका आहेत. त्या चौथऱ्यावर खालील शिलालेख आढळतो.

श्रीविठ्ठल शिवदेव दाणी कसबे सासवड स्वामीचे सेवेसी चरणारविंद हरि नानाजी खलदकर जोसी कुलकर्णी मौजे खलदक सासवड वगैरे देह प्रांत पुणे प्रा सुपे शके १६७८ धातानाम संवत्सरे, चैत्र श्रु।। १

वरील शिलालेखाचा मतितार्थ असा कीं, विठ्ठल शिवदेवांचा कोणी हरि नानाजी नामक अत्यंत विश्वासू सेवक तो या नूतन मंदीराचे बांधकामावरील प्रमुख अधिकारी असावा. सतत वीस वर्षे चाललेले हे बांधकाम ते यशस्वीपणे पार पडल्यानंतर विठ्ठल शिवदेवांच्या नामोल्लेखाच्या वरील शिलालेखाबरोबरच हरि नानाजीनीहि आपल्या नामो-

लेखाचा शिलालेख स्थापित केला. देवालयाच्या बांधकामावर प्रत्यक्ष देखरेख करून ते पार पाडणारा हा मनुष्य खरोखरीच मोठा तज्ज्ञ, साक्षेपी व निष्ठावन्त असावा.

श्रीनृसिंहमूर्तीस पूजादि कृत्ये केल्यानंतर ' यस्य स्मृत्या ' म्हणून जे जल कृष्णार्पण केले जाते ते या शिलालेखयुक्त पादुकांवरच पडते. अशा रीतीने अनेक भक्तांच्या पुण्याईच्या जलानें नित्यस्नात होणारा हा हरि नानाजी खरोखरीच धन्य होय.

प्राङ्मुख श्रीमूर्ति प्रत्यङ्मुख

देवालयांत ज्या ठिकाणी आज तरटीचे झाड आहे त्या ठिकाणी श्रीनृसिंहमूर्ति सिंहासनाधिष्ठित होती. जुन्या मंदीरात ही मूर्ति पूर्वाभिमुख होती. विठ्ठल शिवदेवांनी बांधलेल्या नवीन देवालयांत ही श्रीमूर्ति पश्चिमाभिमुख अशी सिंहासनाधिष्ठित केली. मूर्तीचे मूल स्थान जे तरटीवृक्ष त्याठिकाणी श्रीच्या पादुका स्थापन केल्या. या स्थानास तरटीनृसिंह असे म्हणतात. श्रीनृसिंहमूर्ति प्रथम पूर्वाभिमुख असल्याने देवालयाच्या पूर्व दरवाजास महाद्वार म्हणतात.

तरटी नृसिंह

तरटीचे झाड हे साक्षात्कारी स्थानाचे महान् लक्षण मानले जाते. कांहीसे ओबडधोबड व फारशी उंची नसणाऱ्या या झाडास लांबट आकाराची पाने असतात. पिवळसर रंगाची व तंतूंनी बनलेली साजिरी गोजिरी फुले या झाडांस येतात.

या स्थानी श्रीच्या एकूण चार पादुका असून या स्थानास श्रीचे आद्य स्थान म्हणून महत्त्व आहे.

भक्तवर्य विठ्ठल शिवदेव

श्रीनृसिंहाचे देवालय बांधूनच विठ्ठल शिवदेव थांबले नाहीत तर

देवस्थानाच्या योगक्षेमासाठी त्यांनी आपल्या जहागिरीपैकी गुजराथ प्रांतातील सुरत जिल्ह्यांतील उरपाड नामक महालातील चार गांवांचा महसूल नक्त नेमणूक करून दिला. यातून श्रीस पंचकाळ नैवेद्य, नंदादीप सनई चौघडा वादन, पूजेचा ब्राह्मण, अनुष्ठान, तुळशीफुले व नृसिंह जयंति उत्सव नित्य चालण्याची व्यवस्था केली. श्रीस त्यांनी बहुमोल जवाहीर व अलंकार अर्पण केले. पेशवे पद्धतीची शहाण्णव तोळे वजनाची सोन्याची पगडी त्यांनी श्रीस अर्पण केली. अलंकारपूजेचे वेळी ती श्रीस अद्यापहि घालतात. आपल्या या कुलस्वामीच्या वैभवात किमपिहि उणे पडूं नये एतदर्थ ते अत्यंत जागृत होते. त्यांची नृसिंहभक्ति अलौकिक होती. युद्धप्रसंगीची त्यांच्या सैन्याची गर्जनाहि ' जय नरहरी ' हीच असे. आपल्या नृसिंहभक्तीने त्यांना अनेक स्थानी नृसिंहमंदीरे बांधावयास लावली. त्यांतील कित्येक उत्तर भारतात आहेत. त्यांचे बरेच आयुष्य तिकडेच व्यतीत झाले. विंचूरकरांचे नाणेंहि ' नरसिंह शिक्का ' या नावाने संबोधले जाई. असा नृसिंहभक्त अर्वाचीन काळांत दुसरा झाला नाही. श्रीकृपेने विठ्ठल शिवदेवांचाहि उत्तरोत्तर उत्कर्षच होत गेला. पेशव्यांचे प्रतिनिधि या नात्याने दिल्लीपतीच्या राजकारणाची सूत्रेंहि कांही काळ विठ्ठल शिवदेवांच्या हाती सुरक्षित होती.

देवालयाचे चढते वाढते बांधकाम

विठ्ठल शिवदेवानंतर त्यांचे पुत्र शिवाजी विठ्ठल यांनी गर्भागारपुढील रंगशीलेचा दगडी मंडप, पश्चिम दरवाजा व त्यावरील नगारखाना ही बांधकामे केली. विठ्ठल नरसिंह विंचूरकरांनी प्रल्हादासमोरील लाकडी सभामंडप, पश्चिम दरवाजाचे दोन्ही बुरूज व मंदीरानजिकची धर्मशाळा ही बांधकामे केली.

वरील विंचूरकर वंशजाखेरीज देवालयाच्या बांधणीस खालील भक्तांचा हातभार लागलेला आहे.

पूर्वेकडील महाद्वार मलठणकर पवारांनी बांधले. देवालयाच्या

दक्षिण बाजूच्या दुघईच्या ओवऱ्या बीडकरांनी बांधल्या. या ओवऱ्यांचा पुढे वामनराव देशमुख यांनी अकरा हजार रुपये खर्चून जीर्णोद्धार केला. देवालयाच्या उत्तरेकडील ओवऱ्या कोरांटक धर्माधिकारी यांनी बांधल्या. पूर्वेकडील ओवऱ्या परशुराम भाऊ सायखेडेकरांनी बांधल्या. याप्रमाणे देवालयाचे बांधकाम प्रामुख्याने विंचूरकरांनी व अनुषंगाने इतर भक्तांनी पुरे केले.

पेशव्यांचे देवस्थानास भूमिदान

नरसिंहपुरानजिक टणू नांवाचे गांव आहे. तेथील सुमारे १२५ एकर जमीन पेशव्यांनी देवस्थानास दान दिली. या जमिनीचा देवस्थानाच्या योगक्षेमास उपयोग होतो.

नरसिंहपूरचा संपूर्ण शिवार अलि आदिलशहाने क्षेत्रांतील वृत्तिवंताना अग्रहार इनाम करून दिला होता. देवस्थानास भूमिदान करणारे पेशवे हे पहिलेच राज्यकर्ते होत.

एक महान् चमत्कार

या देवालयांत श्रीलक्ष्मीचे देऊळ बांधलेले आहे. त्यांचे शिखर संपूर्ण दगडी आहे हे शिखर नीरा नदीच्या पात्रापासून सुमारे दीडशे फूट उंच आहे. शिखरांच्या दोन दगडांमध्ये एक लहानशी फट आहे. तीतून अहोरात्र पाणी झिरपते.

उगमस्थान अज्ञात असणारा हा लहानसा पाझर येथे गुप्तगंगा म्हणून ओळखला जातो. हे पाणी पावसाळयात जास्त, हिवाळयांत मध्यम व उन्हाळयांत कांहीसे कमी असे झिरपते. आटत मात्र नाही.

उत्तरेतील प्रयागक्षेत्री सरस्वती गुप्तरूपे वहाते. येथे ही गुप्त, गंगा, या घटनेचा उलगडा तर्कशास्त्रानें करतां येत नाही म्हणून याला चमत्कार म्हणावयांचे.

क्षेत्रातील अन्य बांधकामे

नृसिंहतीर्थावरील नीरानदीवरचा घाट कोणी कुलकर्णी यांनी घाटावरील मंदीर जिनसीवाले लऊळकर यांनी, नजिकच्या ओवऱ्या काठण उपनामक गंगाखेडकर यांनी अशी ही बांधकामे केली. लक्ष्मी-तीर्थावरील घाट राखेलकर यांनी, भीमेवरील नागघाट बाबा बावडे-करांनी बांधला. तरटीनृसिंहाचे देवालय या बावडेकरांनीच बांधले. हे बांधकाम शके १७७६ साली झाले. भीमेवरील कवडेघाट कोणी गुडसाल-कर कवडे यांनी बांधला.

आद्यनृसिंह

गांवाच्या पश्चिमेस आद्यनृसिंहाचे स्थान आहे यांस ग्रामीण भाषेत आढोबा असे म्हणतात. एकांतप्रिय नृसिंह या ठिकाणी वास करतात. हे देवालय कान्हेरकर यांनी बांधले. गाभाऱ्यापुढील भाग दादा निंबाजी यांनी बांधला. देवालयापुढील बारव जोशी काकडे यांनी बांधली.

गाभाऱ्यांत श्रीनृसिंहाचा तांदळा असून इतर पांच मूर्ति आहेत. पैकी दोन मूर्ति खड्गधारी आहेत. विशेष म्हणजे या देवालयासमोर दगडी नंदी आहे. आद्यनृसिंहाच्या या देवालयाच्या समांतर पातळीत देवालयाच्या उत्तर दरवाजावरील पादुका आहेत.

नरहरी मोरेश्वर देशपांडे

श्रीनृसिंहाची सर्व प्रसिद्ध अशी आरती जी ‘ उत्कटिला परिस्तंभ ’ तिचा रचयिता नरहरी मोरेश्वर देशपांडे हा सत्पुरुष होय. हा मराठ-वाड्यातील ईट या गांवाचा रहाणारा. श्रीनृसिंह हा त्याचा कुलस्वामी. ईट येथील हा वतनदार देशपांडा उत्तम कवि असून महाभारतावर त्यांनी मराठीतून केलेली रचना विव्दन्मान्य आहे. माधवदास नामे कोणी वैष्णव साधु यांचे स्नेही होते. तेहि नृसिंहोपासकच होते. वरील आर-

तीच्या शेवटच्या ओळीत 'माधवदासा स्वामी नरहरी शोभतो' अशी ओळ घालून नरहरीने आरतीस आपल्या मित्राचेहि नांव जोडले. नृसिंहाची इतकी सर्वमान्य आरती दुसरी नाही. या उभय मित्रांच्या समाध्या ईट येथे आहेत.

खर्ड्यांच्या युद्धातील विजयानंतर

इ. स. १७९५ साली पेशवे व निजाम यांच्यात खर्डा येथे घनघोर युद्ध होऊन त्यांत श्रीमंत पेशवे विजयाते पावले. निजाम दांती तृण घेऊन शरण आला. या युद्धांत पेशव्यांचे सरदार खंडेराव विठ्ठल विंचूरकर यांनी शर्थीची तरवार गाजविली होती. जयप्राप्तीनंतर ते परस्परे नरसिंहपुरी आले. बहुत दानधर्म केला. अन्नसंतर्पण केले.

खंडेरावांचे निधन नरसिंहपुरीच वैशाख शु॥ ६ शके १७१७ रोजी झाले म्हणून नरसिंहपूर येथील श्रीचे वैशाखी नवरात्र षष्ठीच्या ऐवजीं सप्तमीस प्रारंभित होते.

श्रीनृसिंहमूर्ति टेंभुर्णी येथे

पेशवाईच्या सरहद्दीवरील निजामच्या राज्यांत अरब, सिद्दी, पठाण यांचे बंड होऊन त्याचा फैलाव नरसिंहपुरापर्यंत आला. पुणे मुक्कामी असलेल्या नरसिंह खंडेराव विंचूरकर यांना ही वार्ता कळताच त्यांनी सैन्य सिद्ध करून क्षेत्ररक्षणार्थ ते नरसिंहपुराकडे निघाले. तत्पूर्वी त्यांनी नरसिहपुराच्या ब्राह्मणांना पत्रें लिहून श्रीनृसिंहमूर्ति टेंभुर्णी येथे सदाशिवराव माणकेश्वर यांचे वाड्यांत ठेवण्याविषयी सांगितले.

नरसिंह खंडेराव ससैन्य येताहेत ही वार्ता लागतांच बंडवाल्यांनी पोबारा केला. नरसिंह खंडेराव टेंभुर्णी येथे आले. त्यांनी श्रीमूर्ति पाल–खीत घालून व त्या पालखीस स्वतः खांदा देऊन त्या नरसिंहपुरीं आणल्या व सिंहासनारूढ केल्या. शके १७१८ चा वैशाखी नवरात्र महोत्सव तेथेंच साजरा करून दानधर्म व अन्नसंतर्पण केले.

टेंभुर्णीहून मूर्ति आणतांना श्रीच्या पितळी पादुका सदाशिव माणकेश्वरांनी भक्तिपूर्वक स्वगृही ठेवून घेतल्या. तेथे त्यांची नित्य पूजा होते.

सदाशिव माणकेश्वर

यांचा कुलस्वामीच श्रीनृसिंह होता. त्यांच्या घरी श्रीमूर्ति आल्या–पासून त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जाऊन नंतर ते पेशव्यांचे कारभारी झाले.

श्रीक्षेत्री स्वतःचें निवासस्थान असावे [म्हणून त्यांनी गांवाचे पश्चिमेस भीमेच्या कांठावर घाट बांधून त्यांवर स्वतःचा प्रचंड वाडा बांधला. भीमेवरील या घाटास माणकेश्वर घाट म्हणतात. या वाड्याचा तट इतका रुंद कीं, त्यांतच घोड्याची पागा बांधून काढलेली होती. वाड्याची वेस ही अंबारीसह हत्ती आंत जाईल अशी उंच होती. या वाड्याचे भग्नावशेष आजहि आहेत.

श्रीलक्ष्मीनृसिंहसन्नादिनी

देवालयाच्या पश्चिम दरवाजाकडे प्रल्हाद मंदिराचे पाठीमागे वाजविण्याची जी घाट (प्रचंड घंटा) बांधलेली आहे ती श्रीलक्ष्मीनृसिह–सन्नादिनी – श्रीलक्ष्मीनृसिहाचा सुमधुर नाद करणारी – नांवानें ओळखिली जाते.

मुळात ही घाट वसई येथील पोर्तुगीजांच्या चर्चमधील. ख्रिश्चनांच्या प्रार्थनांसाठी उपयोगिल्या जाणाऱ्या अशा चार घाटा इ. स. १७२१ साली पोर्तुगीज कारागिरांनी ओतून तयार केल्या होत्या. इ. स. १७३९ साली श्रीमंत चिमाजीआप्पानी वसई जिंकल्यानंतर त्या लुटून पुण्यास आणल्या. श्रीमंत पेशवे यांनी या घाटा निरनिराळ्या देवस्थानाकडे पाठवून दिल्या. त्यापैकी एक घाट सदाशिव माणकेश्वरांच्या प्रयत्नाने नरसिंहपुरीं आली गेली. अशा रीतीनें चिमाजीअप्पांचा पराक्रम श्रीनृसिंहचरणी सेवारुपे रुजू झाला.

खणखणीत आवाजाची व सफाईदार ओतकाम केलेली ही घाट श्रीचे पूजेचेवेळी नित्य तसेंच नैमित्तिकप्रसंगी वाजविली जाते.

बाबा पहिलवान

सोनार जातीतील बाबा नामक पहिलवान याच काळांत श्रीक्षेत्री होऊन गेला. दररोज त्याचा एका बोकडाचा आहार असे, असें म्हणतात. हा मोठाली झाडे लीलया उपटीत असे. देवालयाच्या माडीनजिक याचा पुतळा असून त्यांत त्याचे हे कृत्य दर्शविले आहे.

वरील प्रचंड घाट यानें डाव्या हाताने पेलून उजव्या हाताने बांधली अशी आख्यायिका आहे.

पांच वीरशिला

या क्षेत्री एकूण पांच वीरशिला असून त्यापैकी चार देवालयांत मांडलेल्या आहेत. वीरशिला म्हणजे भूतकाळांत घडलेल्या लढायांची व त्यांत कामी आलेल्या वीरांची स्मारके होत. अशा व या वीरशिलांवर युद्धप्रसंग कोरविलेला असतो. या देवासाठी व देवस्थानासाठी किमान–पक्षी चार लढाया लढल्या व लढविल्या गेल्या व देवस्थान रक्षिले गेले. यांत कोण व किती वीर कामास आले ते एक इतिहासपुरुषच जाणे. तथापि स्वप्राणांची कुरवंडी करून ज्या ज्या वीरांनी हे देवस्थान रक्षिले त्यांची ही शिलास्मारके देवालयांत मांडली जावीत एवढ्या पात्रतेचे ते निश्चितच होते.

पॅटिंजर आणि एल्फिन्स्टन

गांवाचा संपूर्ण शेतीशिवार व गांवठाण हें त्रिवर्गांना अलि आदिलशहाने अग्रहार इनाम करून दिली होती. हीच सनद मराठे–शाहीनेहि पुनरुज्जीवित केली होती. पेशवेशाहीतहि ही सनद चालविली

गेली. पेशवाईचा अस्त करून स्थापन झालेल्या इंग्रजी सत्तेनेहि या सनदेचे पुनरुज्जीवन केले. दि. १६-६-१८१८ रोजी पॅटिंजर नामे इंग्रज अधिकाऱ्याने अहमदनगर मुक्कामी ही सनद कायम केली.

देवस्थानच्या योगक्षेमार्थ मूळ पुरुष विठ्ठल शिवदेव विंचूरकरांनीं पेशवाईत जी महसूल रक्कम-भडोच रुपये सहा हजार-नक्त नेमणूक करून दिली होती तीहि इंग्रज सरकारने 'निरंतरचे अनुदान' या स्वरूपांत कायम केली. दि. २३-६-१८२१ रोजी ही घटना घडली. वरील रुपये सहा हजारचे इंग्रजी शिक्कचाचे रुपये ५६५५ ठरले गेले. मुंबईचा गव्हर्नर एलिफन्स्टन व विठ्ठल नरसिंह विंचूरकर यांच्यात या कामी पत्रव्यवहार होऊन एलिफन्स्टननें या नेमणुकीस मान्यता दिली.

पुण्यश्लोक रघुनाथराव विंचूरकर

मूळ पुरुष विठ्ठल शिवदेवानंतर त्यांचे पुत्र शिवाजी विठ्ठल, त्यांचे बंधु खंडेराव विठ्ठल, त्यांचे पुत्र नृसिंह खंडेराव त्यांचे पुत्र विठ्ठल नृसिंह या सर्व विंचूरकर वंशजांनी श्रीच्या देवालयाचे बांधकाम चालूच ठेवले. शिवाय वरील पुरुष वेळोवेळी श्रीक्षेत्री येऊन क्षेत्रनिवास, दानधर्म, अन्नसंतर्पण करीत. यांनी श्रीस बहुमोल अलंकारहि अर्पिले. देवस्थानचे वैभव चढतेवाढते ठेविले. या वैभवावर लक्षणार्थाने व वाच्यार्थानेहि कळस चढविला. तो पुण्य श्लोक रघुनाथराव विंचूरकरांनी. रघुनाथरावांचा काळ हा देवस्थानाचाच काय पण नरसिंहपुराचाहि ऐश्वर्याचा कळस होय. रघुनाथराव हे मूळ पुरुष विठ्ठल शिवदेवापासूनचे पंचम पुरुष होत. त्यांनी देवालयाचा, शिखराचा जीर्णोद्धार करवून, त्यावर कलश स्थापना करून सुवर्णध्वजहि स्थापिला. यानिमित्ते त्यांनी देवालयाच्या पितळी दरवाजानजिक दोन शिलालेख स्थापिले. एक मराठीत व दुसरा संस्कृतात आहे. संस्कृत शिलालेखातील भाषासौंदर्य कल्पनाविलास व त्याच्या आशयातील अपेक्षा चिंतनयोग्य आहेत.

हे दोन्ही शिलालेख असे -

॥ श्रीशंकर ॥

॥ सार्वभौम राजधानी सातारा येथील ॥
॥ अधिकारी शाहुराजांचे मुख्य प्रधान ॥
॥ ब्राह्मण बाळाजी बाजीराव यांचे सेना ॥
॥ पती प्रथम पुरुष दाणी विठ्ठलराव शि ॥
॥ वदेव वुमदे तुलमुलुक बहाद्दर यांनी ॥
॥ शके १६७८धातानाम संवत्सरे चैत्र शु॥१ ॥
। दिवशी नीराभीमरथी संगमात नूतन ॥
॥ मंदिराची पूर्णता करून प्रल्हादकृत ॥
॥ नृसिंव्ह मूर्ती सिंहासनारूढ केली सां ॥
॥ प्रत त्या देवालयाचा जीर्णोद्धार संपा ॥
॥ दकापासून पंचमपुरुष रघुनाथराव वि ॥
॥ ठ्ठल यांनी शके १७८७ कार्तिक वद्य ५ ॥
॥ रोजी पूर्ण करविला येणेकरून सर्वोत्त ॥
॥ म श्रीलक्ष्मीनृसिंव्ह सुप्रसन्न होवोत ॥

॥ श्रीशंकर ॥

॥ श्री ॥ नाना मंडल भूमिपाल मुकुट प्रोत्कीर्ण ॥
॥ रत्नस्फुरत्कान्त्या यच्चरणौ सरोज मृदुलौ नीरा ॥
॥ जितौ प्रत्यह ॥ यद्भीत्या प्रपलायिता रिपुगणाः ॥
॥ शीध्या इतीव द्रुतं यत्कीर्तिश्च दिगंतराण्युप ॥
॥ गता विद्वद्दिपत्यासह ॥१॥ तस्या सन्नरवर शाहु ॥
॥ राज नाम्नः सद्बुद्धिप्रसर विराजिमंत्रिणोष्टौ ॥ तं ॥
॥ मध्ये द्विजमणि बाजिराय शर्मा तत्सूनुः समज ॥
॥ नि बाल नाम ध्येयः ॥२॥ सेनापतिः समभवत्किल ॥
॥ तस्य शौर्य चातुर्ययोः प्रकटनात्पति सेवनाच्च ॥
॥ दाणीत्युपाव्हय धरः शिवशर्मसूनुः श्रीविठ्ठला ॥
॥ भिध उदारमति र्द्विजेंद्रः ॥३॥ तेने भस्वर रसभू ॥
॥ शके मुदायः प्रासादो रचि नृहरेः समर्पितः प्रा ॥
॥ क् ॥ तंदृष्टवा शिथिलतरंहि तज्जपुत्रा त्पौत्रो ॥
॥ भूत्खलु रघुनाथ नामधेयः ॥४॥ नूत्नंतं व्यत ॥
॥ नो च्च वीर नृहरेः पादाब्जयोरर्पणाऽज्जीर्णोद्धार ॥
॥ फलं यथोक्तमनुना प्राप्नोतु तत्कारकः ॥ कर्तुवं ॥
॥ श समुद्भवाश्च पुरूषः कीर्त्यायुरारोग्यतो लक्ष्म्या ॥
॥ ब्रह्मविदा चिराय सुखिनो नंदंतु सव्दासनाः ॥

संस्कृत शिलालेखांतील ' सन्नरवर शाहुराजनाम्नः ' ' यद्धीत्या प्रपलायिता रिपुगणाः ' ' श्रीविठ्ठलाभिधउदारमति द्विजेंद्रः ' ' प्रासादोरचि नृहरेः समर्पितः प्राक् ' ही वचने अंतःकरण हेलावून जातात.

चिराय सुखिनो नंदंतु सद्वासनाः

रघुनाथरावांनीं इच्छा दर्शविल्यावरून ग्रामस्थांनी त्यांना गांव–ठाणांतील जागा दिली. त्यावर त्यांनी स्वतःचा पेशवेपद्धतीचा वाडा बांधला. ग्रामस्थांनी त्यांना वाड्यालगतचे दोन मळे दिले. त्यांत विहीरी खणून व त्या बांधून त्यांत श्रीसाठी पुष्पवाटिका लाविल्या. वेद–शास्त्रांचा अभ्यास नरसिंहपुरी चालत असेच. त्यास स्थैर्य यावे एतदर्थ त्यांनी श्रीक्षेत्री वेदशाळा, शास्त्रशाळा स्थापिली. काशीस जाऊन अध्य–यन करून आलेले ग्रामस्थ विव्दान् षट्शास्त्राध्यायी रंगशास्त्री मायभटे यांना या शाळांत प्रधानाध्यापक म्हणून नेमले. आर्ष वाङ्म–याबरोबरच विदग्ध वाङ्मयाचाहि अभ्यास येथे होई. याच रंगशास्त्रीनी रचिलेली श्रीची गद्यस्तोत्रे रम्य आहेत. या स्तोत्राच्या अखेरीस शास्त्री-बुवानी रघुनाथरावांचीहि स्तुति केलेली असून त्यांना दाणीन्द्रभूप म्हणून गौरविले आहे.

जीव वैकुंठवासी असोत

श्रीनृसिंहाचे दगडी सिंहासन रघुनाथरावांनी चांदीच्या पत्र्यानें मढविले. त्यांवर खालील अक्षरे कोरविली.

। मूलपुरुष । विठ्ठल शिवदेव । त्यांचे पुत्र । शिवाजीपंत । त्यांचे बंधु । खंडेराव । त्यांचे पुत्र । नृसिंहराव । त्यांचे पुत्र । विठ्ठलराव । त्यांचे पुत्र । रघुनाथराव । त्यांच्या स्त्रिया सौभाग्यवती काशीबाई । सौ. रमाबाई । सौ. जानकी वर लिहिलेल्या नामांनी संज्ञित जे जीव ते या नामाक्षरासी श्रीलक्ष्मीनृसिंह चरणोदकसंबंधाने पवित्र होऊन वैकुंठवासी असोत.

श्रीलक्ष्मीनृसिंहाच्या नित्याच्या चरणस्पर्शाने पवित्र झालेल्या जलस्पर्शाने आपला अवघा वंश वैकुंठवासी पवित्र असेल अशी ज्यांची दृढ श्रद्धा व स्थितप्रज्ञा त्या रघुनाथरावांच्या नृसिंहभक्तीस तोड नाही.

चांदीच्या मुकुटावरील श्रीपादुका

विंचूरकरांच्या वाडयांतील देवघरांत प्रमुख स्थानी, चांदीच्या मुकुटावर स्थापिलेल्या श्रीनृसिंहांच्या चांदीच्या पादुका रघुनाथरावांनी स्थापना केल्या, त्यांचा इतिहास असा –

श्रीक्षेत्रीच्या प्रघातानुसार श्रीभक्त श्रीची पंचामृत पूजा करतात. पूजा संपल्यानंतर पूजाधिकारी भक्तांस ' श्रीलक्ष्मीनारसिंहः प्रसादोस्तु ' म्हणून नारळ प्रसाद देतात.

शास्त्रमार्गाचा सखोल विचार करणाऱ्या रघुनाथरावांच्या हे ध्यानी आले की, हा प्रसाद घेतांना सोवळयात असल्याने आपणांस रिक्तशीर्षाने प्रसाद घ्यावा लागतो व ही गोष्ट शास्त्रमार्गास सोडून आहे. शीर्षावर पगडी धारण करणे हे सोवळयामुळे अशक्यच. शीर्षावर मुकुट धारण करणे हा एकमेव पर्याय शिल्लक राहिला. मुकुट धारण करण्याची पात्रता त्यांची निश्चितच होती. तथापि यांतहि एक अडचण त्यांना जाणवली. मुकुट धारण करून श्रीजवळ उभारण्यांत श्रीचा उपमर्द होत होता. म्हणून मुकुटावर त्यांनी श्रीच्या पादुका स्थापित केल्या. हा पादुकास्थापित मुकुट शीर्षावर धारण करून रघुनाथराव नारळ प्रसाद घेत.

या मुकुटावर श्रीनृसिंहाचा मंत्रराज कोरविलेला असून पादुकांवर शंखचक्रपद्मादि शुभचिन्हे कोरविली आहेत.

शीर्षी मुकुट धारण करणारे रघुनाथराव हे शेवटचे विंचूरकर व मुकुटावर पादुका स्थापन करणारे रघुनाथराव हे पहिलेच विंचूरकर होत.

चंद्रकांत शालिग्राम

विंचूरकर वाड्यांतील देवघरांत आणखी एक साक्षात्कारी देवता होती. ती म्हणजे चंद्रकांत शाळिग्राम ही होय. नारळाएवढ्या आकाराच्या या शाळिग्रामावर आकाशस्थ चंद्राच्या कलांचा प्रत्यय येई. पौर्णिमेदिवशी हा पांढराशुभ्र दिसे. वद्य प्रतिपदेपासून यास कला लागून त्या प्रमाणांत त्या वाढत वाढत अमावास्येस तो संपूर्ण काळा होई. शुद्ध प्रतिपदेपासून तो प्रतिदिनी पांढरा होत जाई. पौर्णिमेस तो पुनः संपूर्ण पांढरा होई.

श्रीगरुड मूर्ति

प्रतिवर्षी वैकुंठचतुर्दशीदिवशी एक नवाच उत्सव साजरा करण्याची प्रथा रघुनाथरावांनी निर्माण केली. त्यासाठी दक्षिण भारतांतील कंपली येथील कुशल जिनगरांकडून त्यांनी श्रीविष्णूचे वाहन जो गरूड त्याची एक भव्य मूर्ति तयार करवून ती श्रीनृसिंहास अर्पण केली. अत्यंत बांधेसूद व डौलदार अशी ही मूर्ति स्वतः बरोबरच कलाकाराच्या कलेलाहि वंदन करावयास लावते.

या मूर्तीच्या मस्तकी श्रीच्या पादुका ठेवून गरूडाची मिरवणूक प्रति वैकुंठचतुर्दशीस निघते. या उत्सवाचा प्रारंभ शके १८०३ पासून झाला.

शाळा, धर्मशाळा आणि सडक

नरसिंहपूर येथील मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी एतदर्थ येथे प्राथमिक शाळा सुरू करण्याचा यत्न करून व इमारतीच्या बांधकामाचा भार उचलून रघुनाथरावांनी येथे शाळा सुरू केली. धर्मशाळेचे अपुरे काम पुरे केले. धर्मशाळेमुळे यात्रेकरूंच्या निवासाची सोय झाली. शिवाय विंचूरकर वाड्यापासून देवालयापर्यंत पक्की सडक तयार करवून तिच्या दुतर्फा वृक्ष लाविले.

नाव त्रिवर्गास अर्पण केली

तीन बाजूंनी पाण्यानें वेढल्या गेलेल्या या गांवास पूर महा-पुराची भीती कायमचीच होती. वहातुकीसाठी छोटयामोठ्या होड्या होत्याच. तरीहि प्रसंगी मोठ्या प्रमाणात वहातुक करण्यासाठी मोठीशी नाव असणे आवश्यक होते. ही अडचण जाणून रघुनाथरावांनी एक मोठीशी नाव करवून तिचे विधीपूर्वक पूजन करून ती या क्षेत्रातील वृत्तिवंत ब्राह्मण जे पूजाधिकारी, जोशी व धर्माधिकारी यांना अर्पण केली.

नंतर या नावेचा उपयोग सर्वच स्थानिकांना होऊ लागला. पुराचे वेळी जीवित व मालमत्तेच्या रक्षणासाठी व अन्यवेळी हौसेसाठीहि विंचूरकर वाड्यांतील गणपतीचे विसर्जन या नावेतून वाजत गाजत होई. प्रसंगी गर्भवतीस डोहाळे जेवणहि चालत्या नावेतून होई.

श्रीनृसिंहमूर्तीस वज्रलेप

प्रल्हादकृत नृसिंहमूर्ति ही वालुकेची असल्याने ती कालान्तराने सूक्ष्म होत चालली. ती सुदृढ रहावी म्हणून रघुनाथरावांनी या मूर्तीस वज्रलेप करविला. विशिष्ट औषधीचे मिश्रण करवून कुशल ब्राह्मणां-करवी त्याची पांच पुटे मूर्तीवर चढविली. या कार्यास दोन महिने लागले. तावत्कालपर्यंत अनुष्ठानादि धर्मकृत्ये चालू ठेविली. शेवटी श्रावण शु।। ४ शके १८०३ या दिवशी या कामाची पूर्तता होऊन त्यांनी श्रीची महापूजा करून क्षेत्रसमाराधना घातली. अनुष्ठानाची सांगता केली. या वज्रलेपाने मूर्ति सुदृढ होऊन भक्तांना श्रीमूर्तीवर विधिउपचार करतां येऊं लागले.

महासति जानकीबाई विंचूरकर

रघुनाथरावांची तृतीय पत्नी महासाध्वी जानकीबाई नृसिह-भक्तीत आपल्या पतीच्याच तोलामोलाची होती. या साध्वीचा अंतकाळ

श्रीक्षेत्री विंचूरकर वाड्यातच झाला. देवालयाच्या शिखर कलशाकडे स्थिर दृष्टी करून या सतीने अखेरचा श्वास सोडला. यांचे दहन नीराभीमा संगमावर केले. तेव्हां मणिमंगळसूत्रादि सौभाग्यालंकार त्या चितेतून जसेच्या तसे निघाले. या स्थानी रघुनाथरावांनी एक लहानसे शिवमंदिर बांधवून त्याच्या पूजेचीहि व्यवस्था केली. यास जानकेश्वर असे म्हणतात.

जानकी–रघुनाथ

सूत्ररुपे सांगावयाचे तर रघुनाथराव विंचूरकर ही एक व्यक्ति नसून ती एक विभूति होऊन गेली. श्रीमंत सरदाराच्या वंशातील हा पुण्यपुरुष होता. स्वतःच्या प्रपंचात कांही बाबतीत असुखी असतानादेखील इतरांचे सुख पहाणारा व साधणारा, स्वतःच्या पारमार्थिक हिताबरोबरच नरसिंहपुराचेहि हित साधणारा, संपत्तीचा अनाठायी संचय न करतां ती श्रीच्या व क्षेत्राच्या सेवेचे एक साधन म्हणून उपयोगिणारा, स्वधर्मनिष्ठ, उदार अंतःकरणाचा, विद्वान, संत, सज्जन व कलावंत याचा चहाता व आश्रयदाता, सदाचारसंपन्न एवंगुणविशिष्ट सद्गुणांचा समुत्कर्ष त्यांचे ठायी झालेला होता. सर्व प्रकारचे ऐहिक ऐश्वर्य – सत्ता, द्रव्य, मानमरातब – ही अनुकूल असतानाहि या सर्वांना श्री व श्रीक्षेत्राच्या मार्गी लावणारा, ऐश्वर्य, बुद्धि, शक्ति, वाणी, मन व शरीर श्रीक्षेत्रासाठी वेचणारा ‘ श्रुतिस्मृतिपुराणोक्त सदाचारसमन्वितः ’ या मार्गानें चालणारा हा महापुरुष केवळ विंचूरकर वंशाचेंच नव्हे तर नरसिंहपूराचेहि भूषण बनून राहिलेला आहे.

त्यांची पत्नी जानकीबाईही त्यांना ‘ अनुरुप ’ होती. या एकाच शब्दांत त्या माऊलीचे महत्त्व सांगता येईल.

देवालयांतील लाकडी सभामंडपांत प्रल्हादाचे मंदिरावरील कांचेच्या कपाटांत या भक्तवर्य दांपत्याचे हात जोडून बसलेले पुतळे आहेत ते अगदी यथार्थ आहेत. भक्त प्रल्हादाबरोबरच यांचेहि दर्शन घ्यावे.

श्रीनृसिंह प्रल्हाद

या विंचूरकर पतिपत्नीच्या पुतळयांच्या वरील बाजूस एक भला मोठा आरसा बसविलेला आहे. आरशाचे हे स्थान व त्याचा बसविण्याचा कोन असा साधविलेला आहे की या सभामंडपांत भक्त प्रल्हादाच्या सन्मुख उभे राहीले असतांना या आरशांत श्रीनृसिहमूर्तीचे प्रतिबिंब दिसते. प्रल्हाद व रघुनाथराव या भक्ताबरोबरच भगवंताचेहि दर्शन घडते.

हा आरसा अशा रीतीने बसविणारा मनुष्य कल्पक खरा.

देव मामलेदार

नरसिंहपुरानजिक असलेल्या भोसे या गांवचे एक रहिवासी पुढे देव मामलेदार म्हणून प्रसिद्धी पावले. ही व्यक्ति बालपणापासूनच गुणवान् व विरक्त होती. येथील नृसिंह हा त्यांचा कुलस्वामी असून त्यावर त्यांची दृढ श्रद्धा होती. वयांत आल्यावर हे प्रथम इंग्रज सरकारचे पदरी कचेरीत कारकून म्हणून कामास लागले व पात्रतेने पुढे मामलेदार झाले. या बढतीबरोबरच वैराग्याचीहि बढती होत गेली व नृसिहभक्ति अत्युत्कर्षास पोहोचली. सर्व सद्‌गुणांचा समुत्कर्ष झाल्याने खाजगी जीवनातच काय पण सरकारी वर्तनातहि व्यावहारिक चुका होऊ लागल्या म्हणून सरकारने त्यांना पेन्शन मागण्यास सांगताच यांनी सरळ नोकरीचे त्यागपत्र दिले. आतां ही व्यक्ति मुक्त झाली. त्यांचेभोवती अफाट जनसमुदाय गोळा झाला. अनेकांना त्यांनी भक्तिमार्गास लावले. नंतर हा भक्तगण इतका वाढू लागला की, त्यासाठी सरकार पोलिस बंदोबस्त ठेवी. यांच्या केवळ नामस्मरणाने लोकांचे रोग बरे होत व पीडानिवारण होई.

रघुनाथराव विंचूरकरांचा व यांचा परमस्नेह होता. रघुनाथरावांनी यांना गंडकी शीलेची नृसिंहमूर्ति अर्पण केली. तसेंच जानकीबाई

विंचूरकरांचीहि या मामलेदारावर अचल श्रद्धा होती. नरसिंहपुरी मृत्युसमयी जानकीबाईंनी नृसिंहाबरोबरच यांचेहि स्मरण केले.

इंदूरचे तत्कालिन राजे तुकोजीराव होळकर यांनीहि या महाराजांना बोलावून इंदुरांत स्वतःच्या राजवाड्यात सन्मानपूर्वक ठेवून घेतले होते.

नृसिंहभक्ती परोपकाराचे व लोकप्रियतेचे केवढे उंच शिखर गाठूं शकते याचे हे महाराज म्हणजे प्रत्यंतर होत.

सिद्धयोगी अक्कलकोट स्वामी महाराज

रघुनाथराव विंचूरकरांनी अनेक सत्पुरुषांच्या सेवेत आपला काल व्यतीत केला. त्यापैकी अक्कलकोट स्वामीमहाराज हे एक होत. कर्दळीवनातून बाहेर पडून स्वामी संचारार्थ भारतभर हिंडले. महाराष्ट्रांत त्यांचा संचार झाला तेव्हां ते मोहोळ भागांत आले असतांना ते या क्षेत्रीहि येऊन गेले. श्रीनृसिंह हे त्यांचे आवडते उपास्य होते. क्वचित् कोणी त्यांना नांव विचारले तर ते नृसिंहभान असे सांगत. क्वचित् स्वामी नृसिंहवेषातहि असत. त्यांचे असे एक छायाचित्र उपलब्ध आहे.

सेनापति तात्या टोपे

अठराशे सत्तावन्नच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे सेनापति तात्या टोपे यांचे घराणे मूळचे येवल्याचे. तेथून नजिकच असलेल्या कान्हेगांव या गोदावरीच्या तीरावरील नृसिंहाचे हे पूजाधिकारी होते. कान्हेगांव येथे नरसिंहपूरचेच स्थान आहे. नरसिंहपूरचा नृसिंह हा या टोपे घराण्याचा कुलस्वामी होय. स्वातंत्र्य संग्रामाआधीच्या अस्थिरतेच्या व नंतरच्या प्रक्षोभाच्या काळांतहि तात्या कधी उघडपणे तर कधी गुप्तपणे नरसिंहपुरी येऊन श्रीदर्शन घेऊन जात. त्याचे वंशज अजूनहि येथे येतात.

कृष्णाचार्य भीमाचार्य गंजीहाळकर

देवालयाच्या लाकडी सभामंडपातील कांचेच्या कपाटातून एका बाजूस गरूडासह श्रीविष्णूचे दशावतार व दुसऱ्या बाजूस हनुमानासह रामपंचायतन व शिवपंचायतन अशी सुरेख मूर्ति बसविलेल्या आहेत. त्या कृष्णाचार्य भीमाचार्य गंजीहाळकर या विंचूरकरांच्या आश्रितांनी मुद्दाम तयार करवून त्या देवस्थानास अर्पण केल्या. या सर्वच मूर्ति अत्यंत उत्कृष्ट अशा असून त्या दक्षिण भारतांतील तुंगभद्रेच्या तीरा–वरील कंपली या गांवच्या कुशल जिनगर कारागिरांनी बनविलेल्या आहेत. या नयनमनोहर मूर्तींचा रेखीवपणा अविस्मरणीय आहे.

सुमारे चार वर्षापूर्वी अक्कलकोट येथे झालेल्या महायज्ञाच्या मंडपांत वरीलपैकी दशावतारांच्या मूर्ति मुद्दाम ठेविल्या होत्या. त्या पाहून परदेशी पाहुणे विस्मित झाले.

सांप्रतचे श्रीचे देवालय

सांप्रतचे श्रीचे देवालय हे उतुंग व भव्य असे असून पेशवे काळां–तील वास्तुशिल्पाचा हा आदर्श आहे. देवालयाच्या चारहि बाजूंनी रूंद व भक्कम असा दगडी तट आहे. श्रीमूर्तीचा प्रमुख गाभारा, त्यापुढील गर्भागार, रंगशीलेचा सभामंडप हे संपूर्ण दगडी बांधणीचे काम असून ते खसखशी टाकीचे आहे. दगडी छतांवरील वेलपत्ती, नक्षी व विविध देवांच्या मूर्ति लक्षणीय आहेत. घडीव दगडी खांब कुशलतापूर्वक कोरलेले आहेत. वरील तीन यंत्राकार गाभारे व शिखर एकसमयाव–च्छेदेकरून पाहिल्यास ते महादेवाच्या शाळुंकापिंडीप्रमाणे दिसते. पितळी दरवाजापुढे लाकडी सभामंडप असून त्यापुढे प्रल्हादाचे मंदीर आहे. रंगशीळेच्या मंडपाच्या दोन्ही बाजून दोन उन्मुखे आहेत. सर्व दगडी दरवाजांवर जयविजय घडविलेले असून पितळी दरवाजांवरील जय–विजयांची सुबकता व मुद्रा या विलोभनीय आहेत. दोन्ही उन्मुखाचे खांब व त्याबाजूचे दगडी हत्ती हे केवळ प्रेक्षणीय असे दगडी हत्ती, पश्चिम दरवाजा, पूर्व दरवाजा व दक्षिण उत्तर उन्मुखे येथे आहेत. विंचूरकरांच्या

तसबिरी सभामंडपात लावलेल्या असून त्या शंभर वर्षापेक्षा अधिक जुन्या आहेत. स्थानिक शामराज वांकर यांनी वेंचलेल्या पुराणांतरीच्या नीतिबोधाचे सहा फलकहि मंडपात लाविलेले आहेत. देवालयाच्या शिखरांवर तसेंच सौधावर पुराणांतील कित्येक प्रसंगाचे, कांहीं शृंगारिक – पेशवाई वेषांतील कोणीएक तरणाबांड सरदार व त्याच्या शेजारी चापून चोपून वस्त्र नेसलेली त्याची ती, हा सरदार तिचे उरोज दर्शवितो आहे– प्रसंगांचे तसेंच साहेब मडमांचेहि पुतळे आहेत. भीममारूती, बाबा पहिलवान व अष्टभुजा जगदंबा हे पुतळे विशेष प्रेक्षणीय आहेत. देवालयाचा पश्चिम दरवाजा फारच भव्य व प्रेक्षणीय आहे. जमिनीपासून तेहतीस पायऱ्या उंच यापैकी एका पायरीचा दगड घडवितांना त्यावर 'देवाचे पाऊल' उमटलेले आढळले. ती खूण तशीच राखून हा दगड पायरीस बसविला – पायऱ्याच्या दोन्ही बाजूस दोन उत्तुंग बुरुज लगत ऐश्वर्याचे प्रतीक असे दोन हत्ती, असे हे भव्य बांधकाम आहे. या भल्या प्रशस्त दरवाजावरील माडी व त्यावरील सज्जा. पुण्याच्या शनवारवाडचाची प्रतिमा समोर ठेवून हें बांधकाम झालेले असावे.

पश्चिम दरवाजांतून दिसणारे दृश्य तर केवळ विलोभनीय. समोर दिसणारा नृसिह तीर्थाचा रम्य आसमंत व नृसिंहतीर्थाशी असणारी या दरवाजाची समांतर पातळी, वळणावळणाने वहात येणारी नीरा नदी, डावे बाजूस लक्ष्मी घाट, शीतल वाऱ्याचा सुखद स्पर्श व पाठीशी श्रीनृसिंह व भक्त प्रल्हादाची परंपरा हे दृश्य व वातावरण देहभान हरपवून टाकते.

देवालयाच्या चारहि बाजूंनी ओवऱ्या असून उत्तर दरवाजा (धमाधमा) पूर्वदरवाजा (महाव्दार) व अपुरा राहिलेला दक्षिण दरवाजा असे एकूण चार दरवाजे आहेत.

परिवार देवता

प्रदक्षिणेच्या क्रमाने देवालयांतील परिवार देवता अशा –

शेजघर – हे रंगशाळेच्या गाभाऱ्यांत असून शेजघरांत दोन जुनाट छपरी मंचक आहेत. एक श्रीनृसिंहाचा व दुसरा शामराजाचा. मंचकावर रूईने भरलेल्या गाद्या, गिरद्या व उशा ठेवलेल्या आहेत.

स्तंभनृसिंह – रंगशाळेच्या सभामंडपांतील एका स्तंभावर हिरण्यकशिपूच्या वधाचा प्रसंग कोरविलेला आहे. नृसिंहमूर्तीच्या मुखावरील क्रुद्ध भाव पहाण्यासारखा आहे.

श्रीलक्ष्मी मंदीर – श्रीनृसिंहाचे डावे बाजूस लक्ष्मीचे लहानसे मंदीर आहे. श्रीलक्ष्मीची रेखीव व सुंदर मूर्ति गंडकी शिळेची आहे. मूर्ति उभी आहे. पूजा बांधल्यावर ती बसल्यासारखी दिसते.

प्रल्हाद मंदीर – श्री नृसिंहाच्या समोर लाकडी सभामंडपांत भक्त प्रल्हादाचे मंदीर आहे. हात जोडून उभी राहिलेली आणि अर्धोन्मीलित नयनाची भक्त प्रल्हादाची ही मूर्ति काळया पाषाणाची आहे. ही मूर्ति नरसिंह खंडेराव विंचूरकर यांनी तयार करवून ती शके १७१८ साली स्थापन केली. या आधीच्या प्रल्हादमूर्तीस इजा झाल्याने ही नवीन मूर्ति करविली गेली. प्रल्हादकृत नृसिंहमूर्ति व प्रल्हादमूर्ति या एकमेकांच्या समोर असून नृसिंहमूर्तीच्या पायांच्या समपातळीस प्रल्हादमूर्तीचे मस्तक येते. अशा रीतीने या उभयमूर्तींच्या सिंहासनांची रचना केलेली आहे.

चिंतामणि – श्रीलक्ष्मीमंदिरानजिक चिंतामणि देवता असून तेथे श्रीगणपतीची मूर्ति व महादेवाची पिंडी आहे.

श्री दत्तात्रेय – दत्तासाठी एक छोटेसे देवालय बांधलेले आहे. हे बांधकाम अर्वाचीन आहे. पांढऱ्या संगमरवराची दत्ताची मनोहर मूर्ति सिंहासनावर स्थापित आहे. ही मूर्ति सुमारे पंचवीस वर्षापूर्वी स्थापिली. तत्पूर्वीची मूर्ति भंगल्याने ही नवीन मूर्ति स्थापिली.

भीमाशंकर – देवाच्या उजवे बाजूस भीमाशंकराचे छोटेसे देऊळ आहे. शाळुंकेच्या मानाने पिंडी उंच आहे.

रुक्मिणी विठ्ठल – भीमाशंकराचे उजवे बाजूस छोटया देवळात विठ्ठलरुक्मिणीच्या मूर्ति आहेत. रूक्मिणीची मूर्ति विठ्ठलाच्या मूर्तीशी विसंवादी दिसते. रुक्मिणीची मूळची मूर्ति भंगल्याने आताची मूर्ति सुमारे दहा वर्षापूर्वी नव्याने वसविली आहे.

माध्वांची वृंदावने – नरसिंहपूर हे माध्वसंप्रदायाचे केंद्र. तेव्हां माध्व संप्रदायांतील अधिकारी सत्पुरूषांची वृंदावने येथे आहेत. संभवते की, त्या त्या आचार्यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृत्यर्थ ही वृंदावने बांधली असावीत. यापैकी शके १८५० मध्यें बांधविले गेलेले वृंदावन राघवेंद्रस्वामींचे आहे.

शालिग्राम – शाकंभरीच्या मंदीरानजिक शालिग्रामाच्या आकाराचा एक मोठा पाषाण आहे. देवालयरूपी देव्हाऱ्यांत एवढा शालिग्राम हवाच.

तरटीनृसिंह – मोठा ओटा, त्याच्या केंद्रस्थानी तरटीवृक्ष व त्याखाली श्रीच्या चार पादुका, पैकी एक प्राचीनतम, व दुसरी प्राचीन व तिसरी अर्वाचीन आहे नजिकच एक मूर्ति असून या मंदीरा– शेजारच्या दुसऱ्या एका तरटीवृक्षास पार बांधलेला आहे. हे मंदीर बाबा बावडेकर यांनी बांधविले. जुन्या मंदीरात नृसिंहमूर्ति या स्थानी होती.

शाकंभरी – अष्टादशभुजांनी युक्त अशी देवीची मूर्ति या लहान-शा मंदीरांत आहे.

काशी विश्वेश्वर – खोल गाभारा असलेले शिखरयुक्त व महादेवाच्या पिंडीशाळुंकेप्रमाणे दिसणारे एक मध्यम देऊळ, समोर ऐटीत बसविलेला दगडी नंदी, गाभाऱ्यात साजिरी पिंडीशाळुंका आहे. हा काशीविश्वेश्वर. ही पिंडी काढली असता खाली एक खोलगट भाग दिसतो. त्यांत स्वच्छ जल आढळते. त्यांत तीन बाण आहेत. हे ब्रह्मा– विष्णू महेश.

काळा दत्त – काशीविश्वेश्वराच्या उजवे बाजूस एका देवळात श्री दत्तात्रेयाची वालुकेची मूर्ति आहे. त्यास काळा दत्त असे म्हणतात.

मुहूर्त गणपती – या पुढे एका स्तंभावरील कमानीत गजाननाची मूर्ति आहे. मुख्य देवालय बांधण्यापूर्वी गजाननाचें देवालय बांधून त्यांत गजाननाची स्थापना केली गेली.

काळभैरव – पूर्व दरवाजाकडे भैरवनाथाचे देऊळ ओवरीत आहे. हे स्थान सोनारी येथील. येथें भैरवनाथाच्या दोन मूर्ति आहेत.

रामेश्वर – लक्ष्मीच्या मंदीरालगत रामेश्वराचे अगदी लहान देऊळ आहे. श्रीनृसिंहाच्या डावे, उजवे व पार्श्वभागी अनुक्रमे रामेश्वर, भीमाशंकर व काशीविश्वेश्वर ही तीन शिवस्थाने असून या तिन्ही स्थानी स्वतः श्रीशंकर वास करतात. नरसिंहपूर येथील लोकांनी काशी रामेश्वर यात्रा करावयाची नाही असा संकेत आहे.

क्षेत्रातील अन्य देवतास्थाने

देवालयाखेरीज क्षेत्रांत अन्य देवतास्थाने आहेत. ती अशी –

आढ्यानृसिंह – गांवाच्या पश्चिमेस हे छोटेसे मंदीर असून आंत नृसिंहाची चतुर्भुज मूर्ति आहे. मस्तकी मुकुट आहे. पेशवेकालात एकदा या क्षेत्रावर पेंढारी परचक्र आले असताना या स्थानावरून भुंग्याचे थवेच्या थवे निर्माण झाले व त्यांनी हे परचक्र पिटाळून लाविले अशी आख्यायिका आहे. या प्रसंगाच्या स्मरणार्थ हे मंदीर उभारून त्यांत नृसिंहमूर्ति स्थापिली गेल्याचे दिसते.

श्रीहनुमान – हें स्थान भीमेच्या बाजूस असून श्रीचें दगडी देवालय बांधलेले आहे. बाजूस मोकळे आवार आहे. शके १८५८ साली एक ग्रामस्थ गोविंद नरहर सुरु यांनी मुद्दाम करविलेली हनुमानाची वीरमूर्ति या मंदिरात नव्याने स्थापिली. मूर्ति प्रेक्षणीय आहे. आधीची मूर्ति भंगल्याने या नूतन मूर्तीची प्रतिष्ठापना केली गेली.

श्री एकवीराई – श्रीहनुमानाचे मागील बाजूस जमिनीच्या आंत बाधलेले हे देऊळ असून आंत या देवीचा तांदळा आहे. ही रेणुकादेवी म्हणजे भगवान परशुरामाची माता होय.

श्री हनुमान – गांवाच्या पश्चिमेस या हनुमानाचे देऊळ आहे. नजिक कांही समाध्या आहेत. या सर्व सत्पुरुषांनी या क्षेत्री तपश्चर्या केल्या असाव्यात वा त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग या क्षेत्री केला असावा. यापैकी एक समाधि निंबाळकराची आहे.

श्री शिरसाई – आदिशक्तीचे हे स्थान तुळजापूरचे आहे. छोटया-शा देवळात देवी आहे. शिरसूफळ येथील हे स्थान आहे असेहि म्हणतात.

श्री भैरवनाथ – नीरेच्या पैलतीरावर हे स्थान असून मध्यमसा गाभारा, पुढे सभा मंडप असे दगडी बांधणीचे देऊळ आहे. क्षेत्रपाल जोगेश्वरी यांच्या मूर्ति गाभाऱ्यांत आहेत. शिवाय नीरानदीच्या पात्रांत एक भग्न देऊळ असून त्यास जलभैरवनाथ असे म्हणतात.

स्वामी समाधि – वैष्णव संप्रदायांतील कोणा अधिकारी स्वामींनी या क्षेत्री समाधि घेतली. त्यांची समाधि गांवाच्या पश्चिमेस शके १७७८ नळनाम संवत्सरे भाद्रपद शु।। ५ रोजी वामन दंडवते यांनी बांधून पूर्ण केली. मंदिराच्या परिसरात आणखी पांच लहानशा समाध्या आहेत.

पद्मगिरीबुवांचा मठ – नाथपंथाचाहि प्रसार या क्षेत्री झालेला दिसतो. या पंथातील कोणी पद्मगिरीबुवा यांचा मठ भीमेच्या काठांवर आहे.

एकदरीने विचार करतां या क्षेत्री श्रीनृसिंहाची अकरा स्थाने, शंकराची बारा स्थाने, गणपतीची एकवीस स्थाने, शक्तीची सहा स्थाने, मारूतीची अकरा स्थाने व गरूडाची पांच स्थाने आहेत. ती अशी –

नृसिंहाची एकादश स्थाने – (१) प्रल्हादकृतनृसिंह (२) ब्रह्मदेवकृत नृसिंह (३) स्तंभनृसिंह (४) भीमाशंकरानजिकचा स्तंभनृसिंह (५) गांवाच्या पश्चिमेचा आढयानृसिंह (६) दशावतार मूर्तीतील

नृसिंह (७) आद्यनृसिंह (८) नृसिंहतीर्थावरील नृसिंह (९) तरटी नृसिंह (१०) सोळखांब्यावरील अश्वत्थ नृसिंह (११) भीमातीरावरील भीमानृसिंह

शंकराची द्वादशस्थाने- (१) भीमाशंकर (२) काशी विश्वेश्वर (३) रामेश्वर (४) देवालयांतील चिंतामणीतील शिवलिंग (५) सोळखांब्यावरील शिवलिंग (६) कवडे घाटावरील शिवलिंग (७) संगमकांठच्या चिंतामणीतील शिवलिंग (८) माणकेश्वर घाटावरील शिवलिंग (९) दुर्गातीर्थावरील शिवलिंग (१०) सभामंडपांतील विंचूरकर पुतळयानजिकची शंकरमूर्ति (११) सभामंडपांतील शिवपंचायतनांतील शंकर मूर्ति (१२) श्रीजानकेश्वर

गणपतींची एकवीस स्थानें - (१) देवालयांतील मुहूर्त गणपती (३) प्रल्हाद मंदीराच्या पाठभिंतीतील गणपती (३) काशीविश्वेश्वर गाभाऱ्यांतील गणपती (४) काशीविश्वेश्वराच्या नंदीजवळचा गणपती (५) दक्षिणेकडील ओवऱ्यातील गणपती (६) कवडे घाटावरील बुरुजातील गणपती (७) माणकेश्वर घाटावरील मुहूर्त गणपती (८) लक्ष्मी घाटावरील बुरूजांतील गणपती (९) सोळखांब्यावरील गणपती (१०) संगमकांठावरील चिंतामणीतील गणपती (११) गणेशतीर्थावरील गणपती (१२) दक्षिण उन्मुखावरील गणपती (१३) देवालयाच्या पितळी दरवाजावरील गणपती (१४) गर्भागारांवरील गणपती (१५) मूळ गाभाऱ्यावरील गणपती (१६) देवालयांतील चिंतामणीतील गणपती (१७) विंचूरकर पुतळयानजिकचा गणपती (१८) शिवपंचायतनांतील गणपती (१९) लक्ष्मी मंदीरावरील गणपती (२०) प्रल्हाद मंदीरावरील गणपती (२१) उत्तर उन्मुखावरील गणपत्ती.

आदिशक्तीची सहा स्थाने - (१) देवालयांतील श्रीलक्ष्मी (२) घाटावरील महालक्ष्मी (३) देवालयांतील शाकंभरी (४) शिरसाई (५) एकवीराई (६) दुर्गातीर्थावरील ईवराई.


मारूतीची अकरा स्थाने - (१) शामराज मूर्तिनजिकचा मारुती

(२) प्रल्हाद मंदीरांतील मारूती (३) सोळखांब्यावरील मारूती (४) सुरुस्थापित मारूती (५) नागघाटांवरील मारूती (६) लक्ष्मी घाट बुरुजांतील मारूती (७) देवस्थान मळ्याजवळील मारूती (८) कवडे घाटावरील मारूती (९) नृसिह तीर्थावरील मारूती (१०) दक्षिणे-कडील ओवऱ्यांतील मारूती (११) तीर्थकुंडाजवळील मारूती.

गरूडाची पांच स्थाने – (१) प्रल्हाद मंदीरांतील गरूड (२) दशावतारातील गरूड (३) विंचूरकर अर्पित गरूडमूर्ति (४) दक्षिण ओवऱ्यांतील गरूड ५) शामराजाच्या पाठभितीतील गरूड.

देवस्थानाचें अप्रतिम ऐश्वर्य


रघुनाथरावांच्या काळांत देवस्थानचें ऐश्वर्य हे राजैश्वर्य झाले. सर्व राजोपचार श्रीस होत. देवस्थानच्या व्यवस्थेसाठी चाळीस नोकर असत. त्यांत कारभारी, विंचूरकरांचा पूजेचा ब्राह्मण, श्रीस चवरी व मोरचेल यांनी वारा घालणारे सेवक, कोठी कारकून, आचारी, पाणकी, शागीर्द, देवडीवाले, पहारेकरी, भालदार, चोपदार, नगारजी, सनईवाले, नौबतवाले, शिपाई, गुरव, जंगम आदींचा समावेश असे. देवालयाच्या पश्चिम दरवाज्यावरील नगारखान्यांत नगारे, झील, नौबती, झांज, सनया, कर्णा, तुतारी, तुरई, अशी देशी वाद्ये असत. ताशा, ढोल, वेग-ळेच. नित्य व्दिकाल व नैमित्तिकप्रसंगी पांच वेळा ही वाद्ये वाजविली जात. श्रीनृसिंहाच्या अलंकारांची संख्या शंभराहून अधिक होती. सणावारी व विशेषप्रसंगी श्रीची अलंकारपूजा बांधीत. यांतील प्रमुख अलंकार म्हणजे गोफ, कंठा, चंद्रहार, पुतळ्याच्या माळा, जवेच्या माळा, यज्ञोपवीत, पगडी, पदकें, मोत्यांचे पेंढे, कुंडले, मत्स्याकार, तुरा, चौकडा, अक्षद, सोन्याच्या व जडावाच्या डोळेमिश्या, पोचा, लसण्या, नीळ, बिंदी बिजवरा, सिंहकडी, तोडे, मोहरांच्या माळा, हरपररेवड्याच्या माळा असे अलंकार सोन्याचे, जडावाचे, मोत्यांचे व रत्नमाणिकांचे होते. श्रीलक्ष्मीचे अलंकार – मुकुट कमरपट्टादि सर्व सौभाग्यालंकार तिच्या नथ व मंगळसूत्रास शोभा देत. भारी किंमतीची रेशमाची, जरीची



श्रीनृसिंह
अलंकार पूजा



श्रीलक्ष



योगासनस्थममलं सदयावलोकम् ।
जानुद्वयाहितकरं नृहरिं नमामि ।

नीराभीमांबु-कल्लोले
विहरामि सुरेश्वर ।

श्रीशामराजमूर्ति







स्तंभनृसिंह




श्रीप्रल्हादमूर्ति

पितळीदरवाजा





देवालयाचे उत्तुंग
शिखर



शांताकारं
भुजगशयनं



नृसिंह मंदिर (नीरा भीमा संगमाचे पार्श्वभूमीवर)

मंदिर सुंदरोत्तमम्





मत्स्य



कूर्म

वराह



सभामंडपातील

नृसिंह



वामन



दशावतारमूर्ति



परशुराम



राम

कृष्ण



बौद्ध



कलंकी





चांदीच्या मुकुटावरील पादुका



मंगलं गरूडध्वज ।



गोरा दत्त

धन्यो गृहस्थाश्रमः

रघुनाथराव विंचूरकर




जानकीबाई विंचूरकर






विधास्ये अत्र संगमम्

नीरा नदी–लक्ष्मी घाट–नृसिंह–मंदिर






पुण्यश्लोक
रघुनाथराव विंचूरकर

वेदमूर्ति
शामराज वांकर





नृसिंहभक्त
अच्युतकाका वांकर

आणि किनखापाची वस्त्रे श्रीस कित्येक होती. देवालयांत नित्य अनुष्ठाने चालत. श्रीनृसिंहाची पांचवेळा पूजा होई. पहाटे काकडा आरती होई. प्रातःकाळी पंचामृतपूजा होताना श्रीपुढे शास्त्रोक्त गायन चाले. दुपारी माध्यान्हपूजा होऊन महानैवेद्य दाखविला जाई. संध्यासमयी सायंपूजा होई. लगेचच ऋक्, यजु या वेदांतील सूक्तांचे पाठ व सामगान होई. यांत इतिहासपुराणे यांचाही समावेश असे. रात्री शेजारती होई. शेजारती नंतर चंपूप्रार्थना असे श्रीच्या नित्यपूजेत ऋग्वेदीय नित्यपूजेबरोबर पुरूष, लक्ष्मी सूक्तांसह मन्युसूक्त, विष्णुसूक्त, घर्मासूक्त समुद्रसूक्त, पवमान सूक्त, सुमंगल सूक्त (कनिक्रद्‌जनुषं आणि बृहस्पते प्रथमं वाचो ही दोन्ही सूक्ते) बलित्थासूक्त यांचा समावेश असून शिवाय सामवेदांतील विदासूक्त व आद्य मश्वाचार्यकृत द्वादशस्त्तोत्र यांचाहि समावेश आहे. याशिवाय ऋक्, साम व अथर्ववेदांतील कित्येक ऋचा व पुराण मंत्र तसेंच काही मंत्र ब्राह्मणकांतूनहि घेतलेले आहेत. तिसऱ्या प्रहरी पुराणिक पुराण सांगत असे नित्योपचार असत. नैमित्तिक उपचार वेगळेच. प्रति एकादशीस श्रीस सायंस्नान घालून धवल वस्त्रे घालीत. प्रतिदिनी श्रीस पांच वेळा नैवेद्य–पहाटे काकडा आरतीचेवेळी खिचडी, प्रातःपूजेचेवेळी पायस, दुपारी व सायंकाळी धूपारतीचेवेळी पुरणपोळी, आणि रात्री शेजारतीचेवेळी दूध – असे. श्रीसाठी वापरावयाची सर्व उपकरणी – घागरी, तांबे, तबके, घंगाळी पराती, ताटे, वाट्या, लोट्या, आरत्या (आरत्यांत धूपारती, पंचारती, एकारती, पाट्या, हाती आरत्या घेतलेल्या लक्ष्मी गरूड, मारूती यांच्या मूर्ति, नाग, गडू यांचा समावेश) घंटा, श्रीमागची प्रभावळ, पुढील आडवी दांडी व त्यावरील समया, मस्तकांवर छाया धरणारा पांच फण्यांचा नाग व छत्र ही सर्व अस्सल चांदीची होती. चवरी व मोरचेल यांनी श्रीस वारा घालणारे सेवक व पेशवाई पोशाखाने सजलेले व “ अनंतकोटी ब्रह्मांड नायक प्रभोराजाधिराज नरहरे शामराज परमात्मा लक्ष्मीकांत नारायणा ” अशी गर्जना करणारे भालदार चोपदार स्वहस्तातील काठी व सोटा सावरून अदबीने उभे रहात. चांदीने मढविलेला शंख फुंकणारा जंगम चांदीचे शिंग (तुतारी) वाजविणारा गुरव ही ऐश्वर्याची मूर्ति

मंत साक्ष होती. हंड्या व झुंबरे यांतून स्रवणाऱ्या मंद प्रकाशात रात्री कथा कीर्तने होत. नैमित्तिक विशेष प्रसंगी श्रीच्या पादुकाची विंचूरकर वाड्यापासून जी मिरवणूक तसेंच श्रीची पालखी निघे तीत अग्रभागी वादक, त्यामागे बंदूक व तरवार पेलणारे गणवेषधारी शिपाई, शिंग व शंख वादक, गणवेषांतील भालदार चोपदार, त्यामागे विंचूरकरांचे क्षेत्रोपाध्याय, त्यांचा गणवेषधारी शागीर्द, श्रीच्या पादुकावर वा पालखीवर अबदागिरीने धरलेली छाया, जवळच चवरी व मोरचेल–धारी सेवक आणि त्या चांदीच्या मुकुटावरील श्रीपादुका असा हा थाट असे. श्रीची मिरवणूक पालखीतून निघे तेव्हां पालखीमागून स्थानिक ब्राह्मणांची मांदियाळी वेदमंत्रघोष करीत चाले.

विंचूरकरांचे श्रीक्षेत्री शुभागमन होई तेव्हा वरील सर्व व्यवस्था त्यांचे दिमतीस असे. ते श्रीदर्शन घेत असताना स्वारी वाजवित. (सर्व वाद्ये एकदम वाजवीत.)

एक काळ ऐसा होता

नरसिंहपूरचे सर्व अष्टाधिकार पूजाधिकारी, जोशी व धर्मा–धिकारी या त्रिकुलाकडेच होती. पाटीलकी, कुलकर्णी पण इतकेंच काय पण महारवतन देखील या ब्राह्मणांकडेच होते.

शेतीस सारा नव्हता. सर्व वृत्ति ग्रामस्थांकडेच होत्या. ग्राम–स्थांच्या स्थैर्यावर देवस्थानचे व क्षेत्राचे स्थैर्य अवलंबून असल्याने ग्राम-स्थांच्या स्थैर्याची काळजी तत्कालीन सर्व राजवटीनी घेतली होती. पाटीलकी, कुलकर्णीपण, जोशीपण आदि विविध वृत्त्या केवळ गांवच्याच नव्हेत तर आसपासच्या पंचक्रोशीतील देखील येथील ग्रामस्थांकडे होत्या. इंदापूर, टेभुर्णी, अकलूज, बावडे या भागांतील विविध हक्क व वृत्ति येथील त्रिकुलांकडे वंशपरंपरेने चालण्याची व्यवस्था राज्यकर्त्यांनी केलेली होती.

ऐश्वर्यसंपन्न नीरा-नरसिंहपूर

देवस्थानाबरोबरच गांवहि ऐश्वर्यसंपन्न होते. विंचूरकरांचा नांदता वाडा गांवाचे ऐश्वर्य वाढवीत होता. या वाडयामागील पुष्प-वाटिकातील गुलाब शेवंती आदि पुष्पांचा व तुळशी मंजिऱ्यांचा मंद सुगंध सायंकाळी वायुलहरीबरोबर येई. गांवातील सर्व शेतजमिनी व गांवठाण त्रिवर्गांच्या अविच्छिन्न मालकीचे होते. शेते पिकत होती. महाराष्ट्र, मराठवाडा, कर्नाटक व मध्यप्रदेश यांतून भक्तांचा ओघ नरसिंहपुरी वाहे. उत्सव समारोह, क्षेत्र समाराधना होत. ब्राह्मणांची किमान शंभर घरे होती. एकाचवेळी सहस्त्रभोजन घालणे शक्य होते. काळ सुबत्तेचा होता. कशाची ददात नव्हती. शास्त्री, पंडित, पुराणिक, पाठक, प्रवचनकार, कीर्तनकार, वैदिक, याज्ञिक या गांवात निर्माण होत. वैदिक ज्ञानसाधना करीत व करवीत. प्रतिदिनी दुपारचेवेळी ग्रंथावलोकन व ग्रंथलेखन चाले. वेदसूक्तांवर भाष्य लिहिणारे कृष्णाचार्य याच काळांतील. येथील विद्वान काशीतदेखील तळपत. शास्त्रचर्चा व काव्य-शास्त्र-विनोद करणाऱ्या शुचिर्भूत व सुखवस्तु व्यक्ति गांवात नांदत होत्या. अस्तमानाचे समयी दोन्ही नद्यांवर ब्रह्मवृंद संध्यावंदनार्थ जाई. श्रीच्या सायंपूजेचेवेळी स्त्रियामुले देवालयांत जात. श्री व सरस्वती यांचा नीराभीमेप्रमाणे संगम झालेला होता. गांवाची आर्थिक स्थिति तर इतकी भक्कम होती की दरमहा दरशेकडा एक सुपारी या नाममात्र व्याजाने पंढरपूरचे सावकार नरसिंहपुराहून रकमा नेत. गांवातील सर्वच वाडे चिरेबंदी बांधणीचे होते. सहस्त्रभोजनांच्या स्वयंपाकासाठी लागणारी तांब्या पितळेची भांडी कित्येक घरी होती. प्रत्येक वाडयाच्या माजघरांतील कपाटांतून सहस्त्रवधि संस्कृत ग्रंथ असत. ग्रामस्थांच्या नित्यपूजेतील देवांच्या मूर्ती सोन्याच्या व उपकरणी चांदीची होती. ग्रामस्थांची संख्या गुणवत्तेसह वाढत होती. परस्थ लोकहि येथे अध्यायनार्थ येत.

सराफांची व सोनारांची घरे वैभवाने नांदत होती. सराफांच्या अंगणात सोन्याच्या लगडी फुटत. कुशल सुवर्णाकार अचूक अलंकार

बनवित. शेतजमिनीवर मराठा समाजाची उपजीविका उत्तम चाले. कोळी लोकांच्या होडया व नावा नीरेवरून व भीमेवरून बदकाप्रमाणे डुलत डुलत ये–जा करीत. शंभर शंभर म्हशी पाळणाऱ्या व पोसणाऱ्या गवळ्यांची घरे गांवात होती. पाथरवट व गवंडी लोकांना बाराहि महिने काम मिळे. या बांधकामात त्यांच्या कित्येक पिढ्या गेल्या. छिन्नी-हातोडयाचे खणखणीत ध्वनि वातावरणांत घुमत. गावांत लक्ष्मीचे वास्तव्य असल्याची ती खूण होती. नृसिंहाच्या कृपाछत्राखाली गांव सुखासमाधानाने नांदत होता. महार, मांग, चांभार, जंगम, गुरव, मुसलमान आदि सर्व लोक सुखाने रहात होते. गावात मिरजेच्या पटवर्धनांचे अन्नछत्र असल्याने अतिथी अभ्यागतास दुपारची भ्रांत पडत नव्हती. निरामय जीवनाचा तो काळ होता. नृसिंहभक्ति हा गांवाचा केंद्रबिंदु होता.

राष्ट्रं धारयतां ध्रुवम्

ही सुबत्ता, हे ऐश्वर्य आणि हे स्थैर्य यांतून श्रीनृसिंहस्वरूपी लीन होणाऱ्या, तद्रूप होणाऱ्या व्यक्ती निर्माण झाल्या. रघुनाथराव व जानकीबाई विंचूरकर यांनी अर्वाचीन काळांत नृसिंहभक्तीचा जो उत्कर्ष दाखविला त्याचा प्रत्यय अन्यत्र येऊ लागला. नागेश डिंगरे व गोविंदात्मज प्रल्हाद या व्यक्ती अशाच. यांनी श्रीच्या शेजारतीची काव्यरचना केली. ती प्रतिदिनी म्हटली जाते. अगदी अर्वाचीन काळात होऊन गेलेले व वारकरी संप्रदायाशी समरस झालेले आत्मारामबुवा दंडवते यापैकीच. रंगशास्त्री मायभटे यांच्या वैदिक परंपरेचा वारसा सांगणारे वे. मू. शामराज वांकर असेच. अशा रीतीने व्यक्तीचे रूपांतर विभूतीत होऊं लागले. प्रामुख्याने अशा तीन स्थानिक व्यक्ति दाखवितां व वंदिता येतील. त्या अशा –

वै. कृष्णाचार्य दंडवते – हें नरसिंहपूर येथील पूजाधिकारी घराण्यातील. रघुनाथराव विंचूरकरांनी स्थापिलेल्या वेद व शास्त्र शाळेत यांनी रंगशास्त्री मायभटे यांचेकडे वेदशास्त्रांचा अभ्यास केला.

मुळातच प्रखर असलेल्या यांच्या नृसिंहभक्तीस वेदातदेखील नृसिंह दिसला. विद्वता तर अशी कीं, हातांतील वेताची छडी वाकवावी तसे शब्द व त्यांचे अर्थ याना यांची परिणत पज्ञा वाकवी. द्वेविरूपे सूक्ताचा यांनी लाविलेला नीरानृसिंहपर अर्थ पाहून आजचे विद्वानदेखील माना डोलावतात. हे उत्तरादि मठाचे अनुयायी असून वैष्णव संप्रदा-याचे निष्ठावंत अभिमानी व पराकाष्ठेचे आचारनिष्ठ होते. वयाच्या पंचविशीच्या आतच यांचे निधन झाले. 'संन्यास दिल्यास जगेन' असे त्यांनी सांगितले होते पण तसा योग नव्हता. द्वे विरुपेसूक्तभाष्य हे त्यांचे एकमेव ग्रंथापत्य.

मामा डोळे – हे नरसिंहपूर येथील धर्माधिकारी घराण्यांतील. यांनी आपले अवघे जीवनच श्रीनृसिंहास व त्याच्या भक्तीस वाहिले. त्रिकाल स्नान व संध्या, श्रीनृसिंहकवच व सहस्त्रनाम यांचे पाठ जागृतावस्थेत सततच चालू असत. असे अनुष्ठान तीन तपे केले. एक नेसूचे धोतर व उपरणे याशिवाय अन्य वस्त्रे वापरली नाहीत. श्मश्रू करणे व पादत्राणे घालणे हे तर वर्ज्यच होते. ग्रामसीमा न ओलांडणे व परान्न भक्षण न करणे ही पथ्ये होती. रात्रीअपरात्री मनी इच्छा होताच ते संगमावर वा नृसिंहतीर्थावर संचार करीत. ते भयमुक्त होते. नृसिंह-कवचस्तोत्राचे कवच त्यांना लाभल्याने सर्पविंचवादिक त्यांच्या मार्गी जात येत नसत. सर्व व्यक्तिगत इच्छा आकांक्षांचा त्याग केलेला हा तेजःपुंज ब्राह्मण नृसिंहभक्तीचा एक उत्कर्ष व गांवाचे भूषण होते. म्हणतात कीं, त्यांनी ही तपश्चर्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनेच्या अभ्युदयार्थ केली. सतत तपाचरण करीत राहिलेले हे पवित्र तुळशीपत्र श्रीनृसिंह-चरणीं वाहिले गेले.

अच्युतकाका वांकर – हे नरसिंहपूर येथील जोशी घराण्यांतील. यांचे मूळ आडनांव मायभटे. यांनी प्रपंच सुखेनैव केला पण त्यांत गुरफटले नाहीत. कमलपत्राप्रमाणे अलिप्त राहिले. शास्त्रमार्ग आजन्म पाळिला. मंत्रातील अर्थ ध्यानांत घेण्यावर यांचा विशेष कटाक्ष असे. नित्य स्नान, संध्यावंदन, जपजाप्य, ब्रह्मयज्ञ, पूजा नैवेद्य वैश्वदेव हे

कटाक्षाने करीत. श्रीचे तीर्थ घेतल्याशिवाय कधी अन्नग्रहण केले नाही. पात्रांत अन्न कधी टाकले नाही. प्रत्येक एकादशी ही निर्जला व द्वादशी ही साधन केली. अंगुलीतील मुद्रिकेत शालिग्राम धारण करणारे अच्युत-काका श्रीनृसिंहाच्या निदिध्यासाने, त्याच्या नामरूपगुणांच्या चिंतनाने नृसिंहरूप होऊं लागले. दुसरा विषय सुचेना; रुचेना. देह विदेहावस्थेत जाऊं लागला. नृसिंहभक्ति पराकोटीस पोहोचली. या भक्तीला अशक्य असे काय आहे ?

त्यांनी एक चमत्कार दाखविला.
अनेकांनी तो नेत्राने पाहिलेला आहे.

आयुष्याच्या शेवटी शेवटी त्यांच्याजवळ वाळूचे दाळीच्या आकाराचे तीन कण होते ते त्यांना कोठून मिळाले होते कोण जाणे ! त्यांची ते पूजा करीत. त्यांना नृसिंह, लक्ष्मी आणि प्रल्हाद म्हणून संबोधीत. पूजा होताच त्यांनी संध्यापात्रात पाणी भरून घ्यावे व त्यात ते तीन वालुकाकण सोडावे. आश्चर्य असे की, ते पाण्यावर तरंगत. बुडत नसत. " चला आतां भेटा " असे म्हणताच हे तीनहि खडे परस्परांना बिलगत. ही घटना अनेकांनी पाहिली आहे.

रामनामाने पाषाण तरल्याचे आम्ही ऐकतो व वाचतो. नृसिंह-नामाने पाषाण नुसते तरलेच नव्हे तर चाललेसुद्धां हे आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे.

ज्यांनी तुकारामांना पाहिले ते म्हणतात,

धन्य आम्ही । आम्ही तुका पाहिला.

अच्युतकाकांच्या संदर्भातहि आम्हांस तेच म्हणावेसे वाटते.

नंतर नंतर तर त्यांची नृसिंहभक्ति अशी अमर्याद वाढली की, नृसिंहाचा नामोच्चार करतांच त्यांना गहिंवर येई. नेत्रातून अश्रू वाहूं लागत. देवालयांत श्रीच्या दर्शनास गेल्यावर तोंडातून शब्द फुटत नसत. देहभान हरपल्याने पूजाविधि तसाच राहून जाई. गालावरून घळघळा

अश्रु ओघळत. काही कारणाने भानावर येताच त्याच तल्लीनावस्थेत विमनस्क स्थितीत घराकडे परतत. प्रत्येक पुरुष हा नृसिंह, स्त्री ही लक्ष्मी व मूल हे प्रल्हाद अशी त्यांची अखेरीअखेरीस दृढ भावना झाली.

' यतो नृसिंहः ततो नृसिंहः ' अशी स्थित प्रज्ञा

झाली. ते स्वतःला भक्तांचे दास म्हणवू लागले.

असा हा दास दासनवमी दिवशीच श्रीरूपी एकवटला. कणखर बांध्याची, पिळदार शरीराची ती ठेंगणी ठुसकी शालिग्राममूर्ति कायमची दृष्टिआड झाली.

प्रस्तुत लेखकाची व अच्युतकाकांची नेहमीप्रमाणे एकदां भेट झाली. दुसरा विषय निघणे शक्यच नव्हते अच्युतकाका म्हणाले,

' लेका ! कोणते मागणे मागशील नृसिंह भेटला तर— ?

' तसा फारसा संभव नाही काका. नृसिंह मला कशाला भेटतो ?

' भेटेल. मात्र मागणे एवढेच माग. कोणते ? तुम्ही पूजाधिकारी. दररोज रात्री शेजारतीनंतरच्या चंपू प्रार्थनेनंतर काय काय म्हणतां ?"

' हेच, विना दैन्येन .. ... '

' तेच ते ' माझ्या पाठीवरून हात फिरवित काका वदले.

विनादैन्येन जीवनं अनायासेन मरणं
देहि मे कृपया देव त्वया भक्तिचंचला

मी मनीं चमकलो.

" विना दैन्येन जीवनं "

मृत्युंजय सावरकरांनी तरी यापेक्षां वेगळे असे काय सांगितले होते ?

ज्या राष्ट्राला मानाने जगावयाचे असेल त्याने नृसिंह देवताच राष्ट्रमंदिरात पूजिली पाहिजे.

व्यक्तिगत जीवन कौटुंबिक जीवन वा राष्ट्र जीवन यांत कोठलेहि दैन्य नसावे.

यासाठी उपाय एक आणि एकच.

देहिमे कृपया देव त्वया भक्तिर्चंचला

आणि याची परिणति होते ती

" राष्ट्रं धारयतां ध्रुवम् " यांत

[२]

जीर्णोद्धारेण सर्वेष्टं प्राप्य भोगान् प्रातष्ठया

भरिताश्च रिक्तः

कालचक्र फिरत होते. उमापति पंडिताच्या काळांत क्षेत्राची जी निर्जनावस्था होती ती पुनः येण्यास आतां प्रारंभ होणार होता. इ. स. १८७६ साली एक दुष्काळ पडला आणि या सुखवस्तु क्षेत्राच्या वैभ– वास नकळतपणें पहिला तडाखा बसला. पोटें भरण्यासाठीं लोकांनी गांव सोडून अन्यत्र स्थलांतर केले. यावेळी रघुनाथराव विंचूरकरांनी सुमारे आठ महिने गोरगरिबांना भाकरीकालवण देऊन जगविले. या कार्यार्थ इंदूरच्या राजे तुकोजीराव होळकरांनी पांचशे रुपयांची मदत केली होती.

या धक्क्यातून गांव सावरते ना सावरते तोंच इ. स. १८९६ साली नीरा व भीमा या दोन्ही नद्यांना महापूर आले. हे संकट जेवढे अनपेक्षित तेवढेच भीषण होते. या महापुराचा अर्थ क्षेत्रैश्वर्याचा नाय-नाट असा झाला. या धक्क्यातून सावरण्यास पुरे आयुष्यहि अपुरे पडावे अशी याची तीव्रता होती पण या संकटाने लोकांची हिंमतच खचविली. यांच्या आगेमागे पुन: दुष्काळ आला. पहिला ओला तर हा कोरडा दुष्काळ. अस्मानी संकटांची ही परंपरा होती.

दुष्काळासंगेच पेंढारहि सुटले. पेंढार म्हणजे दुष्काळपीडित असा पोटार्थी जमाव. अन्नासाठी दाही दिशा फिरणारे हे लोक एखाद्या घरांत स्वयंपाक होतो आहे हें त्या घरांतून निघणाऱ्या धुरावरून ओळखीत. थेट स्वयंपाकघरात घुसून अन्न दिवसाढवळ्या लुटून नेत. पाकनिष्प-तीची चोरी झाली. अन्न रात्री शिजवून ते कुलूपात ठेवण्याची पाळी आली.

वरील प्रखर प्रकारांची भयानकता कमी पडली म्हणूनच की काय पाठोपाठ प्लेग आला. हे नवीन परदेशी संकट होते. पाठोपाठ महामारीहि आली. या वणव्यात कांहीं वाड्यांची दारे लागली ती कायमचीच.

या सर्वांचा परिणाम असा झाला की, अनेक कुंटुंबे गांव सोडून गेली. अशांची संख्या उत्तरोत्तर वाढूं लागली. एकवार गांव सोडून गेलेले लोक पुन: इकडे आले नाहीत.

हा दुष्काळ आणखी एक परिणाम मागे ठेवून गेला. तो म्हणजे नित्याचे अवर्षण. प्रतिवर्षी पाऊस पुरेसा पडेना. पडेल तो वेळेवर पडेना. हे एक नित्याचे संकट होऊन बसले.

या सर्वांचा परिणाम गांवावर झाला तसाच तो देवस्थानावरहि झाला. गांवातून माणसेच कमी होऊ लागल्याने गांव ओस पडण्यास प्रारंभ झाला. देवस्थानाला उतरती कळा लागण्याचा हा प्रारंभ होता

ही संकटपरंपरा केवळ नरसिंहपुरावरच आली असे नव्हे हे सर्व-व्यापी संकट होते. तथापि इतर गांवे लवकर उशीरा सांवरली. हे सांवरणे नरसिंहपूरला जमेनासे झाले.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात पुनः एकदा प्लेग, महामारी व इन्फ्ल्युएंझा असा त्रिदोष झाला. फटक्यांवर फटके बसत होते.

गांवातील कर्ती माणसे – पाथरवट, गवंडी, सोनार, सराफ विद्वान, व्यासंगी, गवळी, कोळी – गांव सोडून गेले ते कायमचेच.

आपल्या म्हातारपणी ही माणसे कांपऱ्या आवाजांत आपल्या नातवंडांना सांगू लागली, " आपला गांव नरसिंहपूर. तेथील देव फार मोठा. फार मोठा. " आणि अश्रूंनी डबडबलेल्या त्यांच्या उदास नेत्रा–पुढे गतैश्वर्य उभे राही.

ज्यांना इतरत्र जातांच आले नाही अशी मंडळी अपेष्टा भोगण्यास इथे राहिली.

इ. स. १९२२ साली नीरा नदीस महापूर आला आणि लक्ष्मी घाट भंगला. भंगणे या क्रियेला येथून प्रारंभ झाला.

सुलतानीपुढे क्वचित् उपाय चालेल. अस्मानीपुढे कोणी तरी काय करणार ?

या अस्मानीस साथ करण्यासाठी चोऱ्या दरोडयासारखी सुल–तानीहि होतीच.

देवालयाची व गावाची रचना मागेच थांबली होती. नवीन बांधकामे झाली नाहीत. इतकेच काय पण आहेत ती दुरुस्त करण्याचा विचारहि कोणी करीना. मग कार्य दूरच.

दुसऱ्या महायुद्धाने जी चढतीवाढती महागाई आणली तिने गांवाच्या आर्थिक स्थितीची पार कंबरच मोडली.

स्वराज्य आले. कांही चांगल्याची आशा वाटली.
घडले ते मात्र नेमके उलटेच.

गांधीवधानंतर गांवाचा विध्वंस करण्यांत आला. लुटालूट करण्यांत आली. कित्येक ब्राह्मणांना बडविले. कांहीना भीमेत बुडविले. पेशवे थाटाच्या चौसोपी वाडयांना आगी लावल्या. रंधागोली व कडेपाट सागवानी इमले तदंगभूत वस्तूंसह 'अग्नये स्वाहा' झाले. अग्नीच्या धूम्रज्वालाबरोबरच अधुनमधून सुगंध येई तो आंतील जळणाऱ्या चंदनी वस्तूंचा होता.

पहिल्या जलप्रलयानंतरचा हा अग्निप्रलय होता. गांवाचा चेहरामोहराच पार बदलून गेला.

आणि या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर नीराभीमासंगमी अहिंसेच्या त्या महान् पुरस्कर्त्याची रक्षा विसर्जन करण्यात आली. खिन्नपणे हंसत हंसत ती आपल्यात सामावून घेऊन नीराभीमा पुढे निघाल्या.

या विध्वंसनातहि एक चमत्कार दिसून आला. या विध्वंसकांनी देवालयास मात्र किंचितहि इजा केली नाही.

एव्हाना गांव बराच ओस पडला होता. देवालय निवांत होते.

इ. स. १९५२ साली पुनः दुष्काळ पडला. गुरांढोरांसह लोकांनी गांव सोडला. झाडावर पान दिसेना की, कोठून पक्ष्यांचा रव ऐकू येईना. दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी शासनाबरोबरच रा. स्व. संघहि धावला.

संकटपरंपरांनी लोक निढावले होते. भवितव्याविषयी पूर्ण निराश झाले होते. यांतून कधी काळी कांहीं चांगले होईल अशी आशासुद्धां त्यांना वाटेना.

अशातच सरकारने वतने नष्ट केली. इनाम खालसा केले. गांवाची अस्मिताच नष्ट झाली.

इ. स. १९५६ साली पुनः एकदा महापूर आला. प्रचंड महापूर. सारा गांव पाण्याखाली बुडाला. वृक्षांचे शेंडे मात्र या महापुराच्या उसळत्या लाटांतून वर हलतांना दिसत. महापुराने कित्येक घरें बसली ती कायमचीच. सारा प्रपंच वाहून गेला, या महापुराने उरलेसुरले संस्कृत हस्तलिखित ग्रंथ 'समुद्रास्तृप्यन्तु' केले. गांवावर पार अवकळा आली. नांदत्या गल्लचांची खिंडारे झाली. कधी काळी येथे ऐश्वर्य नांदत होते हे सांगूनहि खरे वाटेनासे झाले. 'सा रम्या नगरी' या सुभाषितात भर्तृहरीने वर्णिल्याप्रमाणे गांवाची स्थिती झाली.

या महापुराने आणखी एक नवीनच संकट बरोबर आणले. गाजरी गवत. हे अमेरिकीय संकट गवताच्यारूपे गांवावर उगवले. या गवताने सर्व गांव व्यापले. याने गांवाला अरण्याची कळा आणली. या गवतात भगवंतांची विभूति असावी इतके हे सर्वव्यापी आहे.

इ. स. १९५७ साली कूळ कायदा आला. जिव्हाळयाने वागणारे ग्रामस्थ कोर्टाची भाषा बोलूं लागले.

इ. स. १९५८ साली पुनः महापूर आला, पण त्याला विध्वंस करण्यासारखे आतां गांवात काय राहिले होते ?

कालचक्राची गति सर्वांनी जाणली. क्षेत्र पूर्वस्थितीला आले. निर्जन अरण्यांतील देवस्थान भक्तांनी पुनः पाहिले. 'भरिताश्च रिक्ताः' हे कार्य पूर्ण झाले होते.

रिक्ता भवन्ति भरिता

या दुस्थितीवर प्रतिक्रियात्मक विचार सुरु झाला. अनेक नृसिंह-भक्त विचार करूं लागले. आपापल्या परीने उपाय शोधूं व योजूं लागले यासाठी त्यांना स्वतःचे घर – एक मध्यवर्ति संस्था – हवी होती. ती निर्माण झाली. तिचे नांव श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान नीरा–नरसिंहपूर विकास व उत्कर्ष मंडळ. ही संस्था महाराष्ट्र शासनाकडे रीतसर नोंदविलेली असून तिचा निबंधन क्रमांक इ. ४५०– पुणे असा आहे.

मंडळास देवस्थान व क्षेत्र पुनः ऐश्वर्याप्रत न्यावयाचे आहे. कार्य जगड्व्याळ आहे. या कार्याच्या फलप्राप्तीसाठी किमान दोन तपे अविरत श्रमणे आवश्यक आहे. हे श्रम सर्वांगीण हवेत.

मंडळास कार्य करावयाचे आहे ते क्षेत्राच्या वरील सर्वांगीण ऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर.

यासाठी मंडळास प्रमुख गरज आहे ती ही की,

भक्त प्रल्हादाची जातकुळी सांगणाऱ्या, घरचे भाकरी खाऊन व स्वतःच्या खिशातील पैसा खर्च करून राबणाऱ्या कार्यकर्त्यांची

श्रीनृसिंह हा ज्यांचा कुलस्वामी आहे असे भक्त अष्ट दिशांना विखुरलेले आहेत. या प्रत्येकाला श्रीने कांहीना कांही दिलेले आहे या ' ईश्वरीय देण्याच्या ' साधनांनी त्यांनी श्रीक्षेत्राची सेवा करण्यास सिद्ध व्हावे. धनवंतांनी धन द्यावे बुद्धिमंतांनी बुद्धी द्यावी, श्रमवंतांनी श्रम द्यावेत.

लंकेवर जाण्यासाठी प्रभु रामचंद्र सेतु बांधीत असताना एक खारदेखील खपली. समुद्रकांठच्या वाळूत लोळून येऊन आपले शरीर ती सेतुवर येऊन झाडी. वाळूचे काही कण सेतुवर पडत. अशातूनच सेतु तयार झाला. प्रभु रामचंद्रानी प्रेमादराने या खारीला हातावर घेऊन कुरवाळले. प्रभूची बोटे तिच्या पाठीवर उमटली आहेत.

अशा भक्तानाहि श्रीनृसिंह उद्या कुरवाळील.

देवालयाचे संरक्षण, देवस्थानाच्या परंपराचे संरक्षण व क्षेत्राचा सर्वांगीण उत्कर्ष ही ध्येये मंडळाने नजरेसमोर ठेविली आहेत. क्षेत्रातील सर्वच चांगल्या परंपरांचा मंडळास जीर्णोद्धार करावयाचा आहे.

श्रीनृसिंहभक्तांची सेवा हा मंडळाचा एक प्रधान उद्देश आहे कारण भक्त हे देवाचे देव होत.

मंडळाचा पत्ता असा आहे. भक्तांनी संपर्क साधावा.

श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान नीरा-नरसिंहपूर

विकास व उत्कर्ष मंडळ

मधुरंजन, जंगली महाराज पथ, पुणें-४

(३)

प्रार्थितोऽथ प्रसन्नात्मा प्रणतानंदवारिधिः
देवेशः स्थीयतांप्रीत्या सर्वेषां हितसिद्धये

यात्राविधि

कुलधर्म कुलाचारानुसार नृसिंहभक्त श्रीक्षेत्री यात्रेसाठी येतात. यात्रेतील सर्वश्रेष्ठ विधि म्हणजे स्नान व श्रीनृसिंहाचे दर्शन हा होय. क्षेत्री येतांच प्रथम श्रीचे धूळदर्शन घ्यावे.

स्नान व दर्शनविधि – नीरा किंवा भीमा या नदीत स्नान करुन शुचिर्भूत देहमनाने श्रीचे दर्शन घ्यावे.

नीराभीमा संगम स्नानाचे महत्व होय. तसेच लक्ष्मीतीर्थावर शुक्रवारी, नृसिंहतीर्थावर शनिवारी, भानुतीर्थावर रविवारी, व रथ–सप्तमी दिवशी, नीराभीमा संगमी नृसिंहजयंती दिवशी अशी स्नाने करणे हे विशेष फलप्रद होय. दिनविशेषनुसार वेगवेगळचा तीर्थांची स्नाने महत्त्वपूर्ण आहेत.

यात्रा तीन प्रकारची असून (१) दैनिक (२) मासिक (३) वार्षिक असे हें तीन प्रकार आहेत. परस्थभक्तांनी किमानपक्षी वार्षिक यात्रा करावी. श्रीनृसिंह जयंती दिवशी श्रीक्षेत्री स्नानदर्शन केल्यास दैनिक यात्रेचे फल मिळते असे क्षेत्रमाहात्म्यात सांगितले आहे.

या क्षेत्री देश व काल सदा पवित्र असल्याने श्रीचे दर्शन हें सदा–सर्वदा संतोषकारक आहे. यद्यपि खालील विशेष दिनी श्रीचे दर्शन घेणे हे अधिक फलप्रद आहे. वर्षप्रतिपदा, रामनवमी, चैत्री एकादशी, अक्षय्यतृतीया, नृसिंहजयंति, दशहार पर्वकाळ, आषाढी एकादशी, गोकुळअष्टमी, विजयादशमी, नर्कचतुर्दशी, बलिप्रतिपदा, कार्तिकी एकादशी, दत्तजयंति, धनसंक्रांत, मकरसंक्रांत, माघी एकादशी, महा–शिवरात्र तसेंच सोमवती अमावास्या, गुरुपुष्यामृतयोग सोमश्रावण योग, प्रत्येक शनिबार, सर्व एकादशा आणि ग्रहणपर्वकाळ व अधिक मास.

सेवाकृत्यें, पुण्यकृत्यें, धर्मकृत्ये

ही कृत्ये भक्तांना क्षेत्रोपाध्यांच्या संपर्काने करतां येतात. श्रीक्षेत्री क्षेत्रोपाध्यायांची (१) पूजाधिकारी (२) जोशी (३) धर्माधिकारी अशी तीन मूळ घराणी असून श्रीच्या पूजेसंबंधाने अधिकार पुजाधि–काऱ्यांकडे, सर्व धार्मिक कृत्ये करण्याचे अधिकार जोशांकडे आणि क्षेत्र सीमेत होणारी सर्व धार्मिक कृत्ये योग्य तऱ्हेने होतात हे पहाण्याचे अधिकार धर्माधिकारी घराण्याकडे आहेत, दंडवते व डिंगरे हे पूजा–धिकारी; काकडे, जपे, मायभटे (तथा वांकर) सुरु हे जोशी; आणि अग्निहोत्री, अरगडे, आचार्य, इंगळे, कोरांटक, घोगरे, देवळे, डोळे,

भागवत हें धर्माधिकारी होत. क्षेत्रसीमेत धर्मकृत्ये करण्यांत भक्तांना वरील तीनहि घराण्यांचे साहाय्य होत असते.

पंचामृतपूजा – सर्वमान्य व आदर्श असा हा विधि आहे. या विधीत भक्त स्वहस्ते श्रीस पंचामृत स्नान घालतात. धूपदीपाने ओ–वाळून नैवेद्य समर्पण करतात. भक्तांच्याकडून पंचामृतपूजा चालू असतांना मंत्र म्हणण्याचे कार्य सालकरी जोशी करतात.

पवमान अभिषेक – प्रातःपूजेचेवेळी हा विधि होतो. पंचसूक्त पवमानाचे पांच अध्याय म्हणतात. ते चालू असतांना श्रीनृसिंहाच्या दोन्ही मूर्तीवर भक्त दुग्धाभिषेक शंखाने घालतात. या विधीस सोळा शेर दूध लागते. या विधीत पंचामृत पूजेचाहि अंतर्भाव असतोच.

पाद्यपूजा – श्रीच्या गाभाऱ्यांतील दांडीखालील पादुकांची मंत्रोपचारे पूजा करून श्रीस फळांचा नैवेद्य समर्पण करणे असे या विधीचें स्वरूप आहे.

वस्त्रसमर्पण – पंचामृत पूजेनंतर श्रीस नित्योपभोगासाठी वस्त्र वा अन्य भारी वस्त्रे समर्पावीत. भारी वस्त्रे श्रीस सणावारी घालण्या–साठी ठेविली जातात. अन्य वस्त्रे श्रीच्या उपभोगार्थ ठेवतात.

कर्पूरारती – धूपदीप ओवाळून श्रीस कोरान्नाचा नैवेद्य समर्पण करणे असा हा सुटसुटीत विधि आहे.

अलंकार पूजा – सायंपूजेचेवेळी भारी वस्त्रांनी श्रीची विशेष पूजा बांधून श्रीस उपलब्ध अलंकार घालतात. श्रीमूर्तीचे राजसरूप अलंकारपूजेत दिसते.

दीपोत्सव – सायंपूजेच्यासमयी देवालयाच्या तीनहि दगडी गाभाऱ्यांतून पणत्या व मेणबत्त्या लावून तसेंच सभामंडपांतील हंडया व झुंबरे यांतील दीप प्रज्वलित करून दीपोत्सव करता येतो अलंकार पूजेचेवेळी दीपोत्सव करावा. दीपोत्सवाने देवालयाचे मंद सौंदर्य तेजाळते.

पालखी मिरवणुक – भक्तांच्या इच्छेनुसार श्रीच्या पादुका पालखीत ठेवून ती देवालयांतून मिरवतां येते. श्रीमंदीरास पालखीची प्रदक्षिणा घालावयाची असा हा विधि आहे. अलंकारपूजा व दीपोत्सवानंतर पालखी मिरवणुक म्हणजे अयं विशेषः

वसंतपूजा – वसंतऋतूत व प्रामुख्याने वैशाखी नवरात्रात पूजा–साहित्याने प्रथम श्रीची पूजा करून नंतर ब्राह्मणांची पूजा करावी. कैऱ्यांचे पन्हे, खरबुजे, कलिंगडे व अत्तरमिश्रित चंदनाची उटी ही वसंतपूजेची अविभाज्य अंगे होत.

धनुर्मास – धनसंक्रांत लागल्यानंतर सूर्योदयापूर्वी श्रीचे दर्शन घेऊन श्रीस खिचडीचा नैवेद्य अर्पण करतात.

कुरवंडी – नर्कचतुर्दशी व बलिप्रतिपदा या दिवशी श्रीची कुरवंड्यांनी आरती होते. या कुरवंडा पुरणाच्या व साखरभाताच्या करतात. भक्तांनाहि स्वेच्छेनुसार पुजाधिकाऱ्यांच्या संपर्काने कुरवंडी करतां येते.

नैवेद्य – श्रीची पूजा करून नैवेद्य समर्पण करणे असा हा सोपा विधि आहे, नैवेद्यात पुरणपोळी असते. हयग्रीवाचा (नुसते गूळ घालून वाटलेले पुरण) नैवेद्य दाखविण्याचीहि दाक्षिणात्य प्रथा आहे. प्रसंगी साखरभाताचा वा साध्या भाताचाहि नैवेद्य दाखवितात.

पंचखाद्याचा रूचिसंपन्न नैवेद्यहि दाखवितात. हा कोरडा पण सुरुचिर नैवेद्य पांच खकारयुक्त खाद्यांनी बनवितात. ती म्हणजे खारीक, खोबरे, खसखस, खिसमिस, खडीसाखर ही होत. याशिवाय श्रीस नैवेद्य दाखवून साखर, गूळ, खडीसाखर, पेढे, बर्फी, नारळ आदि मेवे वाटतात. हा विधि सोपा पण अधिक लोकप्रिय. कारण त्यांत उपस्थित सर्व भक्तांना प्रसाद दिला जातो.

श्रीलक्ष्मीची आरती – कोणत्याही शुक्रवारी व प्रामुख्याने आश्विन महिन्यातील नवरात्रांत लक्ष्मीची आरती करतां येते. मातो–

श्रीस धूपदीपांनी ओवाळून वेलची, केशर, साखरमिश्रित दूध तसेंच फुटाणे व पेढे यांचा नैवेद्य दाखविण्याचा प्रघात आहे.

श्रीलक्ष्मीची ओटी भरणे – सुवासिनीने करावयाचा हा विधि असून सुवासिनी मातोश्रीची खणानारळाने व तांदूळ हळकुंडाने ओटी भरतात.

हळदी कुंकवाचा सडा – हा विधि सुवासिनी करतात. श्रीलक्ष्मीची ओटीभरल्यानंतर हळदीकुंकू मातोश्रीस वाहून सर्व देवालयांत हळदीकुंकूमिश्रित जलाचा सडा सुवासिनी स्वहस्ते शिंपते. सडयांवर रंगवल्ली काढतात.

जावळ काढणे – स्वपुत्राचे जावळ क्षेत्री काढणे हे भक्त भाग्याचे मानतात. कित्येकदा असा नवसहि केलेला असतो प्रल्हादासमोरील मंडपांत अर्भकाचे जावळ काढतात. नंतर त्यांस देवालयांतच स्नान घालून श्रीचे दर्शन करवितात. जावळ हा स्वपुत्रास नृसिंहभक्तीचा प्रथम पाठ देण्याचा ओनामा होय.

व्रतबंध – पुत्राचा व्रतबंध श्रीक्षेत्री करणे म्हणजे श्रीभक्तीचा संस्कार दृढतर करणे होय. पुष्कळदा मातापित्यांनी असे नवसहि केलेले असतात. गायत्री मंत्राचा उपदेश नृसिंहक्षेत्री मिळणे यात औचित्य आहे. हा विधि सभामंडपांत होतो.

विवाह – आपल्या पुत्राचे वा कन्येचे विवाह श्रीक्षेत्री करवून गृहस्थाश्रमाची दीक्षा श्रीच्या समक्ष व त्याच्या मंडपांत घेणे यांत गृह–स्थाश्रमीच्या पवित्र्याची कल्पना विचारवंताना येते ' नातिचरामि ' ची शपथ या स्थानी घेतल्याने ती जाणीव दृढ होते. विवाह देवद्वारी व्हावा अशी श्रद्धाहि कित्येकदां असते. लग्न मंडपात लागते. इतर विधि बाजूच्या प्रांगणात केले जातात.

वधुवर यात्रा– विवाह झाल्यानंतर स्वतःच्या नवपरिणित वधू-सह भक्त श्रीदर्शनास येतात. कुटुंबांतील इतर परिवार व घरचे देवहि

बरोबर आणून श्रीची पंचामृतपूजा करतात.

नारायणनागबलि– वंशवृद्धयर्थ व वंशस्वास्थ्यार्थ हा विधि करतात. हा विधि केवळ संगमक्षेत्रीच केला जातो. या विधीची अनेक अंगोपांगे असून कांही पिशाचमोचन तीर्थावर, कांही देवालयात व कांही संगमावर करतात.

क्षेत्रनिवास– एकटयाने वा सहपरिवार श्रीक्षेत्री वास्तव्य करावयाचे, मनःपूत चिंतन हे क्षेत्रनिवासाचे फळ होय. देवस्थानाची स्थिति; रीतिरिवाज समजतात. मनःशांति मिळते.

वारी धरणे– प्रति शनिवारी किंवा प्रति मासी याप्रमाणे परस्थ भक्त वारी धरून श्रीच्या दर्शनास येतात. या वाऱ्या पांच किंवा अकरा असतात व त्या विनाखंड पार पाडाव्या लागतात. आद्य नृसिंहासहि पांच वाऱ्या करण्याचा प्रघात आहे.

श्रीची वैशेषिक सेवा

वरील कृत्यांखेरीज श्रीची वैशेषिक सेवा करण्याचाही प्रघात आहे यांतील कांहीं सेवा देह कष्टविण्याच्या, झिजविण्याच्या स्वरूपाच्या असून कांही आर्थिक बळावर करता येतात. या सेवांचे स्वरूप असे–

अनुष्ठान– विशिष्ट कालपर्यंत श्रीक्षेत्री वास करून श्रीच्या विविध मंत्रापैकी वा स्तुतिस्तोत्रापैकी एकाची वा अनेकांची पारायणें करावयाची हें अनुष्ठानाचे स्वरुप होय, देहास कष्ट देण्याची व ते सहन करण्याची शक्ति व मनाची तयारी मात्र हवी. हे अनुष्ठान म्हणजे एक प्रकारचे तपच होय. श्रीनृसिंह कवच, सहस्रनाम आदींचे अनुष्ठान करतात.

सेवा घालणे– सातत्याने शंभर दिवस चालणारी ही सेवा आहे. सेवा म्हणजे श्रीस एक लक्ष प्रदक्षिणा घालणे होय. प्रातःकाळी स्नान

संध्यावंदन, देवपूजा करून नंतर देवळांत जाऊन श्रीनृसिंहाची पूजा करून सोवळ्याने परिवार देवतांसह श्रीस प्रतिदिनी एकशे आठ प्रदक्षिणा हातात जपमाळ धारण करून घालावयाच्या. प्रत्येक प्रदक्षिणा होतांच श्रीस साष्टांग नमस्कार घालावयाचा असे याचे स्वरूप आहे. अशा एकशे आठ प्रदक्षिणा झाल्यानंतर एक हजार प्रदक्षिणा झाल्या असे मानावयाचा संकेत आहे. या प्रदक्षिणा घालण्यास रोज तीन ते चार तास लागतात. प्रदक्षिणा घालत असतांना श्रीनृसिंहकवचाचे पाठ करावयाचे व प्रदक्षिणा घालून झाल्यावर प्रतिदिनी श्रीनृसिंहसहस्रनामाचा पाठ करावयाचा अशी रीति आहे. ही सेवा संपेपर्यंत व्रतस्थ रहावयाचे. परान्न भक्षण करावयाचे नाहीं, ग्रामसीमा ओलांडावयाची नाही, श्मश्रू मृदुशय्या, पादत्राणे घालणे ही वर्ज्य, सात्विक आहार घ्यावयाचा असा हा एकूण देहदंडाचा कडक विधि आहे.

प्रस्तुत लेखकाने शके १८८५ साली अशी सेवा सपत्निक घातली आहे.

अनुष्ठान व सेवा अशा दुहेरी रूपे एक तपभर कष्टणारे प्रल्हाद देशपांडे, जवळेकर अगदी अर्वाचीन काळांत होऊन गेले.

दंडवत घालण्याचाहि एक सेवाप्रकार आहे.

अर्थबळावर करतां येणाऱ्या सेवा.

समाराधना – श्रीची विशेष प्रकारची सेवा झाल्यानंतर, विशेष पूजेनंतर क्षेत्र समाराधना घालतात. क्षेत्रांतील सर्वच व्यक्तीना भोजनार्थ आमंत्रिले जाते.

यज्ञयाग – यज्ञ करणे हें आपल्या धर्मात बहुत फलप्रद मानले जाते. क्षेत्राच्या ठिकाणी यज्ञयाग करणे हे तर विशेष पुण्यदायक. श्रीक्षेत्री देवालयात विष्णुयाग, नृसिंहयाग आदि यज्ञ करतात. त्या त्या देवतांच्या विशिष्ट मंत्रांची प्रथम ब्राह्मणांकरवी अनुष्ठाने करवून नंतर त्यांचे हवन, पूर्णाहुति व अवभृथस्नान असा हा मोठा थाटाचा विधि आहे.

अलंकार समर्पण – यज्ञयागानिमित्त व एरव्हीहि श्रीस विविध सोन्याचे व जडावांचे, मोत्यांचे अलंकार उपभोगार्थ सर्मापिले जातात. श्रीस आलेले व असलेले अलंकार भक्तांकडून समर्पिले गेलेले आहेत. अजूनहि सर्मापिले जातात.

जीर्णोद्धार – देवालयाचा, इतर वास्तूंचा व श्रीस उपभोग्य अशा वस्तूंचा जीर्णोद्धार करविणे हे यश व कीर्ति वाढविणारे ठरते. देवाल–याची व क्षेत्राची रचना अशा जीर्णोद्धारांतूनच झालेली आहे.

दान – दान हे सदासर्वदा पवित्रच. तथापि क्षेत्रस्थानी दान हे विशेष महत्वाचे होय. अन्न, वस्त्र, धन, भूमि, विद्या हे दान प्रकार पूर्वी प्रचलित असत. अजूनहि आहेत. क्षेत्राच्या आजच्या पडत्या काळांत क्षेत्रोत्थापनार्थ अनेक प्रकारे अभिनव दाने करतां येतील. श्रीक्षेत्री पुष्प-वाटिका लाविणे व त्या जोपासणे, वृक्षारोपण करणे, औषधालय चालविणे, लहानसहान गृहोद्योग स्थापून ते चालविणे अशाप्रकारेहि श्रीक्षेत्राची अभिनवप्रकारे सेवा करतां येईल. विशेषतः मातीकामाचे उद्योग (Ceramic Industries) सुरु करण्यास येथे फारच मोठा वाव आहे.

संवत्सरांत होणारे उत्सव

चैत्र – शिंगणापूर येथे श्रीमहादेवाच्या दर्शनार्थ जाणारे यात्रेकरू येथे श्रीदर्शनार्थ येतात. ही संख्या बरीच मोठी असते. गुढीपाडवा व चैत्री एकादशी हे दिवस जास्त महत्वाचे.

वैशाख – वैशाखी नवरात्र महोत्सव, हा येथील सर्वात मोठा उत्सव, वैशाख शु।। ७ स श्रीचे नवरात्र बसते नऊ दिवस प्रतिदिनी कीर्तन होते. श्रीची अलंकार पूजा बांधिली जाते. वैशाख शु।। ११ स चंदनउटीची पूजा बांधतात. नृसिंह जयंती दिवशी सायंकाळी जन्म–काळाचे कीर्तन होते. वैशाखी पौर्णिमेस श्रीची पालखीतून मिरवणुक निघते. दीपोत्सव होतो. पालखीत श्रीच्या पादुका ठेवण्याचा प्रघात

आहे. दुसरे दिवशीं दहीहंडीकाला व लळित होऊन उत्सवाची समाप्ति होते.

वैशाखी उत्सवच्यानिमित्ताने अनेक परस्थ भक्त श्रीक्षेत्री येतात. कित्येक येथेच नवरात्र बसवितात. नृसिंहभक्तांचा हा प्रीती–मेळावाच असतो. श्रीस पंचामृत पूजांची तसेच वसंत पूजांची गर्दी होते. गांवांत विविध खेळांच्या स्पर्धा, कुस्त्या होतात. वैशाख वद्य पक्षांत पूजाधिकारी श्रीची प्रक्षाळपूजा करतात.

जेष्ठ – दशहार पर्वकाळात अनेक भक्त श्रीदर्शनास येतात.

आषाढ – आषाढी एकादशीस पंचक्रोशीतील लोक मुद्दाम श्रीदर्शनास येतात.

श्रावण – नागपंचमीच्या दिवशी सामुदायिक श्रावणी होते. श्रियाळषष्ठी दिवशी पूजाधिकारी श्रियाळाची प्रतिमा देवालयांत स्थापून तिचे पूजन करतात. नंतर तिचे विसर्जन होते. गोकुळ अष्टमी–निमित्ते नामसप्ताह होतो.

भाद्रपद – गणेशचतुर्थीचा उत्सव पूर्वी मोठचा वैभवाने होई. महालक्ष्मीपूजनादिवशी श्रीलक्ष्मीचे दर्शन घेणे हे पुण्यप्रद मानतात.

आश्विन – श्रीलक्ष्मीचे नवरात्र बसते. दररोज रात्री मातोश्रीची आरती होते. विजयादशमी दिवशी पूर्वाण्ही देवालयांतील सर्व देवांची पूजा होऊन तसेंच सर्व हत्यारांची पूजा होऊन त्यांनाहि नैवेद्य दाखविला जातो. देवालयांत प्रतिवर्षी एक भला मोठा धर्मध्वज लावला जातो. सायंकाळी सीमोल्लंघनासाठी श्रीची पालखी निघते व ती गांवाच्या पश्चिमेस स्वामीसमाधीजवळ जाऊन तेथे सोने लुटण्याचा कार्यक्रम होतो. हे सोने श्रीस वाहून दर्शन घेण्याचा प्रघात आहे. आश्विनी पोर्णिमे-पासून कार्तिक स्नान सुरु होते. सूर्योदयापूर्वी स्नान करून श्रीचे दर्शन घेतात. नर्कचतुर्दशी दिवशी पूजाधिकारी सर्व दंडवते यांचेकडे कुरवंडया होतात. त्या श्रीस ओवाळतात. हा विधि दुपारीच होतो यावेळी श्रीची

अलंकार पूजा बांधलेली असते. श्रीची पालखी निघून ती संगमावर जाते. जनसमुदाय बहुत जमतो.

कार्तिक – बलिप्रतिपदेदिवशी पूजाधिकारी सर्व डिंगरे यांच्या कुरवंडया होतात. श्रीची अलंकार पूजा बांधली जाते. श्रीची पालखी निघून ती संगमावर जाते. हा पाडवा धन्य दिवस असल्याने भक्तगण खूप जमतो. तुलसी विवाहादिवशी श्रीची अलंकार पूजा बांधतात. पितळेच्या वृंदावनांतील तुलसी श्रीचे डावे बाजू सिंहासनावर ठेवून मंगलाष्टकपूर्वक श्रीचा तुलसीशी विवाह लावला जातो वैकुंठ चतुर्दशीस गरूडाची गांवातून मिरवणुक निघते. त्रिपुरी पौर्णिमेस कार्तिक स्नाना-समाप्ति होते.

मार्गशीर्ष – श्रीदत्तजयंतीचा उत्सव होतो. शके १७८७ साली रघुनाथराव विंचूरकरांनी देवालयाचा जीर्णोद्धार करवून त्यांचा उत्सर्ग केला होता. त्या उत्सर्गाचा वर्धापन दिन प्रतिवर्षी मार्गशीर्ष व॥ ९ व १० स होतो.

पौष – भोगी दिवशी श्रीची पालखी निघते. ती लक्ष्मी घाटावर श्री लक्ष्मी मंदीराकडे जाऊन नंतर गांवातून मिरवते. संक्रमण पर्वकाळां निमित्ते बहुत भक्त येतात. यांत सुवासिनीचा भरणा जास्त असतो श्रीलक्ष्मीस वाणवसा करणे हे सौभाग्यवती भाग्याचे मानतात.

माघ – माघी एकादशी व महाशिवरात्र या दोन दिवशी आजू-बाजूचे भक्त दर्शनार्थ येतात,

फाल्गुन – रंगपंचमी दिवशी श्रीस धवल रंगाचा पोशाख घालून श्रीचे अंगावर फुलाने केशरी रंग शिंपतात. रात्री देवालयात ग्रामस्थ परस्परांवर प्रेमादरे रंग उडवून रंगपंचमी साजरी करतात.

भक्तानां अभयं ददाति सततं

पंढरपुराविषयी बोलताना ह. भ. प. सोनुमामा दांडेकर एकदां म्हणाले होते की –

पंढरीत पांडुरंग, पुंडलिक व चंद्रभागा या तीनच गोष्टी सत्य आहेत. बाकी सर्व मिथ्या.

नरसिंहपुराविषयीहि असेच म्हणता येईल.

श्रीक्षेत्री श्रीनृसिंह, प्रल्हाद व नीराभीमा संगम ही तीनच चिरंजीव सत्ये आहेत.

ही आहेत म्हणून तेथे भक्त जात राहिले, जातात व जातीलहि

नरसिंहपूर पूर्वी ऐश्वर्यसंपन्न होते. तेथे सर्व सुखसोयी होत्या. आज त्या तशा नाहीत.

देव सुखसाधने देऊन पहातो व सुखसाधने नेऊनहि पहातो भक्तांची ही परीक्षाच म्हणावयाची.

या परीक्षेत उतरल्यावर सुखसाधनांची उर्ता मनी रहात नाही.

मनात स्थिरते केवळ एक नृसिंहरूप.
भक्त आहेत तोवर व म्हणून तो आहे.

आदि, मध्य व अंत या तीनहि स्थानी तो आहे.

तस्मात् –

वंदे नृसिंहं विभुम्

श्रीस होणारे नित्यनैमित्तिक विधि आणि उपचार

श्रीनृसिंहमूर्तीस व अन्य देवतांस नित्यपूजादि उपचार स्थानिक पूजाधिकाऱ्यांकडून त्यांच्या पारवोडचानुसार होतात. नैवेद्य, नंदादीप, नित्यपूजासाहित्य, वार्षिक उत्सव, दिवाबत्ती, यांची साधन व्यवस्था विश्वस्तमंडळाकडून होते. विंचूरकर घराण्याचे मूळपुरूष विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांनी देवस्थानच्या योगक्षेमासाठी जो महसूल लावून दिला त्याचा आता सार्वजनिक न्यास होऊन ती रक्कम सध्या महाराष्ट्र शासनाकडून विश्वस्त मंडळास मिळते. ही रक्कम प्रतिवार्षिक ५६५५रुपये इतकी आहे.

दैनंदिन उपचार असे –

काकडा आरती – सूर्योदयापूर्वी प्रभातसमयी पूजाधिकारी देवालयाची दारे उघडून मुखाने नामस्मरण करीत श्रीनृसिंहासह सर्व परिवार देवतांना काकडयाने ओवाळतात. यावेळी श्रीस खिचडीचा नैवेद्य दाखविला जातो.

प्रातःपूजा – सकाळच्या पहिल्या प्रहरांत ही पूजा पूर्ण होते. श्रीनृसिंह व श्रीशामराज या दोन्ही मूर्तीस पंचामृतस्नान घालतात. षोडशोपचारे पूजा होते. नरसिंहपूर संप्रदायानुसारे ऋग्वेदीय व साम–वेदीय सूक्तांच्या तसेच पौराणिक मंत्रांनी पूजा केली जाते. नंतर श्रीमूर्तीस धूतवस्त्रे नेसवितात. धूपदीपाने आरती होऊन श्रीस पायसाचा नैवेद्य दाखवितात. प्रत्येक शनिवारी व सणाबारी श्रीस सुवासिक तेल लावून उष्णोदकाने स्नान घालतात. श्रीनंतर लक्ष्मी व प्रल्हादाच्या मूर्तींना स्नाने घालून त्यांना धूतवस्त्रे नेसवितात. धूपदीप नैवेद्ययुक्त पूजा प्रथम पूजाधिकारी करतात. नंतर लगेचच अशी पूजा विंचूरकरांच्या (आतां विश्वस्त मंडळाच्या) वतीने त्यांचे अर्चक करतात. पूजेचेवेळी चौघडासनई, नौबतझांज यांचे वाद्यकाम होते. घाट वाजते. पूजा संपल्यानंतर सर्व परिवार देवतांना पूजाधिकारी एकारतीने ओवाळतात.

माध्यान्हपूजा – दुपारी श्रीस पुरणपोळीचा महा–नैवेद्य दाखविला

जातो. असाच नैवेद्य लक्ष्मी व प्रल्हाद यांनाही दाखविला जातो. श्रीस तांबूल–गोविंदविडे–अर्पण करतात.

प्रति एकादशीस मात्र खारकांच्या खिरीचा नैवेद्य दाखवितात.

सायंपूजा – अस्तमानाचे सुमारास सायंपूजा होते. श्रीस प्रथम मंत्रस्नान घालतात. प्रति एकादशीस मात्र तिसरे प्रहरीच स्नान घालतात. सायंपूजा प्रथम पूजाधिकाऱ्यांची व लगेचच विश्वस्त मंडळाची अशा दोन धूपदीप नैवेद्य युक्त पूजा होतात. यावेळीहि नगार–खान्यांतील वाद्ये वाजविली जातात. घाटहि वाजते.

शेजारती – रात्री नऊ वाजण्याचे सुमारास पूजाधिकारी श्रीची शेजारती करतात. त्यावेळी श्रीपुढील चांदीचे दांडीपासून शेजघरापर्यंत पायघडी अंथरतात. शेजघरांत दोन पलंग आहेत. शेजारतीची काव्य रचना मराठीतून पद्यबद्ध असून ती या क्षेत्रांतीलच नागेश डिंगरे, कृष्ण, व गोविंदात्मज प्रल्हाद यांनी केलेली आहे. शेजारतीनंतर श्रीची चंपू–प्रार्थना म्हणण्यांत येऊन नंतर लक्ष्मी, प्रल्हाद, गरूड व हनुमान याना एकारतीने ओवाळण्यात येते. शेजारतीचेवेळी श्रीस दुधाचा नैवेद्य दाखवितात. या सर्व विधीनंतर श्रीनृसिंहाची क्षमा मागून पूजाधिकारी दारे बंद करतात.

वरीलप्रमाणें दैनंदिन कार्यक्रम असतो. याशिवाय नैमित्तिक प्रसंगाने गुढी पाडवा, वैशाखी नवरात्र महोत्सव, गोकुळ अष्टमी, विजया–दशमी, दिपवाली, वैकुंठचतुर्दशी, संक्रांत, मार्गशीर्षातील वर्धापन दिन या दिवशी श्रीच्या विशेष पंचामृतपूजा दुपारचे समयी होतात. श्रीमूर्ति वस्त्रारहित असतांना आरशांचे साहाय्याने श्रीनृसिंहमूर्तीवर सूर्यकिरणे परिवर्तवून लावतात. अवघा गाभार व मूर्ति प्रकाशाने तेजाळून निघते.

सणावारी व विशेषप्रसंगी पूजाधिकारी श्रीची अलंकारपूजा बांधतात.

चलार्चा पूजा

सुमारे साठ वर्षांच्या कालावधीनंतर श्रीनृसिंहमूर्तीस हा विशेष

विधि केला जातो. सिंहासनावरून श्रीमूर्ति उचलून ती रंगशीलेच्या मंडपातील सिंहासनावर कांहीं काळ ठेवतात. मूळ सिंहासनावर श्रीमूर्ति असते. त्या जागेवर एक पोकळी आहे. तीवर नृसिंह मूर्ति बसविलेली असते. ही पोकळी स्वच्छ करून व नंतर तीत सोने, चांदी, द्रव्य, व रत्ने सुगंधी द्रव्ये आदि घालून राजयोगाच्या शुभमुहूर्तावर श्रीमूर्ति पुनः सिंहासनारूढ करतात. हा एकंदर विधि शास्त्रशुद्धरीत्या व ज्योतिष–शास्त्राधारेच करावा लागतो. बहुत खर्चाचा व काटेकोरपणे पार पडणारा असा हा विधि आहे.

अन्य नृसिंह क्षेत्रे

भारतांत नृसिंहोपासना पूर्वापार चालत आल्याने येथे नृसिंहस्थाने व क्षेत्रे अनेक आहेत. इतकेच काय पण प्राचीनकाळी जेथे जेथे भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला तेये तेथे श्रीनृसिंहाची देवालये, मूर्ति आजहि विद्यमान आहेत. जावा, सुमात्रा, मलाया, बाली आदि देशात आजहि नृसिंहोपासना चालते. हा एक स्वतंत्र विषय आहे. भारतांतील कांही नृसिंहस्थानांची माहिती खाली देत आहे.

१) मुलतान

भारताच्या विभाजनापासून हें नृसिंह क्षेत्र पाकिस्तानांत आहे. श्रीनृसिंहाचा अवतार व हिरण्यकशिपूचा वध येथेच झाला. येथील नृसिंहमूर्ति इतकी उग्र आहे की, तिचे तेज सहन होत नाही म्हणून मूर्तीच्या पाठीची पूजा करतात, अशी आख्यायिका आहे. या क्षेत्रा विषयी वामनपंडित म्हणतात –

मूलस्थान प्रसिद्धनामनगरी जैसी अयोध्यापुरी
जेथे जन्म धरी नृसिंह बरवा प्रल्हाद राखे हरी

२) नरसिंगपुरा –

हे क्षेत्रहि विभाजनापासून पाकिस्तानांतच आहे. इ. स. १९६५ साली झालेल्या भारतपाक युद्धात भारतीय सेनेने हे स्थान जिंकले होते. येथे श्रीनृसिंहाचे मंदीर आहे.

३) विजयनगर

दक्षिण भारतांतील हे प्रसिद्ध नृसिंहक्षेत्र आहे. हा विजयनगरच्या सम्राटांचा कुलस्वामी होय. विस्तीर्ण व भव्य नृसिंह मंदीर व भीम भयानक अशी प्रचंड नृसिंहमूर्ति हे या क्षेत्राचे वैशिष्टच आहे. हे स्थान तुंगभद्रेच्या तीरावर आहे.

४) विष्णूकांची

मोक्षदायिका सप्तपुऱ्यापैकी एक पुरी जी कांची तिचे दोन भाग आहेत. एक विष्णुकांची व दुसरा शिवकांची. विष्णुकांचीत सर्व वैष्णव तर शिवकांचीत सर्व शैव, विष्णुकांची हे नृसिहक्षेत्र असून तेथे श्रीचे देवालय व मनोहर मूर्ति आहे. येथे श्रीनृसिंहास वरदराज असे म्हणतात. नजिकच वेगवती नदी आहे.

५) तेर

मराठवाडयांतील धाराशिव जिल्ह्यांत हे नृसिंहक्षेत्र आहे. गांवा-पासून थोडया अंतरांवर तेरणा व पिप्पोला या नद्यांचा संगम असून तीरावर नृसिह मंदीर आहे. श्रीनृसिंहमूर्ति वीरासनस्थ आहे. तिचे अपसव्य अंग श्रीनेच भक्षण केले अशी आख्यायिका आहे कारण पुजाऱ्या-कडून नैवेद्यास विलंब झाला होता. निजामच्या राजवटीत रझाकारांनी मूर्ति उखडून टाकली होती. भारतीय सेनेने हैद्राबाद जिंकल्यावर श्रीमूर्तीची पुनः स्थापना केली.

६) बिदर

नितांत रमणीय पण तितकेच अवघड असे हे नृसिंहक्षेत्र आहे. श्रीचे मंदीर डोंगर कपारीत आहे. मंदीरांत जाण्याचा रस्ता भुयारांतून व गळया इतक्या पाण्यांतून आहे. मंदीराचा गाभारा अंधाराने व्याप्त असल्याने दिवटीच्या प्रकाशांतच श्रीचे दर्शन घ्यावे लागते. श्रीची मूर्ति अक्राळविक्राळ आहे. यालाच झरणी नृसिंह असेहि म्हणतात. उन्हाळयांत श्रीस पन्हे अर्पण करण्याचा प्रघात आहे.

७) धोम

महाराष्ट्रांतील हे एक प्रसिद्ध असे नृसिंह क्षेत्र असून श्रीचे प्रशस्त मंदीर व वरदायिनी नृसिंह मूर्ती आहे.

८) कोळेनृसिंह

सातारा जिल्ह्यांत कृष्णेच्या तीरावर श्रीनृसिंहाचें मंदीर आहे. गुहेत नृसिंहाची गंडकी शीलेची मूर्ति हिरण्यकशिपूचा वध करणारी, सोळा भुजात आयुधे धारण केलेली अशी असून प्रभावळीवर दशावतार आहेत. श्रीमूर्तीचे बाजूस प्रल्हाद व कयाधु आहेत.

९) इचलकरंजी

एके काळच्या संस्थानाची ही राजधानी. नीरा–नरसिंहपूर येथीलच स्थान येथे आहे. मात्र येथे श्रीची मूर्ति नाही. पादुका आहेत. एका भक्तांसाठी श्रीनृसिंह नरसिंहपुराहून येऊन येथे वास्तव्य करते झाले अशी आख्यायिका आहे. मंदीर प्रशस्त असून शासनाकडून देव–स्थानास उत्पन्न मिळते.

१०) नरसिंहपूर

मध्य प्रदेशांतील हे प्रसिद्ध शहर आहे. श्रीनृसिंह मंदीर नदीच्या तीरावर असून ते प्रशस्त आहे. हे स्थान नीरा–नरसिंहपूर येथीलच आहे असे म्हणतात.

११) मुद्‌गल नृसिंह

मराठवाडयांत गोदावरीच्या तीरावर हे नृसिंहक्षेत्र आहे

१२) शूरपाल नृसिंह

म्हैसूर राज्यातील विजापूर भागांत हे स्थान आहे. स्थान नीरा–नरसिंहपूर येथीलच आहे असे म्हणतात.

हे स्थान कृष्णातीरी असून कर्नाटकांतील एका भक्तांसाठी श्रीनृसिंह येथे आले अशी आख्यायिका आहे.

१३) राक्षसभुवन

राक्षसभुवन हे शनीचे क्षेत्र तथापि ते नृसिहक्षेत्रहि आहे. याच क्षेत्री शनीने नृसिहाची स्तुति केल्यावरून श्रीनृसिह त्यांस प्रसन्न झाले व त्या क्षेत्री त्यांनी निवास केला.

१४) कनकगिरी

दक्षिणेतील हे एक नृसिंहक्षेत्र असून तेथे श्रीचे मंदीर आहे. देवालयांत लिंग असून ते मुखाच्या आकृतीचे आहे. त्या मुखछिद्रास नृसिह म्हणतात.

१५) हंपी

येथील नृसिंहाची मूर्ति इतकी अतिप्रचंड आहे की, एवढी मूर्ति क्वचितच असेल. या अक्राळ विक्राळ मूर्तीचे मुख अर्ध्या खणाएवढे आहे.

१६) गंडीनृसिंह

हंपीजवळच पर्वतात हे स्थान असून यास इकडील भक्त गंडी–नृसिह म्हणतात.

१७) रायबाग

नृसिंहाचे हे स्थान कोल्हापूरनजिक असून तेथील श्रीनृसिंह मूर्ति भुयारांतील मंदिरात आहे.

१८) नरसिंहपूर

हे स्थान कृष्णातीरावर वाळवे तालुक्यात आहे. मंदीर भुयारांत असून हिरण्यकशिपूचा अंत करीत असलेली उंबऱ्यावर बसलेली नृसिह मूर्ती शालिग्रामशिलेची आहे. मंदीरानजिकच कृष्णेवर नृसिहतीर्थ आहे.

१९) सांगवडे

कोल्हापूर जिल्ह्यांतील हे एक नृसिंहक्षेत्र आहे. श्रीनृसिंहाची मूर्ति कृष्णपाषाणाची आहे. गांवातील केवळ हिंदूच नव्हे तर जैन व मुसलमान ही मंडळी देखील या देवतेचे परमभक्त आहेत.

हा खेरीज मराठवाडयांत वरूड, पोखरणी, कनकेश्वर, अंबाजोगाई तुळजापूर, लातूर येथे लहान मोठी मंदीरे व नृसिंहमूर्ति आहेत. पंढरपूर येथे सभामंडपात नृसिंहाची स्फटिकाची मूर्ति आहे. तसेच पुणे येथेहि सदाशिव पेठेत नृसिंहमंदीर असून श्रीची पांढऱ्या स्फटिकाची बसलेली मूर्ति आहे. अंकावर लक्ष्मी आहे.

अभ्यासाची साधने

१) ऋग्वेद संहिता, यजुर्वेद संहिता, सामवेद संहिता
संपादक – पं. श्री. दा. सातवळेकर.

२) श्रीमद्भागवत, सप्तमस्कंध.

३) पद्मपुराणान्तर्गत नृसिंहपूरमाहात्म्य. (हस्तलिखित)

४) कृष्णाचार्य दंडवते विरचित द्वे विरूपे सूक्तभाष्य.

५) नीरा–नरसिंहपूर येथील तेरा शिलालेख.

६) दक्षिण प्रयाग माहात्म्य, लेखक – आ. द. दंडवते.

७) तीर्थयात्राप्रबंध, लेखक – ग. स. लेले

८) विंचूरकर घराण्याचा इतिहास., लेखक – ह. र. गाडगीळ.

९) श्रीनरसिंह चरित्र, लेखक – शं. दे. क्षीरसागर.

१०) पुणे डिस्ट्रिक्ट कोर्टाचा क्र. ५।१८८३ चा न्यायनिवाडा.

११) संत तुकारामाचा एक अभंग.

१२) रामदासांचे तीर्थावळि नामक प्रकरण.

१३) नीरा–नरसिंहपूरचे वर्णन. लेखक – आ. द. दंडवते.

१४) महाराष्ट्र सारस्वत., लेखक – वि. अ. भावे.

१५) Poona Gazzetier Vot. III.

१६) अनेक जुन्या सनदा.

१७) अनेक जुनी कागदपत्रे.

१८) नीरा–नरसिंहपूरचे प्रत्यक्ष निरीक्षण.

१९) अनेक आख्यायिका.

२०) नीरा–नरसिंहपूर संप्रदायाची देवपूजा.

विज्ञापना —

सर्व नृसिहभक्तांना व वाचकांना विनंति अशी की, नीरा–नरसिंहपूरसंबंधीची कांहीं माहिती आपणांकडे असेल तर ती आधारांसह खालील पत्त्यावर कृपेने कळवावी. या पुस्तकाच्या पुढील आवृत्तीत तिचा नव्याने समावेश करण्यांत येईल.

गो. ह. दंडवते
कसबे तडवळे (सोलापूर)